म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे
विषय कथा
दा क्र १३९०
IRBK-0101390
IRBK-0101390
IRBK-0101390

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

20 DEC 1970

9 JUL 1972

24 JUL 1972

10 OCT 1980

29 JAN 1981

22 APR 1997

30 MAY 2000

सागर — साहित्य

— ३ —

# वादळांतील नौका

कथासंग्रह




IRBK-0101390

वा. क्र. 9310

लेखक

प्रो. लक्ष्मणराव सरदेसाई

प्रकाशक

बा. द. सातोस्कर, बी. ए.

प्रकाशक—वा. द. सातोस्कर, बी. ए., सागर साहित्य,
त्रिभुवन रोड, मुंबई नं. ४.
प्रथमावृत्तीचे सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन.

---

## प्रो. लक्ष्मणराव सरदेसाई यांचें वाङ्मय

### प्रकाशित

१ कल्पवृक्षांच्या छायेंत ... कथासंग्रह
२ सागराच्या लाटा ... ... ,,
३ वादळांतील नौका ... ... ,,

### अप्रकाशित

४ पितरांचें पाप ... ... कादंबरी
५ सुरंगीचीं फुलें ... ... कथासंग्रह

---

प्रथमावृत्ति, प्रसिद्धि—ऑक्टोबर १९३६
मुद्रक—कृ. ना. सापळे, रामकृष्ण प्रिंटींग प्रेस,
त्रिभुवन रोड, मुंबई नं. ४.

वास्तविक पूर्वी जाहीर केल्याप्रमाणें **कुळागर** हेंच **सागर-साहित्याचें** तिसरें पुस्तक म्हणून प्रसिद्ध व्हावयाचें. पण प्रयत्न करूनही मनासारखी मजकुराची जुळवाजुळव होणें अशक्य झालें. हातीं आलेल्या साधन–सामुग्रीनें सजवूनच **कुळागर** रसिकांपुढें मांडलें असतें, तर प्रातिनिधिकत्व व दर्जा ह्या दोन्ही दृष्टींनीं तो संग्रह हिणकस ठरण्याची भीति होती. अशा परिस्थितींत **कुळागर** कांहीं काल बाजूला ठेवून पुढील प्रकाशनाची तजवीज करणें भाग पडलें. ह्याच वेळीं माझे मित्र प्रो. लक्ष्मणराव सरदेसाई ह्यांनीं आपला प्रस्तुत संग्रह प्रसिद्धीकरतां देऊन, माझी इच्छा मूर्त स्वरूपांत आणण्यास मदत केली. कांहीं सुंदर गोष्टी तर त्यांनीं अत्यंत अल्पावधींत–गेल्या १०–१५ दिवसांतच संग्रहाकरतां लिहून देऊन जी मला मदत केली, त्याबद्दल त्यांचा मी ऋणी आहें.

प्रो. सरदेसाई यांनीं एक कुशल कथालेखक म्हणून ह्यापूर्वीच लौकिक मिळवला आहे. **वादळांतील नौका** मुळें त्यांच्या यशांत भर तर पडेलच. पण एका विशिष्ट दृष्टिकोनानें प्रस्तुत संग्रहांतील कथांची निवड केली असल्यामुळें लेखकाचीं कांहीं वैशिष्ट्यें व वाङ्मयगुण रसिकांपुढें ठळकपणें उभे राहतील असा विश्वास आहे.

संग्रहाच्या अंतर्गत रचनेच्या बाबतींत माझे मित्र श्री. माधव मनोहर बी. ए., ह्यांचें विचारविनिमयाच्या द्वारें जें मला बिनमोल सहाय्य झालें त्याचा निर्देश न करणें कृतघ्नपणाचें होईल.

पुस्तकाचें बहिरंग आकर्षणपणें सजविण्याचें काम, श्री. स. पु. दणाईत यांनीं नेहमींप्रमाणें अंगावर घेऊन, तें अवघ्याच दिवसांत संपविलें, ह्याबद्दल त्यांचे माझे संबंध लक्षांत घेतां औपचारिक आभार न मानणेंच इष्ट आहे.

संग्रहाच्या नांवाचा अर्थ पूर्णपणें वाच्यार्थानें न घेतां, लाक्षणिक अर्थानें मल-पृष्ठावरील चित्र चितारण्यांत आलें आहे. चिकित्सक ( चांगल्या अर्थानें ) वाचकां-करितां हा खुलासा आहे. ‘ वादळांतील नौका ’ ह्या पहिल्याच कथेंतील शेवटच्या प्रसंग दर्शनी चित्रांत चित्रित केला आहे, हें मार्मिक वाचकांस सांगावयास नकोच.

शेवटीं पुस्तकाच्या प्रकाशनास आवश्यक असलेलें मुद्रकाचें सर्व प्रकारचें सहाय्य श्री. कृ. [illegible] सापळे यांनीं मनापासून दिल्याबद्दल त्यांचा मी आभारी आहें.

सागर-साहित्य, मुंबई नं. ४
ता. १५–१०–३६

**वा. द. सातोस्कर.**

# कथानुक्रम

| कथा | पृष्ठ |
|---|---|
| वादळांतील नौका ... ... | ५ |
| साक्षात्कार ... ... ... | २१ |
| तिचा उद्धार ... ... ... | ३५ |
| लग्नाचा ध्यास ... ... ... | ४९ |
| अंतरींची ओढ ... ... ... | ५७ |
| चिरंतन फसवणूक ... ... | ६७ |
| शाळामास्तर ... ... ... | ७९ |
| कुचंबणा ... ... ... | ९५ |
| प्रेमाचा मार्ग ... ... ... | १०६ |

ऱ्याच्या माणसाकडे मन मोकळं करून बोलायला मला कुणीतरी हवं होतं. म
मी आईला सगळं सांगून टाकलं.

—काय सांगितलंस तूं आईला ?

—माझं तुझ्यावर प्रेम आहे. इतकंच नव्हे, तर तूं इथं कधीं कधीं येत
तुझ्याशिवाय मला चैन पडत नाहीं, अन् आमचा संबंधही आलेला आहे,
आईला माहीत आहे. पण तिचं म्हणणं असं कीं, मी नवऱ्याकडे रहायला
सुहास, तुझा माझा संबंध हें जर पाप ठरत असेल तर त्यांत अधिक पापाची
मी घालूं इच्छीत नाहीं. तुझ्याशीं संबंध आला असतांना नवऱ्याजवळ र
लोकांची अन् त्याची प्रतारणा केली तर नरकांत राहिल्याचं मला दुःख होईल.
वाईट केलं असं आज लोकांनीं म्हटलेलं मला पुरवलं. परंतु, नवऱ्याशीं नां
तुझ्याशीं प्रेमसंबंध ठेवला तर माझ्या हृदयाचा भयंकर कोंडमारा होईल. अन् सुख
एक क्षण देखील माझ्या नशिबीं राहाणार नाहीं....

ती मनापासून तळमळून बोलत होती. ढोंग, दांभिकपणा, तिला माहीत नव्हत
तिच्या इच्छेविरुद्ध तिचें लग्न झालें आणि आपलें हृदय तिनें आपल्या आवडीच
एका माणसाला देऊन टाकलें. यांत तिला आपला गुन्हा दिसत नव्हता असें नाहीं
परंतु, त्याचा कांहीं भाग इतरांच्या वांट्याला जात आहे, हें तिला माहीत होतें
आणि या जाणीवेमुळेंच, आपल्याभोंवतीं लोकनिंदेचा प्रलय माजला असतांन
देखील तिच्या मनाची शांति ढळली नाहीं.

—मग तुझ्या कृत्याचा तुला पश्चात्ताप होत नाहीं ना ?

—अद्याप मला पश्चाताप झाला नाहीं. परंतु लवकरच तो होईल अशी
मला आतांपासूनच जाच देऊं लागली आहे...

—तुझी भीति कोणती तें मला चांगलं माहीत आहे.

—अन् तें तुला माहीत असलं नसलं तरी, मी तुला तें सविस्तर
आहें.

ऱ्याकडे
ंन. परंतु
हीं.
उतरायला

अंधार पसरला. रस्त्यावर म्युनिसिपालिटीचे दिवे लागूं लागले. मांडीव
धाकटा भाऊ ऑर्गनवर गाणें म्हणत होता, त्याचे मधुर आलाप त्या वाताव वतीं
तरंगूं लागले. त्या सुंदर, वैभवसंपन्न खोलींतील कोंपऱ्यांत एक चकचकीत घ.

समई होती, ती प्रभेनें पेटविली. समईच्या त्या पिवळसर प्रकाशांत आरशांत पडलेलीं त्यांचीं प्रतिबिंबें विलक्षण सौंदर्यानें चमकूं लागली.

प्रभा परत पलंगावर येऊन बसली. तिनें सुहासचा हात आपल्या दोन्ही हातांच्या पंजांत उत्कटपणें दाबून धरला आणि म्हटलें,

—सुहास, तूं आज ना उद्यां मला सोडून जाणार असं मला वाटूं लागलं आहे. अन् तसं झालं तर, मला जगांत कोणीही रहाणार नाहीं.

तुंबलेल्या तलावाचें पाणी बंधारा फोडून एकदम भयंकर वेगानें वहायला सुरवात व्हावी, तसेंच प्रभेचें झालें. भावनांच्या आवेगांत मनांतली खोल शंका तिनें सांगून टाकली.

सुहास दचकला. त्याच्या मर्मावरच तिनें अकल्पितपणें घाव घातला. पण तो व्यवहारांतील कलावंत होता. प्रभेसारख्या सुंदर आणि वैभवसंपन्न तरुणीचा हीन, स्वार्थी दृष्टीनें फायदा घेऊन आपल्या घरचा संसार व्यवस्थितपणें थाटावा हा त्याच्या मनांतील खोल कावा होता. तो उघड होत आहे हें कळतांच त्यानें म्हटलें,

—प्रभा, तूं वेडी आहेस !

—सगळं जग मला हेंच सांगत आहे.

—अन् तें मला खरें वाटतं. मी तुझा त्याग करीन असं कां म्हणतेस तूं ?

—सुहास, मी वेडी आहें. खूप वेडी आहें. पण माझं हृदय परमेश्वरानं इतकं नाजुक बनवलं आहे, कीं दुसऱ्याच्या वागणुकींतील बारीक सारीक फरक मला स्पष्ट कळूं लागतात.

—अन् ते फारच मोठे दिसतात. नाहीं का ?

तसंही असेल. परंतु गेल्या दोन तीन महिन्यांत तुझ्यांत घडून येत अस-
; पाहून मला फार वाईट वाटतं.

।प्पच राहिला.

ईकडून, बाबांकडून वेळोवेळीं पैसे घेऊन लहानपणापासून मी जी पुंजी जमा
। ती मी तुझ्या मागणीप्रमाणें तुला थोडथोडी देऊन टाकली. तुझ्यापेक्षां
.शांची किंमत जास्त वाटली नाहीं, म्हणून मी तुला माझ्यापाशीं असले
दोन हजार रुपये देऊन टाकले. नंतर तूं माझे दागिने मागूं लागलास. ट
याकडे ठेवायला दिलेले घराण्यांतील कांहीं जुने दागिने मी तुला दिले. तूं

घरगुती संकटांत सांपडला असल्यास मुक्त व्हावास ही माझी इच्छा होती. परंतु केव्हांही माझ्याकडे आलास तर तूं दुःखी, उदासीन असावयाचा. तुला तशा स्थितींत पाहून मला किती त्रास होत असे याची तुला कल्पना नाहीं. अन् मी एकएक दागिना तुला देतच गेलें. इतरांना ही गोष्ट कळली. माझ्यापाशीं असलेले दागिने संपत आले. नेहमीं येत असलेला तूं आठ दिवसांतून एकदा दिखील दिसेनासा झालास. माझी तळमळ तूं पाहिली नाहींस. तुझ्या वागणुकींतील मोकळे-पणा गेला. माझ्या प्रेमापेक्षां, माझ्या सहवासापेक्षां माझ्या पैशांची, माझ्या दागि-न्यांची तुला जास्त गरज भासूं लागली...

सुहास धूर्त, शहाणा होता. प्रेमाचें शास्त्र त्याला माहीत होतें. प्रभेची दुर्बलता कोणत्या गोष्टींत आहे हें त्याला पक्कें माहीत होतें. त्यानें तिला आपल्या हृदयाशीं आंवळून धरून भावनापूर्ण स्वरांत म्हटलें,

—प्रभा, चुकतेस तूं ! तुझ्यापेक्षां मला अधिक प्रिय असें कांहींही नाहीं. मी तुझ्याकडून पैसे नेले, दागिने नेले हें खरं. पण तूं माझ्यापासून वेगळी नाहींस असं मलां वाटल्यामुळंच मी तुला त्रास दिला. माझ्या अडचणी मी तुला सांगायच्या नाहींत तर कुणाला सांगायच्या ? माझी घरची स्थिति बरी नाहीं ही गोष्ट तुला माहीत नाहीं काय ? वडिलांनीं पूर्वी केलेल्या कांहीं कारभारामुळें आम्हीं कर्जांत सांपडलों. सावकारांच्या त्रासामुळें जमिनी लिलावांत जाऊं लागल्या. म्हणून तुझ्याकडून मी पैसे अन् दागिने नेले.

—अन् तूं त्रासांतून मुक्त व्हावास म्हणून मी ते स्वखुशीनें दिले. परंतु नंतर तुझी मागणी पुरवणं मला अशक्य झालं, तेव्हा तुझ्या वृत्तींत बदल झाला.

—नाहीं. तुला तसं वाटलं असेल, इतकंच..घरगुती भानगडीमुळं मला तुझ्याकडे नेहमी येण्यास मिळालं नाहीं, व त्यामुळंच मी तुला दुःखी दिसलों असेन. परंतु मी तुला एवढंच सांगतों कीं, तुझ्यापेक्षां अधिक प्रिय मला कांहींही नाहीं.

—सुहास, तुझ्या सुखासाठीं मी माझ्या अंगावरील सगळे दागिने उतरायला तयार आहें; परंतु इथं या घरांत असतांना मला तें अशक्यच नाहीं का !

सुहासच्या धूर्त नेत्रांत विजयानंदाची चमक खेळली.

—हो असं दिसतं खरं ! आपल्याला तीव्र विरोध करणारी मंडळी सभोंवतीं असतांना इथं चोरासारखं, कैद्यासारखं राहाणं अशक्य आहे.—सुहासनें म्हटलें.

—मग इथून जायचं का ? माझ्याबरोबर सदैव रहायची तुझी तयारी आहे का ?

—तूं माझ्याबरोबर असलीस तर एखादं रुक्ष निर्जन खेडं देखील मला नंदनवनाप्रमाणं प्रिय होईल.

—सुहास ! मी काय करूं ? तुझ्याशीं संबंध ठेवल्यामुळें मी या घरांत असूनही माझ्या मंडळीला दूर झालें आहे. त्यापेक्षां खरोखरीच इथून दूर अशा जागीं जाऊन रहाण्यांतच मला आनंद आहे. नौका वादळांत सांपडली आहे; तिला आतां मागं परतणं शक्य नाहीं.

० ० ०

त्या निसर्गसुंदर खेड्यांत भाड्यानें एक टुमदार बंगली घेऊन प्रभा व सुहास राहूं लागलीं.

सुरवातीस प्रभेस चुकल्याचुकल्यासारखें वाटूं लागलें. ज्या वातावरणांत ती लहानाची मोठी झाली होती त्या वातावरणांतून बाहेर पडतांच, मनाची कितीही तयारी तिनें केली असली तरी, तिची तळमळ झाल्याशिवाय राहिली नाहीं. ज्यांच्या संगतींत कांहीं वर्षें घालविलीं, ज्या मंडळीच्या फाजील मायेंत ती वाढली त्या मायेच्या सांवलीपासून दूर होतांच तिच्या मनाची रुखरुख विलक्षण वाढली यांत काय नवल ?

परंतु प्रेमाचें सुख पूर्णांशानें आपणास एकांतवासांतच अनुभवायला मिळेल असें तिला दिसून आलें. आपल्या नात्यागोत्याच्या किंवा मित्रमंडळीच्या दाहक, विषारी दृष्टीपासून आपण मुक्त झालों असून, सुहासच्या मधुर संगतींत आपले दिवस आनंदांत जातील असें तिला वाटूं लागलें. सामाजिक संकेतांची भीति आपण मुळींच मानीत नाहीं. आणि त्यामुळें आपल्या प्रत्यक्ष सुखांत कांहींच कमीपणा येणार नाहीं अशी तिची समजूत होती.

तिच्या अंगावर असलेले दागिने कमींतकमी चारपांच हजार रुपयांचे होते. सुहासची दृष्टी त्यांच्यावर होती. परंतु पहिल्या कांहीं दिवसांत त्यानें तिच्याकडे त्यासंबंधीं मुळींच गोष्ट काढली नाहीं. तो व्यवहारचतुर होता. आणि तिच्या भावनेची नाजुक स्प्रिंग दाबून, आपल्याबरोबर यायला आपण तिला प्रवृत्त केली असली तरी इतक्या लवकर आपण कठोर झालों तर त्याचा कदाचित् उलट परिणाम होईल हें त्याला माहीत होतें. म्हणून, यापूर्वी कधीं दाखविलें नाहीं इतकें प्रेम दाखविण्यास त्यानें सुरवात केली.

ती बंगली एका टेंकडीवर होती. तेथून निसर्गाचा बराच मोठा टापू दृष्टीच्या आटो-क्यांत येई. थोड्या अंतरावरून विस्तीर्ण नदी वाहात होती. उजव्या बाजूला मोठ्या उंचीवरून अजस्र पूल बांधला होता, त्याचे खांब व कमानी स्पष्ट दिसत होत्या. पलीकडे अफाट मैदानें व पाणथळ कुरणें पसरलीं असून, त्यांत गुरांचे कळप नेहमीं चरतांना दिसत होते. नदीवरून सुटणारे रोमांचकारी वाऱ्याचे झोत, त्यां झोतामुळें तट्ट फुगून दिसणारीं होड्यांचीं शुभ्र शिडें, त्या होड्या पृष्ठभागावरून जात असतांना पाण्याची होणारी "सळसळ," व नावाड्यांच्या संभाषणाचे किंवा रांगडी गाण्याचे मोकळे स्वर, या सगळ्या गोष्टींच्या दर्शनानें किंवा अनुभवानें प्रभेच्या चित्तवृत्ती उचंबळून येत. आणि एखादी चांदणी रात्र असली, व सभोंवतालाच्या वस्तुजातांतून एक अनिर्वचनीय, मधुर, पण प्रभावी अशी मोहिनी स्रवूं लागली म्हणजे तिच्या भावनांना विलक्षण तरलता यावी, तिचें हृदय विलक्षण उल्हासानें स्फुरूं लागावें, तिच्या सौंदर्याकुल वृत्तीला प्रेमाचे पाझर फुटावे, तिच्या नेत्रांतून अश्रू चमकूं लागावे, आणि एक प्रकारची हुरहूर, एक प्रकारची भीति तिच्या गात्रांगात्रांतून निघून, तिचा नाजुक देह कांपूं लागावा; अशा वेळीं तिनें आपले हात सुहासच्या गळ्यांत घालून त्याला जवळ ओढावा आणि त्याच्या काळ्याभोर नेत्रांत आपल्या नजरेंतील अमर्याद प्रेमाचा आणि सौंदर्याचा वर्षाव करीत, एखाद्या निष्पाप अजाण बालिकेप्रमाणें म्हणावें,

—सुहास, हें सुख मला नेहमीं मिळेल कांरे !

किती झालें तरी, सुहास तरूण होता. तो क्षणभरच भावनाविवश होऊन म्हणे—हृदयांत प्रेम असलं म्हणजे हें सुख नेहमींच आपल्या हातांत आहे.

—देवधर्म, समाज, यांच्या दृष्टीनें या सुखावर माझा अधिकार नाहीं. मी त्यावर झडप घालीत आहें. हें सुख तूं मला सदैव मिळूं देशील ना ?

यावर तो तिचें निरनिराळ्या प्रकारांनी सांत्वन करी. आणि अशा वेळीं तिला वाटे, आपलें आयुष्य किती आनंदपूर्ण आहे !

o o o

परंतु थोड्याच दिवसांत तिला कळून चुकलें कीं, आपण समजत होतों तितकें सुलभ सुख आपल्या नशिबीं नाहीं. कुटुंब, समाज, धर्म, यांच्या नियमांच्या बाहेर जाऊन मिळणारें सुख कितीही उत्कट असलें तरी तें अत्यंत क्षणभंगुर आहे. वेड्या हरिणांप्रमाणें आपण त्या मृगजळामागें लागल्यें अन् आपला नाश करून घेतला.

कांहीं दिवस सुहास कुठें तरी दूर गेला होता. प्रभा, एक मोलकरीण व स्वयंपाकीण यांच्या संगतींत, त्या अनोळखी गांवांत भीतभीत दिवस काढीत होती.

सूर्य मावळून थोडा थोडा अंधार पसरूं लागला म्हणजे तिच्या मनांतील शंका-कुशंका जागृत होऊन तिला त्रास देत. रात्र होण्यापूर्वींच तिनें घराचीं सगळीं दारें व खिडक्या बंद कराव्या आणि त्या दोघां बायांना बिलगून निजावें. आपल्या माहेरची मंडळी, आपला नवरा, सूडाच्या हेतूनें इतरांच्या हातून आपला घातपात तर करणार नाहींत ना ? अशी भीति तिला वाटावी.

सुहास परत आला. तिला कितीतरी आनंद झाला. पण सुहासची वृत्ति कितीतरी पालटली होती, हें पाहून तिचें काळीज चरकलें. गांभिर्य आणि औदासिन्य या भावना त्याच्या चेहऱ्यावर प्रतिबिंबित झाल्या होत्या.

त्याची भेट होऊन प्रभेनें त्याच्याशीं बोलायला सुरवात केल्यावर त्यानें म्हटलें,

—मोटार पदरीं असल्याशिवाय इथं राहाणं शक्य नाहीं.

—तें कसं ?

—इथून जायचं झालं किंवा इथं बाहेरून यायचं झालं तर मुद्दाम स्पेशल मोटार भाड्यानं करून यावं लागतं, आणि त्यामुळं कितीतरी पैसा खर्च होतो.

—मग मोटार विकत घ्यायला पैसे आहेत का तुझ्याशीं ?

—माझ्याकडे पैसे असते तर मी तुला ही गोष्ट कां सांगितली असती ? तुला न कळवतांच मी मोटार घेऊन आलों असतों.

मग मोटारला लागणारे पैसे माझ्याकडे तरी कुठं आहेत ? माझ्यापाशीं असलेले पैसे मी तुलाच देऊन टाकले नाहींत का ?

—वेळींअवेळीं या उपकारांचा उल्लेख करून मला डिवचण्यांत तुला मोठें सुख वाटत असेल नाहीं ?

—तुला वाईट वाटावं म्हणून मी तसं म्हटलं का ?

—तें असो ? तुझ्याजवळ पैसे नसले तरी दागिने आहेत.

—अन् ते विकून मोटार विकत घ्यावी असं वाटतं का तुला ?

—हो, मोटार पदरीं असली तर आमचे दिवस जास्त मजेंत जातील, आमच्या सुखाला परिपूर्णता येईल.

—मला नाहीं तसं वाटत !

—आमच्या मनांत आतां दिवसेंदिवस विरोध येईल अन् आमचें आयुष्य...

प्रभेनें त्याच्या तोंडावर हात ठेवून म्हटलें,

—तुझी इच्छा असली तर आमचं आयुष्य नेहमींच सुखांत जाईल.

—भविष्यकाळच्या गोष्टी कां सांगतेस ? मला मोटार आवश्यक वाटते. तुला ती तशी वाटत नाही.

—मलाही मोटार आवश्यक वाटते. तूं सांगतोस तें मी खोटं कसं मानूं ? परंतु मोटारीपेक्षांही मला माझे दागिने आवश्यक वाटतात.

—तुला तुझं सुख तेवढं दिसतं, आपलं सुख दिसत नाहीं.

—आपल्या दोघांच्या सुखासाठींच मी म्हणतें कीं, माझे दागिने विकून मोटार विकत घेऊं नये. तूंच नेहमीं म्हणतोस ना कीं, आपली आर्थिक परस्थिति चांगली नाहीं. आपल्यावर कर्जाचें ओझें आहे ! मग माझ्या अंगावर दिसत असलेले हे चार दागिने विकून आपण मोटारीसारख्या वस्तू विकत आणल्या, अन् पुढेंमागें प्रसंग आला तर निर्वाहाचें कोणतें साधन आपल्या हातीं आहे ?

—निर्वाहाच्या साधनांची जबाबदारी माझ्यावर आहे कीं तुझ्यावर आहे ?

—तुझ्यावरच आहे. पण, तुझामाझा सहवास अशक्य करून टाकणाऱ्या कारणांचा विचार मला केलाच पाहिजे. आतांपर्यंत मी अविचारानें वागत आल्यें. या पुढें तरी मला थोड्या विचारानें वागूं दे.—प्रभा विनवणीच्या स्वरांत म्हणूं लागली.

—प्रभा, तूं स्वार्थी आहेस. माझी आवड तुला कवडीमोलाची वाटते.

—सुहास ! मी स्वार्थी कारे ?—इतकें म्हणून तिनें डोळ्यांना पदर लावला. सुहासकरतां केलेला सर्व प्रकारचा त्याग तिच्या मनःचक्षूंपुढें उभा राहिला.

पण सुहासचें हृदय विरघळलें नाहीं. तिच्या अश्रूंची मुळींच पर्वा न करतां तो उपरोधिक स्वरांत म्हणाला,

—ढोंग करायला छान शिकलीस तूं ! सिनेमांत गेली असतीस तर उत्कृष्ट नटी झाली असतीस अन्......

—सुहास, मला फसवून येथें आणून माझा कां छळ मांडलास तूं ? मला कोणीही राहिलं नाहीं म्हणून का ? माझं सर्वस्व तुलां अर्पण केलं म्हणून का ?

—सर्वस्व अर्पण करणारी स्त्री यःकश्चित् दागिने द्यायला एवढें आकांडतांडव करीत बसली आहे, नाहीं का ?

—तूं कांहीं म्हण. माझ्या अंगावरचे दागिने मोटारसाठीं मी काढीत नाहीं— प्रभेनें निग्रहानें सांगितलें.

यावर सुहास कांहींच बोलला नाहीं. आपण बोलणें काढतांच प्रभा मोठ्या खुषीनें आपल्याला हवे असलेले दागिने देईल, अन् आपण त्या पैशांची मोटार न आणतां त्यांचा उपयोग आपल्या संसाराकडे करूं ही त्याची अपेक्षा होती; ती फसलेली पहातांच त्याला तिचा फार राग आला. तो तसाच खोलींत गेला आणि दार लोटून घेऊन त्यानें पलंगावर अंग टाकलें.

दागिन्यांच्या बाबतींत प्रभेनें त्याला नकार दिला खरा. परंतु, तिचें वेडें, हळवें मन तिला खाऊं लागलें. सुहासच्या आवडीसाठीं तिनें नेहमींच त्रास सोसले होते, स्वार्थाकडे दुर्लक्ष केलें होतें. त्याचा सहवास हें तिचें आयुष्यांतील एकमेव ध्येय बनलें होतें. तो एक दिवस दूर झाला तर तिचें हृदय वरखालीं होई. तिच्या मनांत नाना तऱ्हेचे तर्कवितर्क चालू होत. तो आपल्याला टाकून गेला तर मरणाशिवाय आपल्याला दुसरा मार्ग नाहीं हें ती जाणून होती. आणि म्हणूनच, सुहासानें खोलींत जाऊन त्रागा केला आहे हें दिसून येतांत तिचें मन वळलें.

संतापाच्या भरांत सुहास निघून गेला अन् परत आला नाहीं तरी त्याच्या सान्निध्याशिवाय आपल्याला यापुढें कोठेंच राहातां येणें शक्य नाहीं. वाटेवरच्या कुत्र्याला कोणीतरी आसरा देईल; परंतु आपल्याला मात्र कोठेंच थारा मिळणार नाहीं. आई, वडील, नवरा, यांच्यावर लाथ मारून आपण निघालें अशा स्त्रीला नात्यागोत्याची मंडळी तरी आपल्या घरांत घेईल का ? आणि आपण कुठेंही जाऊन राहिल्यें तरी एक व्यभिचारी, कुलटा बाई या दृष्टीनेंच आपल्याकडे प्रत्येक पुरुष पाहील. इत्यादि विचारांनीं तिच्या जीवाला तीव्र वेदना होऊं लागल्या.

खोलीचें दार उघडून ती आंत शिरली. उशींत डोकें खुपसून भिंतीकडे वळून सुहास उपडा निजला होता. प्रभेनें त्याच्या उजव्या दंडाला धरून त्याचा चेहरा आपल्याकडे केला, आणि नंतर काकुळतीनें म्हटलें,

—सुहास ! तूं माझ्यावर रागावलास तर मी कुणाच्या तोंडाकडे पाहूं ?

—कुणाच्या ? नवऱ्याला सोडून तूं माझ्या तोंडाकडे पाहिलंस, आतां मला सोडून इतरांच्या तोंडाकडे पहा. सुंदर स्त्रीला कांहीं पुरुषांची वाण पडत नाहीं.

प्रभेच्या हृदयाची भयंकर तडफड झाली. तिला कांहींच बोलतां येईना. तिच्या मस्तकांत, तिच्या हृदयांत आगीचा डोंब उसळला. तिचा कोवळा चेहरा गुंजेप्रमाणें तांबडा लाला झाला. तिच्या कपाळाच्या हिरव्या चार शिरा तट्ट फुगून उडूं लागल्या. तिचे नाजुक, बारीक ओंठ कांपूं लागले. तिनें कांपणारे दोन्ही हात एकत्र करून, हताश स्थितींत म्हटलें.

—सुहास, मला क्षमा कर, मी तुझ्या पायां पडतें........ !

आणि इतकें बोलून, तिनें काढतां येण्यासारखे चार पांच दागिने काढून तें सुहासपुढें ठेवले.

आणि दोन्ही हातांनीं तोंड झांकून घेऊन ती आपल्या खोलींत गेली.

० ० ०

स्वाभिमान, अब्रू, प्रेमाचीं माणसें, पैसा, सगळें सगळें गमावून प्रभा आतां निर्माल्य बनली होती. तिच्या देहावर सुवर्णकण दिसत नव्हता आणि तिच्या शब्दाला किंमत राहिली नव्हती. सुहासच्या प्रेमाच्या बळावर आपण सगळ्या जगाचा रोष सहन करूं, आपला नवा संसार आपण उच्च, निरामय, स्वतंत्र करूं ही जी महत्त्वाकांक्षा तिच्या रोमारोमांत खेळत होती, ती कांहीं महिन्यांतील तिच्या अनुभवानें फोल ठरली होती.

सुहासला तिचें तारुण्य, सौंदर्य, आणि तिची संपत्ति हवी होती. त्यानें मोठ्या कौशल्यानें तिची संपत्ति हस्तगत केली. तिच्या तारुण्याचा व सौंदर्याचा दोन वर्षें-पर्यंत विकारवश दृष्टीनें आस्वाद घेतला. स्त्रीपुरुषांच्या बंधनांत भावनात्मक प्रेमाचा अंश नसला म्हणजे तें बंधन कालांतरानें शिथिल होत जाऊन शेवटीं नष्ट होतें. विकारवश वृत्तींत चिरंतन प्रेमाला मुळींच स्थान नसतें. तारुण्य व सौंदर्य कितीही अलौकिक असलीं तरी त्यांचा आस्वाद घेणारें मन स्वार्थानें मलीन झालेलें असलें, पाशवी भोगाच्या लालसेनें दूषित झालेलें असलें आणि विकारवशतेनें ग्रासलेलें असलें, म्हणजे कमी अधिक काळानें त्यांतील नीरसता तेवढीच शिल्लक राहाते. उलट, यौवन व तारुण्य साधारणच असलीं तरी, प्रेमाच्या किमयेनें त्यांना दिव्यत्व प्राप्त होतें. चिरकालीन आनंदाचा झराच जणूं काय त्यांच्यांतून सदैव स्रवूं लागतो. आणि संसारांतील निरनिराळ्या तापांच्या दाहकतेवर प्रेमजलाचें सिंचन करून प्रेमबद्ध जीव संसारांत नंदनवन उत्पन्न करतात. प्रभेलाही असेंच वाटलें

होतें. परंतु, तिचें साधें, सरळ, भावनापूर्ण वेडें मन, आणि सुहासची स्वार्थी, हिशोबी वृत्ति, यांत अंतर होतें. ती वेडी होती, उदार होती, म्हणून तिला हें अंतर दिसलें नाहीं. आणि सुहासशीं समरस होऊन त्याच्या हातांत हात गुंफून आकाशांतील दिव्य भांडाराकडे दृष्टि रोधून एखाद्या पिसाटाप्रमाणें, डोंगराच्या उतरणीवरून ती उतरूं लागली. जादूगारानें तिच्यावर पसरलेली मोहिनी नष्ट झाली तेव्हां तिला दिसून आलें कीं, आपण एकटीच एका तुटलेल्या कड्यावर उभी असून पुढें भयाण दरी आपलें स्वागत करण्यासाठीं " आ " वासून पसरलेली ! तिनें टाहो फोडला. पण तो ऐकण्यासाठीं पंचमहाभूतांशिवाय कोण होतें ?

दागिने संपले तेव्हां तिच्या जाचांना सुरवात झाली ! भोंवऱ्यांत सांपडलेल्या मनुष्याला संकटाची जाणीव असते, परंतु कोणतीच तारक क्रिया करतां येत नसते, तसेंच तिचें झालें होतें. दागिने दिले तर आपण निर्माल्यवत होऊं हें तिला शेवटीं शेवटीं कळून चुकलें होतें. परंतु ते न देणें मात्र तिच्या स्वभावानुरूप तिच्या हातांत राहिलें नव्हतें. ती भावनाप्रधान व म्हणूनच स्वाभिमानी होती आणि आधीं विचार करून ती जेव्हां सुहासला दागिन्याच्या बाबतींत नकार देई, तेव्हां तो दुरुत्तरांचे निरनिराळे मारे तिच्यावर करी. अशा वेळीं एखादा शब्द तिला असह्य झाला म्हणजे ती चवताळून उठे आणि अंगावरील दागिने काढून त्याच्यापुढें फेंकून देई.

परंतु वरील प्रकारापेक्षांही अधिक दुःखदायक प्रकार जेव्हां तिच्या लक्षांत आला तेव्हां मात्र तिचें हृदय फाटून गेलें. सुहास स्वार्थी आहे, निरनिराळे डावपेंच लढवून तो आपले दागिने हिरावून घेत आहे, इत्यादि गोष्टी कळून आल्यामुळें तिचें त्याच्या बाबतींत मत वाईट बनलें होतें. परंतु, स्त्री या नात्यानें आपल्याकडे पाहाणारी त्याची दृष्टि थोडी तरी उच्च असेल, ज्या पावित्र्यानें सुहास आपल्या पत्नीकडे पहात असतो त्याच पावित्र्यानें सुहास आपल्याकडे पहात असेल अशी तिची कल्पना होती. परंतु, तिचे दागिने संपले तेव्हांपासून तिला स्पष्ट कळून चुकलें कीं, आपल्या पाशवी, दैहिक समाधानासाठीं एखाद्या वेश्येकडे जाणाऱ्या रंगेल पुरुषाच्या दृष्टीहून सुहासची दृष्टि भिन्न नाहीं ! आपण त्याला सोडून उद्यां दुसऱ्याला गांठलें तर त्याला त्यांत आनंद आहे ! सुहासच्या वर्तनांतून आणि संभाषणांतून तिला जेव्हां ही वृत्ति दिसून आली तेव्हां तिच्या आशेचा शेवटचा धागा तुटल्यासारखा झाला.

ती आज रांधपघरांत होती. वैभवसंपन्न घराण्यांतील भाग्यशाली मुलगी आपल्या हातानें स्वयंपाक करीत होती. तिचे दागिने आणि स्वयंपाकीण बरोबरच गेलीं होतीं. एकटी मोलकरीण तेवढी होती.

तिच्या सौंदर्यांत आणि तारुण्यांत कितीतरी फरक पडला होता. कृष्ण अभ्राच्छादित आकाशांतून स्रवणाऱ्या मलिन चंद्रप्रकाशाप्रमाणें तिचे नेत्र दिसत होते. त्यांत पूर्वीची गोड धुंदी दिसत नसून, जिवाची विकलता, भेसूर सत्याचा प्रखर नाच दिसत होता. विलक्षण मोहिनीनें चमकणाऱ्या तिच्या मधुर चेहऱ्यावर भयाणता, रुक्षता, असहाय्यता वास करीत होती. तिच्या अवयवांवर प्रतीत होणारा विलासीपणा आणि उन्माद नाहींसा होऊन त्या जागीं तामसी गांभीर्य आणि उदासीनता आली होती.

चारपांच दिवसांनंतर सुहास आजच प्रभेकडे आला. त्यानें आपल्याबरोबर एक पाहुणा आणला होता. त्याच्यासाठीं जेवणाला कांहीं अधिक जिन्नस तयार करण्याबद्दल त्यानें तिला सांगितलें आणि म्हणाला,

—तो मोठा श्रीमंत आहे. अन् माझ्यावर त्याचा फार लोभ आहे. मला तो परकी नाहीं.

प्रभा ऐकत होती. अनुभवानें इतकी शहाणी होऊनही विचारी अजून भोळीच राहिली होती.

आज सगळा दिवस पाऊस पडत होता. वारा जोराचा सुटला होता. त्यामुळें माडांचीं झाडें उन्मळून पडत होती, समोरच्या नदीला पूर आला होता आणि पाणी तांबडें झालें होतें.

प्रभेला आतां नदींतून जाणारीं शुभ्र शिडें दिसत नव्हतीं. चंद्रप्रकाशांत खुलणारी झाडी दिसत नव्हती. आकाशांत चंद्र व तारका दिसत नव्हत्या.

त्याऐवजीं अंधार, भयाण अंधार, भयंकर गतीनें वहात जाणाऱ्या नदीचा भीषण आवाज आणि विजेच्या किंचित्काल प्रकाशांत भेसूर रीतीनें तळपणारें तांबडें पाणी एवढें तिला दिसत होतें.

ती निजायला खोलींत गेली. सुहास अस्वस्थ चित्तानें तिची वाट पहात होता. आपण किती हीन दीन आहों, अन् वाऱ्यावर टाकलेल्या चिंधीप्रमाणें आपली स्थिति आहे, या गोष्टीची जाणीव सुहास दृष्टीस पडतांच तिला तीव्रतेनें होई. आणि अशा

वेळीं तिला आपल्या आईवडिलांची, भावाबहिणींची, प्रेमळ नोकराचाकरांची आठवण होई.

—प्रभा, माझा मित्र कसा काय आवडला तुला ?

—त्याच्याशीं मला काय कर्तव्य आहे ?

—तो श्रीमंत आणि सुंदर आहे.

—असेल—प्रभेनें उदासीनतेनें म्हटलें.

—अन् तूं गरीव आहेस.

प्रभा, ओंठ दावीत गप्प राहिली.

—तुझा येथें खर्च चालला पाहिजे तो कोण करील ?

—तूं !

—मी ? तुला जन्मभर पोसायला मी बांधलें नाहीं.

बाहेर वादळ उठलें होतें. मुसळधार पाऊस पडत होता. निसर्ग वेदनांनीं विव्हळत होता.

—सुहास ! तुझ्याशिवाय मला आतां कोणी नाहीं रे ! मला दूर लोटूं नकोस ! सुहासचे हात पकडून केविलवाण्या मुद्रेनें प्रभा म्हणाली.

—प्रभा ! तूं सुंदर आहेस...

—माझं सौंदर्य मी तुला अर्पण केलं...

—तें मी आतां दुसऱ्याला अर्पण केलं तर तुझे अन् माझे दिवस सुखांत जातील. माझा मित्र श्रीमंत आहे. त्याला जवळ केल्यास तुला...

बाहेर वीज कडाडली. खवळलेला तो भीषण निसर्ग त्या दैदिप्यमान प्रकाशांत प्रभेला त्या खोलींतल्या वातावरणापेक्षां कमी भीषण दिसला.

खोलीचें दार व बाहेरचा दरवाजा उघडून विजेच्या वेगानें ती बाहेर आली. आणि आई–बाप, नवरा, सुहास, धर्म, आणि तिचा भावनाप्रधान स्वभाव यांनीं फसवलेल्या त्या वीस वर्षांच्या कोंवळ्या पोरीनें त्या भयाण कल्लोळांत उडी घेतली !

वादळांतील नौका

ले.—जून १९३६
अप्रकाशित

# साक्षात्कार

कळंगुटच्या समुद्रकिनाऱ्यावर मावळत्या सूर्याच्या फिक्ट प्रकाशांत, समुद्राच्या लाटा नाजूक रीतीनें, हंसत हंसत पाठशिवणीचा खेळ खेळत होत्या. सूर्यबिंबाचे रंग पाण्याच्या हालत्या सपाटीवर तरंगत होते. लाटांप्रमाणें वायुलहरींचा मंद, मधुर खेळ चालला होता.

नंदा घाईघाईनें आपल्या होडीजवळ आला व डोक्यावर असलेला जाळ्याचा गठ्ठा त्यानें होडींत टाकला. हातांतलें वल्हें होडीच्या फळीवर ठेवलें, आणि दोन्ही हातांनी जोर करून त्यानें होडी रेतींतून खालीं ढकलली. त्या उतरत्या किनाऱ्यावरून, शुभ्र रेतींत खोल रेघ ठेवून, होडी सरकत पाण्यापर्यंत गेली. गुडघाभर पाण्यांत शिरतांच होडी सुळकांडत तरंगू लागली. नंदानें आंत उडी टाकली व किनाऱ्याकडे तोंड करून तो होडीच्या टोंकावर उजव्या हातानें वल्हें खेळवीत बसला.

थोड्या वेळानें पलीकडच्या नारळीच्या झाडींतून एक तरुणी किनाऱ्यावरील रेती तुडवीत, धांवतच होडीजवळ येऊन उभी राहिली. नंदानें अतृप्त नजरेनें तिच्याकडे पाहिलें. जात कोळ्याची, पण तिचा रंग फिक्ट गोरा होता. ओंठ तांबडे, किंचित् जाड व त्यांची ठेवण विकारप्रक्षोभक होती. स्वच्छ निरभ्र आकाशाशीं गंभीरपणांत स्पर्धा करणाऱ्या त्या निळसर डोळ्यांत भावनांची खळबळ उसळलेली दिसत होती. देहयष्टि उंच आणि भरीव असून, उभे राहण्यांत निर्भयपणा व डौलदारपणा दिसत होता. अंगावरील वस्त्र पातळ व अपुरें असून, त्याचा काचा मारला होता, त्यामुळें भरदार, गोंडस जांघा स्पष्ट उठून दिसत होत्या. अंगांत चोळी घातली होती; पण पूर्णावस्थेला पावलेलें तारुण्य देहांत न सामावल्यामुळेंच कीं काय वक्षःस्थळांतून ओसंडूं पहात होतें.

तिला अशा उघड्या, आकर्षक स्वरूपांत पाहून नंदा अस्वस्थ झाला. शेवंतीचा देह थोड्याच दिवसांत आपला होणार हा विचार त्याला उन्मादक वाटला. त्यानें लटक्या रागानें तिला विचारलें,—किती वेळ राह्यचं तुझ्याकरितां ?

ती हंसली, पण तें हास्य नेहमीप्रमाणें व मनमोकळें नव्हतें. हृदयांत खोल जाऊन भावनांची खळबळ उडविणारें तिचें हास्य नंदाला परिचित होतें. तो समजला कीं, शेवंतीला उदासीन होण्यासारखें कांहींतरी तरी तिच्या घरीं घडलें आहे.

त्यानें होडी जवळ आणली. फेंसानें भरलेल्या लाटांची पर्वा न करितां शेवंती होडीजवळ गेली व तिच्या दोन्ही कडांवर हात टेंकून तिनें चेंडूप्रमाणें आपला देह होडींत टाकला, व लाडिक आवाजांत म्हटलें,—माझ्याकरतां जास्त वेळ रहावं लागलं तुला ?

—तुझ्याकरितां मी कितीही वेळ तिष्ठत राहीन—नंदा होडी फिरवीत म्हणाला. त्याचें सगळें लक्ष शेवंतीच्या हालचालीकडे, तिच्या गोऱ्यामोऱ्या चेहऱ्याकडे लागलें होतें.

—आणि मी तुझ्याकरितां काय त्रास सोसतें आहें, ठाऊक आहे तुला ?—हृदयांतील गुह्य नंदापुढें उघड करण्याच्या हेतूनें तिनें करुण स्वरांत म्हटलें.

—माझ्याशीं लग्न करण्याचा त्रास वाटतं हा ?—नंदानें थट्टेचा मोह न आवरून म्हटलें.

शेवंती लाजली नाहीं; पण तिचा चेहरा अधिकच गोरामोरा झाला. होडीला मोठ्या लाटेचा धक्का बसावा त्याप्रमाणें तिच्या मनाला धक्का बसला.

लाटांच्या आंदोलनाबरोबर वरखालीं होत, होडी पुढें जात होती. शेवंती होडींतील लांब जाळें पाण्यांत सोडीत होती. पाण्याच्या सीमारेषेवर लाल सूर्यबिंब टेंकलें होतें व पश्चिम क्षितिजावर विविध रंगांची पखरण झाली होती.

—तो मनुष्य पाहिलास ?—किनाऱ्यावरील रेतींतून मोठ्या कष्टानें आपला लठ्ठ देह पुढें ढकलीत जाणाऱ्या एका इसमाकडे हस्तक्षेप करीत शेवंतीनें हळूच व भीतिगर्भ स्वरांत विचारलें.

—होय, मी ओळखतों त्याला. त्याचं नांव रुद्राजी. कोळीवाड्याचं देवपण त्याच्या ताब्यांत आहे.—नंदानें मागें मान वळवून त्याच्याकडे पहात म्हटलें.

रुद्राजीचा देह मोठा मजेदार होता. पोटाचा चेंडू बनला होता. त्याचा देह उंचीच्या बाजूनें आवळून टाकला आहे असें वाटे. मिशांचे कल्ले कानांपर्यंत पोंचले होते. डोक्याला टक्कल पडलें होतें. एखाद्या अडाणी मूर्तिकारानें चिकणमातीची ओबडधोबड प्रतिमा करून त्यांत कृत्रिम रीतीनें जीव घातला आहे कीं काय असें त्याला पाहतांच विनोदी माणसाला सुचावें, अशीच त्याच्या अवयवांची रचना होती.

—आज सकाळीं आमच्या घरीं येऊन त्यानं बापूंजवळ मला मागणी घातली.—शेवंतीनें भयाकुल मुद्रेनें नंदाच्या डोळ्याकडे नजर स्थिर करून म्हटलें.

—कुणी मागणी घातली तुला? त्या रुद्राजीनं? त्या ढेरपोट्या थेरड्यानं? आणि तुझ्या बाबांनीं काय सांगितलं त्याला?—नंदानें संतप्त होऊन म्हटलें. आपल्या शेवंतीला त्या चाळीस वर्षांच्या विधुरानें मागणी घालावी हें त्याला असह्य झालें.

शेवंती घाबरली. आपण ही खबर नंदाला अशा वेळीं कां सांगितली, असें तिला झालें. तिनें लाटांकडे पहात म्हटलें,—बापूंनीं त्याला कांहीच सांगितलं नाही; पण ते मोठ्या पेंचांत मात्र सांपडले आहेत. तुला त्यांनी शब्द दिला आहे. पण रुद्राजीचं वजन लक्षांत आणून त्यांनी त्याला नकारही कळविला नाहीं.

—तूं काय सांगितलंस त्यांना?—संतापाचा पहिला आवेग ओसरल्यावर नंदानें प्रेमळ स्वरांत म्हटलें.

—मी नवीन तें काय सांगणार? माझं मन त्यांना ठाऊक नाही असं कां आहे?—शेवंतीनें उत्तर केलें. होडी चालत होती व दोन्ही हातांनी ती आंतील जाळें पाण्यांत सोडीत होती.

अर्धें सूर्यबिंब पाण्यांत बुडालें होतें. होडी वर्तुलाकार दिशेनें उभ्या टाकीत जात होती. किनाऱ्यापासून होडीपर्यंत टाकीत आणलेलें जाळें, त्याला बांधलेल्या लांकडाच्या तुकड्यांमुळें, पाण्यावर तरंगत होतें. रुद्राजीचा बाटोळा देह किनाऱ्याच्या दुसऱ्या टोंकावर काळ्या ठिपक्याप्रमाणें हालतांना दिसत होता.

—शेवंती, तूं त्याच्याशीं लग्न करणार?—नंदानें तिच्या प्रक्षोभक सौंदर्याकडे पहात म्हटलें. हा प्रश्न विचारतांना त्याच्या हृदयाला वेदना झाल्या.

—मला त्याचं भय वाटतं. त्याच्याशीं लग्न झालं तर मी वांचणार देखील नाहीं.—शेवंतीनें कारुण्यपूर्ण नजरेनें म्हटलें.

—कां भय वाटतं त्याचं तुला? बापूंनी त्याला नकार दिला तर तो काय करणार तुझं?—नंदानें तिचें मन शांत करण्याच्या उद्देशानें म्हटलें.

—फार दुष्ट आहे तो. लोक भितात त्याला. त्याच्याशीं वितुष्ट आलेल्यांना तो मारून टाकतो म्हणतात. देवचार त्याला वश आहे.—शेवंतीनें स्त्रीसुलभ श्रद्धेनें म्हटलें.

नंदा धाडसी होता; पण त्याच्या जातींतील बहुतेक स्त्रीपुरुषांप्रमाणें त्याची देवचारावर परम श्रद्धा होती. यामुळें शेवंतीचें म्हणणें त्याला पटलें. तिच्याप्रमाणें तो देखील मनांत भ्याला. रुद्राजीचा दुष्टपणा त्याला ठाऊक होता. सगळे कोळी लोक त्याला मान देत व भिऊन वागत. जादूटोणा करण्यांत तो कुशल आहे, त्याची आसपासच्या गांवांत ख्याति होती. त्या गांवचा देवचार त्याला वश असून त्याच्या इच्छेप्रमाणें तो वागतो, अशी सार्वत्रिक समजूत होती. हें सगळें मनांत येऊन नंदा खिन्न झाला. शेवंतीच्या मनांतील भीति व्यक्त करण्याकरितां त्यानें म्हटलें,—मग आम्हांला तो मारून टाकणार?

आणि या विचारानें त्याच्या हृदयांत धडधड सुरू झाली. त्याच्या त्या पिळदार, घटलेल्या देहांतून भयाची चमक निघून गेली. शेवंतीचें वक्षःस्थळ जोरानें वरखालीं होऊं लागलें. डोळ्यांतील स्वाभाविक निर्भयपणा लुप्त झाला व एकाच भयाच्या भावनेंत दोघेंही धडपडूं लागलीं.

सूर्यबिंब समुद्रांत अदृश्य झालें होतें. संधिप्रकाशाचें रूपान्तर अंधारांत होत होतें. एक मोठें थोरलें वळण घेऊन होडी किनाऱ्याच्या दुसऱ्या बाजूला परतली होती. होडींतून समुद्रांत टाकलेलें जाळें पाण्यांत अर्धवर्तुळ रेखाटून तरंगतांना दिसत होतें आणि दोघांच्याही मनांत एकच भीति तरंगत होती—

—आमचं लग्न झालं तर रुद्राजी आम्हांला मारून टाकणार—

० ० ०

ती सगळी रात्र नंदा झोंपला नाहीं. शेवंतीच्या प्राप्तीकरितां रुद्राजी आपल्याला जादूटोणा करून मारून टाकायला कमी करणार नाहीं, असें त्याला वाटत होतें. तो सशक्त होता; धाडसी होता; व प्रसंग पडला तर द्वंद्वयुद्धांत रुद्राजीला जमिनीवर लोळविण्याइतकें धैर्य आणि ताकद त्याच्या अंगांत होती. पण रुद्राजीचें देवचाराकडे असलेलें सख्य व त्याचें जादूटोण्याचें अजब ज्ञान यांची आठवण

होतांच तो गलितधैर्य होई व सर्वशक्तिमान देवचाराची तो अंतःकरणाच्या कळवळ्यानें प्रार्थना करी,—देवा या संकटांतून तारण्यास तूंच समर्थ आहेस. मी बालक, तूं मायबाप ! तूंच माझें रक्षण कर !

देवचाराच्या प्रार्थनेनें त्याला थोडा धीर आला. दुसऱ्या दिवशीं सकाळींच तो शेवंतीच्या बापाकडे गेला. तिचें घर किनाऱ्यावरील नारळीच्या झाडींत, समुद्राकडे तोंड करून होतें. घराच्या भिंती पोंफळीच्या होत्या. बांबूच्या काठ्यांवर चुडितें झांकून छप्पर केलें होतें. स्वच्छ तुळतुळीत जमिनीवर चित्रविचित्र रंगांचे गुळगुळीत गोटे बसवून निरनिराळ्या आकृति तयार केल्या होत्या. जुन्या जाळ्यांचे फाटलेले तुकडे भिंतींच्या खांचांतून भरले होते. लहान लहान माडांची सावली अंगणांत पडली होती व त्यांच्या खोडांमधून थोड्याच अंतरावर असलेला उतरता किनारा व पुढें पसरलेला समुद्र दिसत होता.

शेवंतीचा बाप बाहेरच बसला होता. नंदाला पाहतांच त्यानें म्हटलें,

—शेवंती, नंदाला बसायला पाट आणून दे.

जवळच्या खोलींतून कंपित, मोहक व प्रेमळ आवाजांत शेवंतीनें म्हटलें,

—बापू, आल्यें हं.

आणि लगेच शेवंती बाहेर आली. हातांतला पाट तिनें ओट्यावर बापूंच्या समोर मांडला आणि उत्सुक नजरेनें व उत्सुक चेहऱ्यानें नंदाकडे पहात ती दारांत उभी राहिली.

नंदा पाटावर बसला. म्हाताऱ्यानें अर्धांगाच्या विकारानें निकामी झालेले पाय जोरानें हलवीत म्हटलें,—नंदा, काल दिसलास नाहीं तूं इथं ? समुद्रांत गेला होतास वाटतं ?

—सायंकाळीं शेवंतीला बरोबर घेऊन जाळं टाकलं व आज सकाळीं घरांतच कांहीं काम होतं म्हणून आलों नाहीं.—नंदानें उत्तर दिलें.

त्याचें सगळें लक्ष शेवंतीकडे होतें. तिची मुद्रा गळलेली दिसत होती. डोळ्यांच्या खालील भाग काळसर बनला होता. समुद्राच्या किनाऱ्यावरील वाऱ्याच्या मधुर झुळकींनें माथ्याचे केंस अव्यवस्थितपणें कपाळावर उडत होते.

—नंदा, कालची खबर तुला शेवंतीनं सांगितलीच असेल !—म्हाताऱ्यानें जड स्वरांत, सावकाश व हळूच म्हटलें.

—कां भय वाटतं त्याचं तुला? बापूंनी त्याला नकार दिला तर तो काय करणार तुझं?—नंदानें तिचें मन शांत करण्याच्या उद्देशानें म्हटलें.

—फार दुष्ट आहे तो. लोक भितात त्याला. त्याच्याशीं वितुष्ट आलेल्यांना तो मारून टाकतो म्हणतात. देवचार त्याला वश आहे.—शेवंतीनें स्त्रीसुलभ श्रद्धेनें म्हटलें.

नंदा धाडसी होता; पण त्याच्या जातींतील बहुतेक स्त्रीपुरुषांप्रमाणें त्याची देवचारावर परम श्रद्धा होती. यामुळें शेवंतीचें म्हणणें त्याला पटलें. तिच्याप्रमाणें तो देखील मनांत भ्याला. रुद्राजीचा दुष्टपणा त्याला ठाऊक होता. सगळे कोळी लोक त्याला मान देत व भिऊन वागत. जादूटोणा करण्यांत तो कुशल आहे, त्याची आसपासच्या गांवांत ख्याति होती. त्या गांवचा देवचार त्याला वश असून त्याच्या इच्छेप्रमाणें तो वागतो, अशी सार्वत्रिक समजूत होती. हें सगळें मनांत येऊन नंदा खिन्न झाला. शेवंतीच्या मनांतील भीति व्यक्त करण्याकरितां त्यानें म्हटलें,—मग आम्हांला तो मारून टाकणार?

आणि या विचारानें त्याच्या हृदयांत धडधड सुरू झाली. त्याच्या त्या पिळदार, घटलेल्या देहांतून भयाची चमक निघून गेली. शेवंतीचें वक्षःस्थळ जोरानें वरखालीं होऊं लागलें. डोळ्यांतील स्वाभाविक निर्भयपणा लुप्त झाला व एकाच भयाच्या भावनेंत दोघेंही धडपडूं लागलीं.

सूर्यबिंब समुद्रांत अदृश्य झालें होतें. संधिप्रकाशाचें रूपान्तर अंधारांत होत होतें. एक मोठें थोरलें वळण घेऊन होडी किनाऱ्याच्या दुसऱ्या बाजूला परतली होती. होडींतून समुद्रांत टाकलेलें जाळें पाण्यांत अर्धवर्तुळ रेखाटून तरंगतांना दिसत होतें आणि दोघांच्याही मनांत एकच भीति तरंगत होती—

—आमचं लग्न झालं तर रुद्राजी आम्हांला मारून टाकणार—

o o o

ती सगळी रात्र नंदा झोंपला नाहीं. शेवंतीच्या प्राप्तीकरितां रुद्राजी आपल्याला जादूटोणा करून मारून टाकायला कमी करणार नाहीं, असें त्याला वाटत होतें. तो सशक्त होता; धाडसी होता; व प्रसंग पडला तर द्वंद्वयुद्धांत रुद्राजीला जमिनीवर लोळविण्याइतकें धैर्य आणि ताकद त्याच्या अंगांत होती. पण रुद्राजीचें देवचाराकडे असलेलें सख्य व त्याचें जादूटोण्याचें अजब ज्ञान यांची आठवण

होतांच तो गलितधैर्य होई व सर्वशक्तिमान देवचाराची तो अंतःकरणाच्या कळवळ्यानें प्रार्थना करी,—देवा या संकटांतून तारण्यास तूंच समर्थ आहेस. मी बालक, तूं मायबाप ! तूंच माझं रक्षण कर !

देवचाराच्या प्रार्थनेनें त्याला थोडा धीर आला. दुसऱ्या दिवशीं सकाळींच तो शेवंतीच्या बापाकडे गेला. तिचें घर किनाऱ्यावरील नारळीच्या झाडींत, समुद्राकडे तोंड करून होतें. घराच्या भिंती पोंफळीच्या होत्या. बांबूच्या काठ्यांवर चुडितें झांकून छप्पर केलें होतें. स्वच्छ तुळतुळीत जमिनीवर चित्रविचित्र रंगांचे गुळगुळीत गोटे बसवून निरनिराळ्या आकृति तयार केल्या होत्या. जुन्या जाळ्यांचे फाटलेले तुकडे भिंतींच्या खांचांतून भरले होते. लहान लहान माडांची सावली अंगणांत पडली होती व त्यांच्या खोडांमधून थोड्याच अंतरावर असलेला उतरता किनारा व पुढें पसरलेला समुद्र दिसत होता.

शेवंतीचा बाप बाहेरच बसला होता. नंदाला पाहतांच त्यानें म्हटलें,

—शेवंती, नंदाला बसायला पाट आणून दे.

जवळच्या खोलींतून कंपित, मोहक व प्रेमळ आवाजांत शेवंतीनें म्हटलें,

—बापू, आल्यें हं.

आणि लगेच शेवंती बाहेर आली. हातांतला पाट तिनें ओट्यावर बापूंच्या समोर मांडला आणि उत्सुक नजरेनें व उत्सुक चेहऱ्यानें नंदाकडे पहात ती दारांत उभी राहिली.

नंदा पाटावर बसला. म्हाताऱ्यानें अर्धांगाच्या विकारानें निकामी झालेले पाय जोरानें हलवीत म्हटलें,—नंदा, काल दिसलास नाहीं तूं इथं ? समुद्रांत गेला होतास वाटतं ?

—सायंकाळीं शेवंतीला बरोबर घेऊन जाळं टाकलं व आज सकाळीं घरांतच कांहीं काम होतं म्हणून आलों नाहीं.—नंदानें उत्तर दिलें.

त्याचें सगळें लक्ष शेवंतीकडे होतें. तिची मुद्रा गळलेली दिसत होती. डोळ्यांच्या खालील भाग काळसर बनला होता. समुद्राच्या किनाऱ्यावरील वाऱ्याच्या मधुर झुळकीनें माथ्याचे केंस अव्यवस्थितपणें कपाळावर उडत होते.

—नंदा, कालची खबर तुला शेवंतीनं सांगितलीच असेल !—म्हाताऱ्यानें जड स्वरांत, सावकाश व हळूच म्हटलें.

नंदानें आपली नजर चटकन् शेवंतीवरून काढून ती म्हाताऱ्याकडे वळवीत म्हटलें,—होय, कळली. आपण काय सांगितलं रुद्राजीला ?

—अजून कांहींच सांगितलं नाहीं त्याला. उद्यां फिरून येणार आहे तो. शेवंतीचं लग्न तुझ्याशीं होणार हें ठाऊक असून सुद्धां त्यानं तिला मागणी घातली आहे.—म्हातारा थोडा वेळ स्तब्ध राहिला. उजव्या तळहातानें त्यानें आपलीं दोन्ही पावलें जोरानें चोळलीं व समुद्राकडे नजर टाकीत तो विचार करूं लागला.

समुद्रसपाटीवर आतां ऊन्ह चमकूं लागलें. मुंबईहून पणजीला जाणारी बोट बऱ्याच अंतरावरून धुराचा लोट सोडीत चालत होती. दूरवर जहाजांचीं शुभ्र शिडें निश्चल दिसत होतीं.

—मग त्याला काय उत्तर देणार तुम्ही ?—नंदानें विचारलें. त्याचें हृदय धडधडलें. त्यानें शेवंतीच्या गोंधळलेल्या मुद्रेकडे पाहिलें, शेवंती उदास व शून्य नजरेनें समुद्राच्या सीमारेषेकडे पहात होती.

—नंदा,—म्हातारा थोडा वेळ थांबून म्हणाला.—तूं शेवंतीला ओळखतोस, आणि मी तुला ओळखतों. तिला आई नाहीं. लहानपणापासून तुझ्या मैत्रींत ती वाढली आहे. तिच्या सुखापेक्षां मला दुसरं काय प्रिय आहे ? तिच्या इच्छेविरुद्ध मी तिला रुद्राजीला कशी देऊन टाकीन ? आणि आतांपर्यंत तूं आमच्यावर केलेल्या उपकारांतून उतराई होण्याला माझ्याजवळ दुसरं काय साधन आहे ?—म्हाताऱ्याचा स्वर प्रेमळ व आर्द्र झाला. बायकोची स्मृति, आपलें दुखणें व नंदानें गेल्या दोन वर्षांत वेळोवेळीं केलेलें सहाय्य या सगळ्या गोष्टी मनांत उभ्या राहून त्याचा कंठ दाटून आला.

त्यानें डबडबलेल्या डोळ्यांनीं शेवंती व नंदा यांच्याकडे पाहून पुढें म्हटलें,

—मी पेचांत सांपडलों आहें. मी माझ्याकरितां भीत नाहीं. तुम्हांला तो संकटांत घालील म्हणून माझं मन कळवळतं आहे. तो फार दुष्ट आहे.

नंदा घाबरला. शेवंती रुद्राजीच्या हातांत पडणार म्हणून जी तळमळ त्याला लागली होती ती म्हाताऱ्याच्या आश्वासनानें नष्ट झाली, पण रुद्राजीचा दुष्टपणा आठवून त्याच्या हृदयाला चरका बसला. शेवंती तितकी भ्याली नाहीं. ‘आपला दैवचार आपणास निष्कारण त्रास देण्याइतका वाईट नाहीं; शिवाय, आपल्यापुढें बसलेला सशक्त, धिप्पाड व धाडसी नंदा रुद्राजीला दाद देणार नाहीं. त्यानें आपल्याला

त्या भरदार बाहूंत आवळल्यावर मला कुणाचेंच भय नाहीं.' जवळच लाटांवर खेळणाऱ्या फेंसाप्रमाणें तिची भीति सुखस्वप्नांत विलीन झाली.

म्हातारा गुडगुडी ओढून झाल्यावर पुढें बोलूं लागला,—पण तुम्हांला भिण्याचं कारण नाहीं. देवचाराची कृपा असली म्हणजे तुम्हांला कोणी कांहीच करूं शकणार नाहीं.—आवाज अगदीं हलका करून व आसपास पाहून त्यानें पुढें म्हटलें,—माझ्या हांकेला देवचार पावलेला आहे. मोठमोठ्या प्रसंगांतून अगदीं अकल्पितपणें त्यानं मला तारलेलं आहे. रुद्राजीनं तुमच्याविरुद्ध कांहीही केलं तरी माझ्या नवसाकडे व तुमच्या श्रद्धेकडे देवचार दुर्लक्ष करणार नाहीं. त्याच्यावर विश्वास ठेवून वागा.

म्हाताऱ्याच्या शब्दांनी नंदाला देवचाराच्या बरेपणाची खात्री पटली. त्याच्या मनांतली नसती भीति कांहीं अंशीं दूर झाली. नवस केले, मनोभावानें प्रार्थना केली, तर देवचार आमचं कांहींच वाईट करणार नाहीं व रुद्राजीला करूं देणार नाहीं...त्याच्या मनानें त्याला धीर दिला.

शेवंतीचा चेहरा आतां प्रफुल्लित दिसूं लागला. संकट अकस्मात् पुढें उभें राहतांच मनुष्य गांगरून जावा, पण थोडा विचार करतांच आपल्या सुटकेचा मार्ग सुचल्यामुळें त्याला वेगळाच आनंद व्हावा, तशी स्थिति शेवंतीची झाली.

समुद्राच्या वाऱ्यानें तिचे मोकळे केंस उडत होते. नारळीच्या चुडितांची आनंदोत्पादक सळसळ बाहेर चालू होती. अर्ध्याअधिक किनाऱ्यावर ऊन्ह पडलें होतें. समुद्राच्या लाटा, तोंडांतून हास्याचे फवारे टाकीत जमिनीकडे धांवून येत होत्या. आणि शेवंती व नंदा, एक मोठें संकट टळलें अशा भावनेच्या आवेगांत एकाच आनंदाचा उपभोग घेत एकमेकांकडे अभिलाषी डोळ्यांनी पहात होतीं.

० ० ०

म्हाताऱ्यानें रुद्राजीला नकार कळविल्यावर दुसऱ्या दिवशीं नंदा फिरून शेवंतीच्या घराकडे गेला. म्हातारा चिंताग्रस्त दिसला. त्यानें नंदाला म्हटलें,—नंदा, रुद्राजीची मागणीं मीं काल नाकारली. तो पुष्कळ चरफडला. तुला या जगांतून नाहींसा करण्याचं भय देखील घातलं त्यानं. तुमचं लग्न होण्यापूर्वी तो कोणतं तरी विघ्न उपस्थित करील. देवचार त्याला वश आहे. त्याच्या बळावर तो आपल्या शत्रूंचें वाईट करितो म्हणतात; पण तुम्ही भिण्याचं कारण नाहीं. मीं देवचाराला

आळविला आहे. तुम्ही दोघंही आज रात्रौ गांवच्या सीमेवर असलेल्या पिंपळाजवळ जा व देवचाराला एक कोंबडा, एक दारूची बाटली, एक बांबूची काठी, दोन मोठ्या विड्या, एक तांदळाच्या पिठाचा रोट व एक तांबडा रुमाल इतकें सामान नेऊन तेथें ठेवा व कसल्याही जादूटोण्याविरुद्ध आपलें रक्षण करण्याबद्दल देवचाराकडे मागणें करा. तो सर्व कांहीं जाणतो. त्याच्या कृपेनं तुमचं कांहीच वाईट होणार नाहीं.

म्हाताऱ्याच्या या उद्गारांनी नंदाला धीर आला. बाजारांत जाऊन त्यानें सामान आणलें व सूर्यास्तापूर्वी तो शेवंतीकडे आला.

शेवंती लुगडें नेसून बसली होती. कपाळाला कुंकवाचा उभा पट्टा लावला होता. माथ्यांत पांढरीं फुलें खोंवलीं होतीं व तिच्या चेहऱ्यावर भीति, श्रद्धा, उत्सुकता, आनंद, अशा वेगवेगळ्या भावनांचा खेळ चालला होता.

म्हाताऱ्यानें म्हटलें,—नंदा, तुम्हांला परत येतांना रात्र होईल. बरोबर चूड न्या.

नंदानें बरोबर आणलेलें सामान खालीं ठेवलें, शेवंतीनें आणलेला कोयता हातांत घेतला आणि दोन सुकीं चुडितें कातरून व तीं बांधून, दोन चुडी तयार केल्या. शेवंतीनें घरांत जाऊन एक टोपली आणली व तींत सगळें सामान घातलें. नंदानें उजव्या हातांत कोयता घेतला व डाव्या हातांत कोंबडा धरला. त्याच्या मनांत कोणती तरी शंका उद्भवली. त्यानें म्हटलें,—बापू, तुम्हीं देवचार पाहिला आहे ?—या प्रश्नाचा हेतु जिज्ञासातृप्ति नसून, मनांतलें भय घालवावें हा होता.

म्हाताऱ्यानें म्हटलें—हो, पाहिला आहे तर ? आठ पंधरा दिवसांनी या बाजूनें मध्यरात्रीं देवचार फिरतांना मला नेमानें दिसतो.

—वाटेंत भेटला तर तो मारून टाकतो म्हणतात तें खरं का ?—नंदानें पुढें म्हटलें. त्याच्या हृदयांत देवचाराच्या भयानें ठाणें दिलें होतें.

—कुणीं सांगितलं तुला हें ? वाईट मनुष्यांना तो शासन करितो; पण चांगल्यांना उपयोगी पडतो. चार वर्षांपूर्वी मला गांवांत येतांना एका रानांत रात्र झाली. रस्ता अनोळखी, सगळीकडे अंधार आणि बरोबर कोणी नाहीं. मी फार भिऊन गेलों व देवचाराची आठवण काढली. इतक्यांत माझ्यापुढं एक म्हातारा

पेटलेली चूड हातांत घेऊन जात असलेला मला दिसला. त्या किनाऱ्यापर्यंत त्यानं मला आणून सोडलं व तो अदृश्य झाला. देवचार होता तो !

नंदाचें भय दुणावलें. आज रात्रीं त्या रानांत देवचार आपणाला दिसला तर ? या विचाराबरोबर त्याच्या अंगावर शहारे आले. त्याच्या कपाळाला घाम आला.

—रविवारीं आणखी लोक जातात ना तिथं ?—मनांतलें भय दडपून टाकण्याचा शक्य तितका प्रयत्न करून त्यानें म्हटलें.

—नवस फेडण्याकरतां आज कोणी ना कोणी तिथं जातंच. परत येतांना तुम्हांला कोणाची तरी सोबत मिळेल.—म्हाताऱ्यानें म्हटलें. त्याला नंदाच्या भयग्रस्त मनाची कल्पना नव्हती.

डोकीवर सामानानें भरलेली टोपली घेऊन शेवंती वाटेवर उभी होती. तिनें नंदाकडे पहात म्हटलें,—इथंच सांज होईल आपल्याला. तिकडून परत आल्यानंतर सावकाश बोलत बसूं.

शेवंतीची ही सूचना ऐकून नंदा चालूं लागला. त्याच्या मागोमाग उत्सुक मनानें शेवंती चालूं लागली.

कांहीं वेळपर्यंत तीं समुद्रकिनाऱ्यानें चालत होतीं. नंदाच्या हातांत असलेला कोंबडा सुटण्याकरितां धडपडत होता. त्याच्या हातांतली सुरी सूर्यकिरणांत चमकत होती. तांबडें सूर्यबिंब समुद्राच्या आड होण्याच्या बेतांत होतें. दूरवर वाऱ्यानें भरलेलीं शिडें उभवीत जहाजें जात होतीं.

नंदा विरोधी भावनांच्या पकडींत सांपडला होता. समुद्र खवळलेला असला म्हणजे मासळी मारण्याकरितां जाणाऱ्या कोळ्याची जशी द्विधा स्थिति होते, तशाच स्थितींत नंदा सांपडला होता. देवचार मोठा शक्तिमान् खरा; पण तो भयप्रद आहे, असें त्याला वाटत होतें. गांवच्या शिवेवरील त्या दाट झाडींत अकस्मात् त्याचें दर्शन घडलें तर आपली स्थिति कठीण होईल, ही भीति त्याला अस्वस्थ करीत होती.

शेवंतीचें मन कांहींशा गूढ गोष्टींनीं भरलें होतें. देवचार चांगला; पण तो आपलें मागणें ऐकेल कीं नाहीं, रुद्राजी आपलं वाईट करण्याकरितां काय जादूटोणा करील, इत्यादि गोष्टी जाणण्याची तिला उत्सुकता लागली होती. भीतीपेक्षां अद्भुतरम्यतेनेंच तिचें मन जास्त भरून गेलें होतें.

किनाऱ्याच्या बाजूनें बराच वेळ चालून गेल्यावर, त्यांनी नारळीच्या झाडींतून डोंगराच्या दिशेनें चालण्यास सुरवात केली. नंदा पुढें चालत होता व त्याच्यामागून शेवंती जात होती. दोघांच्या मनांत देवचारासंबंधीं विचार चालू होते व हृदयें वेगानें धडधडत होतीं.

नारळीची झाडी संपली. पुढील वाट डोंगरामधून गेलेली होती. सभोंवतालचा देखावा आतां भयाण दिसूं लागला. देवचारावर दोघांचीही भक्ति होती. त्याच्या शिवाय तीं इतर देवांना ओळखत नसत हें खरें, पण देवचाराबद्दल त्यांच्या मनांत एक प्रकारची भीति उत्पन्न झाली. देवचाराच्या हकीगती त्यांनी ऐकल्या होत्या व त्याचें बारीकसारीक वर्णन त्यांनी विश्वासू मनुष्यांच्या तोंडून ऐकलें होतें. पण आतां त्याचें प्रत्यक्ष दर्शन होणार या कल्पनेनें, त्यांचें मन भयभीत होऊं लागलें. भोंवतालीं पसरलेलीं झाडें रात्रीच्या अंधारांत विलीन होऊं लागलीं होतीं. एक प्रकारची गंभीर गाढ शांतता जमिनीवर उतरत होती. डोंगराच्या पायथ्याशीं असलेली झाडी भयप्रद दिसत होती व त्यापलीकडे समुद्र दिसत होता.

नंदा सावकाश भीत भीत पावलें टाकीत होता. शेवंती घाबरली होती. चालतांना तो चौफेर बारीक रीतीनें न्याहाळून पहात होता. झाडीच्या आंतून देवचार अकस्मात् आपणास दिसणार नाहीं ना, अशी शंका त्याला अस्वस्थ करीत होती. त्यांच्यापैकीं कोणीच बोलत नव्हतें.

कांही वेळानें तीं गांवच्या शिवेजवळ असलेल्या प्रचंड पिंपळाच्या वृक्षाखालीं पोंचलीं. आसपास दाट झाडी होती. मोडक्या पारावर, पिंपळाच्या खोडांत तांबड्या फडक्यांच्या गुंड्या रोंवल्या होत्या. पिंपळाच्या मुळांवर पिंजर सांडली होती. नारळाच्या नरोट्या, लहानमोठ्या विड्या, चारपांच हात लांबीचे बांबूचे तुकडे, दांडे, बांबूच्या कामट्यांच्या लहानमोठ्या आकाराच्या टोपल्या, कोंबड्यांचीं पिसें इत्यादि वस्तू अव्यवस्थितपणें पडलेल्या दिसत होत्या. मातीची पणती मिणमिण तेवत होती.

जागा अगदीं निर्जन व वातावरण भयजनक होतें. नंदाच्या भीतींत आणखी भर पडली. समुद्रांतलें त्याचें धाडस त्याला उपयोगी पडलें नाहीं. पिंपळाच्या वृक्षांवरील फांद्यांवर देवचार बसला नसेल ना, व रुद्राजीनें त्याला आपलें वाईट करण्यास सांगितलें असल्यास, तो खालीं उतरून आपणा दोघांसही अदृश्य करून

टाकणार नाहीं ना, इत्यादि विचित्र कल्पना त्याच्या मस्तकांत थैमान घालूं लागल्या. त्याच्या कपाळाच्या शिरा ताड्ताड् उडूं लागल्या, मस्तक रक्तानें भरल्यासारखें वाटूं लागलें. हातपाय कांपूं लागले.

त्यानें घाईघाईनें पिंपळाच्या पारावर साष्टांग नमस्कार घातला. शेवंतीनें त्याचें अनुकरण केलें. मग त्यानें दारूची बाटली नरोटींत ओतून ती वृक्षाच्या मुळावर ठेवली. विड्या वाहिल्या, खोडाला टेंकून बांबूची काठी ठेवली. व शेवंतीच्या हातून सुरी घेऊन तो खालीं उतरला. दोन्ही हात जोडून त्यानें फिरून देवचाराची प्रार्थना केली व कोंबड्याची मान कापून त्यानें त्याचें रक्त वृक्षाच्या मुळांवर टाकलें.

अंधार जास्त पडला होता. शेवंतीनें आगपेटीवर काडी ओढली व तेलानें भरलेली दुसरी पणती पेटविली. त्या अंधुक प्रकाशांत भोंवतालचा देखावा जास्तच भयाण दिसूं लागला. रातकिड्यांचा कर्णकठोर आवाज ऐकूं येऊं लागला. केव्हां एकदां घरीं पोहोंचू असें नंदाला झालें. त्यानें शेवंतीला हळूच म्हटलें,

—ती चूड पेटव. आपण आतां घरीं जाऊं.

नंदाच्या आवाजांतील भीति, त्याच्या मुद्रेवर दिसणारा करुण दुःखी भाव पाहून शेवंती अधिकच भ्याली. तिनें कांपऱ्या हातांनी पणतीच्या दिव्यावर चूड पेटविली. नंदानें कोंबड्याचें धड हातांत घेतलें, उजव्या हातांत चूड धरली, व देवचाराला फिरून एकदां नमस्कार करून तीं चालूं लागलीं.

रस्त्याच्या वळणावर दुरून त्यांना प्रकाश दिसला. नंदाची भीतीनें गाळण उडाली. शेवंती पाठीमागून त्याला बिलगली. प्रकाश जवळ आला व एक मोठी चूड स्पष्ट दिसली. नंदाला वाटलें खात्रीनें देवचार येत आहे. रविवारची रात्र म्हणजे त्याची फिरतीची वेळ ! नंदा वाटेंतच थबकला.

चूड अगदीं जवळ आली व त्या धगधगीत तांबड्या प्रकाशांत नंदाला व शेवंतीला रुद्राजीची मूर्ति दिसली ! प्रत्यक्ष देवचार देखील इतका उग्र व भयानक दिसत नसेल ! खांद्यावर काळी कांबळ टाकलेली, कपाळावर शुभ्र गंधाचा टिळा, मिशांचे जाड कल्ले भेसूरपणें सगळ्या गालांवर पसरलेले, हातांत कोंबडा घेतलेला असा तो अवतार पाहून नंदाचा उरलेला धीर खचला. त्या बावरलेल्या स्थितींतही त्याला वाटलें कीं, देवचार व रुद्राजी हे एकच आहेत ! आणि ज्यावेळीं रुद्राजीनें चूड उभारून आपल्या बटबटीत धुंद डोळ्यांनीं त्यांच्याकडे पाहिलें

त्या वेळीं त्याची भयानक, रौद्र मुद्रा पाहून शेवंतीनें बारीक किंकाळी फोडून नंदाला मिठी मारली !

० ० ०

मोठ्या प्रयासानें भीतीचा कोंडमारा करून नंदा व शेवंती घराकडे पोंचलीं. नंदाची खात्री झाली कीं, रुद्राजीला देवचार वश आहे, व त्यानें आपल्याविरुद्ध भयंकर जादुटोणा केला आहे. त्याचे हातपाय लपपटूं लागले, मस्तक तप्त, बधिर झालें व थोड्याच वेळांत त्याला भयंकर ताप भरला.

नंदाची स्थिति पाहून शेवंतीची अवस्था केंविलवाणी झाली. तिला वाटलें आपला नंदा आपणाला आतां खचित अंतरणार. ती रडली, नंदाच्या उशागत बसून तिनें देवचाराची प्रार्थना केली. त्याला दोष दिला. एकदां तिच्या मनांत आलें कीं, थेट रुद्राजीकडे जाऊन त्याच्या पायांवर घालून घ्यावें. त्याच्याकडे नंदाच्या आयुष्याची भीक मागावी. त्याच्याशीं लग्न करण्याला देखील तयार व्हावें, सगळें सगळें करावें. परंतु, नंदा बरा झाल्यावर रुद्राजीशीं आपणाला लग्न करावें लागेल या विचारानें तिच्या सगळ्या देहांतून भयानें चमक निघून गेली.

शेवंतीचा बाप अश्रू ढाळीत बसला होता. भयंकर तुफानांत होडी सांपडून ती उलटली तरी तो इतका डगमगला नसता. नंदाला आतां काय करणार? तो बडबडत होता, त्याची स्थिति वेड्याप्रमाणें करुणाजनक झाली होती.

राकेलचा दिवा धूर टाकीत भेसूरपणें जवळच जळत होता. धुरकट रंगाच्या ढगांत चंद्रबिंब लपलें होतें. अंधारांत समुद्राची भेसूर गर्जना ऐकूं येत होती व त्याच्या लाटांवर चकाकणाऱ्या फेंसाच्या माळा जुन्या ग्रंथांतून वर्णन केलेल्या राक्षसांच्या अक्राळविक्राळ दाढांप्रमाणें दिसत होत्या.

म्हाताऱ्याला वाटलें ही काळरात्र आहे. उद्यांचा दिवस नंदाला कांहीं दिसणार नाहीं.

मध्यरात्र उलटली. म्हातारा बसल्या जागींच डुलक्या घेऊं लागला. शेवंतीचे डोळे रडून रडून सुजले व जड झाले. नंदाच्या चेहऱ्याकडे पहात ती भेसूर प्रकाशांत बसली होती.

इतक्यांत खोलीच्या दारांत तिला एका पुरुषाची आकृति दिसली. ती बरीच उंच होती. रंग काळा कुळकुळीत होता. खांद्यावर काळी कांबळ टाकली होती.

हातांत एक भला मोठा दांडा होता. मस्तकावर जटा दिसत होत्या. अन् चेहरा भयानक व उग्र दिसत होता. त्याला पहातांच शेवंतीला वाटलें कीं, प्रत्यक्ष देवचार नंदाला नेण्याकरितां आला आहे. ती धडपडून उठली. तिनें किंकाळी मारण्याकरितां तोंड उघडलें पण आवाज ऐकूं आला नाहीं.

तो पुरुष कांही पावलें टाकून पुढें सरकला. व हाताच्या खुणेनें त्यानें तिला धीर दिला. आणि आपल्यामागें येण्यावद्दल सुचविलें. शेवंतीची जाणीव नष्ट झाली; कोणत्या तरी शक्तीनें आपलें भय, आपली विचारशक्ति नष्ट होत आहे, असें तिला वाटलें. सावलीप्रमाणें ती त्याच्या मागोमाग चालूं लागली.

चंद्राची कोर ढगांच्या आडून फिक्कट व अस्पष्ट प्रकाश खालीं पसरीत होती. समुद्राच्या पाण्याशेजारीं बसून दिवसेंदिवस झिजत जाणारे काळे खडक स्पष्ट दिसत होते.

तो पुरुष किनाऱ्यावरील वाळूंतून चालूं लागला. त्याच्या पायांत जाड वहाणा होत्या, पण त्यांचा आवाज होत नव्हता व वाळूवर त्यांचे ठसे उमटत नव्हते. त्या एवढ्या मोठ्या देहाची सावली पडत नव्हती. एखादी सावलीच सावकाश जावी त्याचप्रमाणें तो चालत होता. आणि त्याच्यामागें शेवंती पिशाच्चाप्रमाणें चालत होती.

तो पुरुष, आगेंमागें न पहातां, एकाच पद्धतीनें, गंभीरपणें चालत होता. शेवंतीला आसपाचा देखावा स्पष्टपणें दिसत होता.

शिवेवरील पिंपळाजवळ पोंचतांच तो पुरुष थोडा वेळ थांवला. नंतर पिंपळाला एक वळसा घालून तो एका दगडापाशीं आला. व तो दगड हातांनी दूर करण्यास त्यानें शेवंतीला सांगितलें. तिनें दोन्ही हातांनीं दगड दूर केला व आंतील माती उकरून काढली; तेव्हां आंत दोन अंडीं, सुया टोंचलेलीं दोन लिंबें, कोंबड्याचें एक पिल्लूं इतक्या वस्तू तिला दिसून आल्या. त्या पुरुषानें खूण करितांच तिनें त्या सगळ्या वस्तू हातांत घेतल्या व त्याच्या मागोमाग ती चालूं लागली.

आतां चंद्र स्पष्ट दिसत होता. त्या मधुर चांदण्यांत, समुद्राचा देखावा गंभीर आणि उदात्त दिसत होता. लाटांवरील फेंस हिऱ्यामोत्यांच्या लांबच लांब हारांप्रमाणें शोभत होता. समुद्रांत दूरवर गेलेल्या दोन टेंकड्या, तपस्व्यांप्रमाणें लाटांचे प्रहार सहन करीत निश्चल होत्या.

शेवंतीचें मन भयभीत झालें होतें. नंदाच्या संरक्षणाशिवाय तिला दुसरें कांहीच दिसत नव्हतें. देवचारावर सगळा भरिभार टाकून ती चालत होती.

गांवांत पोंचल्यावर तो पुरुष रुद्राजीच्या घराशीं थांबला व त्यानें शेवंतीला खूण केली. शेवंतीनें हातांतल्या वस्तु बाहेर ओट्यावर निजलेल्या रुद्राजीच्या उशा-शेजारीं नेऊन ठेवल्या. इतकें झाल्यावर तीं तेथून परतलीं व शेवंतीच्या घराकडे आलीं.

तो पुरुष शेवंतीच्या घरांत शिरला. खोलींत राकेलचा दिवा अजून जळत होता. नंदाच्या नाकातोंडांतून एक प्रकारचा भयप्रद आवाज निघत होता. तो पुरुष त्याच्याजवळ गेला व त्याच्या कपाळाला त्यानें कांहींसें चोळलें. नंदानें डोळे उघडले व किंकाळी मारली.

किंकाळी कानीं पडतांच अर्धवट झोपेंत असलेली शेवंती खडबडून जागी झाली. तिनें त्या खोलींत आसपास शोधक नजरेनें पाहिलें; पण तेथें कोणीच नव्हतें. नंदाच्या कपाळावर अंगाऱ्याची बारीक रेघ ओढलेली दिसत होती. तो उठून बसला होता व त्याच्या अंगांतून घामाच्या धारा निथळत होत्या.

घडलेल्या प्रकारामुळें ती आश्चर्यमूढ बनली. स्वप्नांत घडलेला प्रकार तिला खराच वाटत होता.

नंदा म्हणाला,—स्वप्नांत मला देवचार दिसला व त्यानें माझ्या कपाळाला अंगारा लावला. मी भीतीनें ओरडलों.

शेवंतीनें त्याच्या कपाळावर हात ठेवून पाहिला तों त्याचा ताप उतरला होता. त्याच्या चेहऱ्यावरील थोड्या वेळापूर्वीची भयप्रद छाया नष्ट झाली होती व तेथें आनंद झळकत होता.

दुसऱ्या दिवशीं नंदा साफ बरा झाला. पण सगळीकडे अशी बातमी पसरली कीं, पहांटेला रुद्राजी रक्त ओकून मेला व त्याच्या शेजारीं दोन लिंबें, दोन अंडीं व कोंबडीचें मेलेलें पिल्लूं इतकें सामान आढळलें !

ले.—डिसेंबर १९३१
प्र.—रत्नाकर, १९३२

## साक्षात्कार

# तिचा उद्धार

मेंदोंस आज आनंदी असावयाचा. कारण आजच त्याला पाद्र्याचा डिप्लोमा मिळून त्याची नेमणूक बार्देश तालुक्यांतील एका गांवांत झाली होती. पण उदासीन स्थितींतच तो आज फिरायला निघाला होता.

आसपासच्या आम्रवृक्षांना हिरवे तांबडे आंबे लागले होते. माडांच्या झाडांना नारळांच्या पेंद्या लटकत होत्या. डाव्या बाजूच्या वांयगणांतील शेतांत नुकतींच मधुर कणसें फुललीं होतीं. रायतुरच्या धक्क्यावर कित्येक स्त्रिया आपल्या गोजिरवाण्या मुलांना घेऊन फिरत होत्या.

हें दृश्य पाहून व सेमिनारीच्या* रैतोरनीं× केलेला उपदेश लक्षांत घेऊन त्याला वाटलें कीं पाद्री होऊन आपण फार मोठी चूक केली. निसर्गाच्या क्रमाविरुद्ध आपणाला वागतां येईल काय? रैतोरनीं सांगितलें कीं, जगांत जास्त घातक अशी वस्तु म्हणजे स्त्री. तिचा मोह ज्याला पडला तो पशू ठरला. या मोहापासून जगाची सुटका करून त्याला परमेश्वराकडे नेण्याची खटपट करणें हें पाद्र्याचें कार्य. पण म्हाताऱ्याची ही सांगणी खरी आहे का ?

स्त्रीमुळेंच पुरुषांच्या भावनांना मार्दव व उदात्तता येत नाहीं काय? तिच्याशिवाय पुरुषांचें अस्तित्व या जगांत नीरस, कंटाळवाणें व पुरुषार्थहीन ठरणार नाहीं काय ? पुरुषाच्या भावनांचें समाधान स्त्रीच करूं जाणे ! स्त्री ही घातकी आहे असें म्हणणें सोपें; पण तिचा मोह टाळणें ही गोष्ट अशक्य आहे.

---

* सेमिनारी—धार्मिक शिक्षण देऊन पाद्री तयार करणारी संस्था. × रैतोर—रेक्टर, सेमिनारीचा प्रिन्सिपॉल.

आजन्म ब्रह्मचर्य पाळण्याची प्रतिज्ञा मीं केली खरी; पण ती माझ्याकडून पाळली जाईल का ? माझें वय अजून पंचविशीच्या पलीकडे गेलेलें नाहीं; पण स्त्रीच्या सहवासाकरितां माझ्या मनाची तळमळ चालली आहे.

लहानपणींच मला हें सगळें कळतें तर हें शिक्षण घेऊन मीं माझें आयुष्य असें वांया दवडलें नसतें. लहानपणीं माझ्याकडे पाहून आई कौतुकानें म्हणे, " आमचा मेंदोंस किती देवमाणूस ! आम्ही त्याला पाद्री करणार ! आमच्या घरांत डॉक्टर आहे, वकील आहे, पण पाद्री नाहीं. मेंदोंसला देवाची आवड ! तोच पाद्री व्हायला लायक. " मलाही हें ऐकून फार आनंद होई. पाद्री होणें यासारखी मोठेपणाची दुसरी कोणती गोष्ट आहे ! असें मला मनापासून वाटे.

मीं चवदा वर्षांच्या वयावर इथें शिकायला आलों. माझा पूर्वीचा पोषाख गेला व एका काळ्या लांब डगल्यांत मला फिरावें लागलें. नेहमीं तोच काळा डगला ! पाद्र्याचें आयुष्य त्या काळ्या डगल्याप्रमाणेंच नीरस व काळेंकुट्ट असतें याचें तें निदर्शक होतें काय ?

माझ्या माथ्याचे कांही केंस वस्तऱ्यानें काढण्यांत येऊन मला विद्रूप करण्यांत आलें. त्या वेळीं मला काय ठाऊक, कीं जगांतील सौंदर्य, आनंद उपभोगण्याची प्रवृत्ति नष्ट व्हावी म्हणूनच हा सगळा खटाटोप करण्यांत येतो !

आतांपर्यंत लागलेले शोध, शेंकडो महात्म्यांनी उलगडलेलें शास्त्रीय सत्य, जगांतील आनंदाची, सुखाची, पुरुषार्थाची बाजू, या सगळ्या गोष्टी आपल्यापासून लपवून ठेवण्यांत आल्या, व दोन हजार वर्षांपूर्वीच्या नीतिकल्पना, धर्मतत्त्वें व धर्माचार यांचें आपणाला शिक्षण देण्यांत आलें, आणि पर्यायानें असें शिकविण्यांत आलें, कीं या जगांत पाद्र्यानें दांभिक बनलें पाहिजे.

मी तरी मनुष्यच नाहीं का ! रैतोरनी सांगितल्याप्रमाणें वागणें मला शक्य नाही.

या प्रकारच्या विचारांनी त्याचें मस्तक भणाणून गेलें. त्या रात्रीं त्याला झोंप लागली नाही.

० ० ०

दुसऱ्या दिवशीं पाद्री मेंदोंस आपली नेमणूक झालेल्या गांवांत आला. साळगांवच्या ख्रिस्ती लोकांनी त्याचें फार प्रेमानें स्वागत केलें. पाद्री म्हणजे देवासमान असें मानणाऱ्या अशिक्षित लोकांनी फटाकडे देखील जाळले. ख्रिस्त प्रभूची

ज्याचेवर कृपा झाली तोच धन्य मनुष्य पाद्री होऊं शकतो, अशी त्यांची समजूत असल्यामुळें, मेंदोसाशीं ओळख करून घेण्याकरितां प्रत्येक ख्रिश्चन धडपडूं लागला. ख्रिश्चन तरुणी तर फारच आनंदित दिसल्या. मेंदोसची ती बारीक व नाजुक देहयष्टि, मिशा काढल्यामुळें निर्मळ दिसणारा तो किंचित् लांबट व मधुर चेहरा, हंसतांना जिवणीची होणारी ठेवण, बोलण्याचालण्यांतील मोहक गांभीर्य, खालचा ओंठ दांतांखालीं दाबून आपल्या बारीक काळ्याभोर भुंवया वर सरकविण्याची संवय, हें सगळेंच तरुण कुमारिकांना व विवाहित स्त्रियांना आपआपसांत कुजबुजण्याला पुरेसें कारण होतें.

मेंदोंसला पाहतांच कांहीं स्त्रियांनी म्हटलें देखील,—पाद्री असावा तर असा ! ख्रिस्त प्रभूशीं तादात्म्य व्हायला असलाच पाद्री हवा. नाहींतर पूर्वींचे पाद्री ! साठ वर्षांचें म्हातारें खांड ! बोलायला देखील येत नव्हतें त्याला. खालचा ओंठ हनुवटीवर गळलेला; त्यावरून लाळीचे ओघळ वाहात असलेले; तो लांब काळा मळकट डगला; तें पुढें आलेलें पोट; सुजल्याप्रमाणें लवलबीत चेहरा; झोंपेनें पेंगल्याप्रमाणें त्याचे ते अर्धवट झांकलेला डोळे. हीं पाहून आम्हांला बाई त्याची कींव येई !

दुसऱ्या दिवशीं आदितवार असल्यामुळें मेंदोंस आठ वाजण्यापूर्वींच इग्रेजींत * हजर झाला. तो आधींच रुबाबदार व सुंदर दिसत होता. पण आज त्यानें जास्त सुंदर दिसायला फार काळजी घेतली होती.

त्याच्या मदतनिसानें "मिसा"×ची एकंदर तयारी करून ठेविली होती. त्यानें इग्रेजीच्या प्रशस्त आवारांत आपली नजर फिरविली, तेव्हां त्याला दिसून आलें कीं, शेंकडों लोक जमिनीला गुडघे टेंकून आतुरतेनें आपल्या मिसाची वाट पहात आहेत. विशेषतः, पुष्कळशा तरुणी प्रफुल्लित चेहऱ्यानें आपल्याकडे पहात आहेत. निरनिराळ्या सुंदर वेशभूषांनीं सजलेले ते सुकुमार तरुणींचे देह पाहून मेंदोसला धन्यता वाटली व आपली इच्छा असली तर आपणाला इतरांप्रमाणेंच आयुष्याचा उपभोग घेतां येईल, या कल्पनेनें त्याला फार आनंद झाला.

मिसाचा धार्मिक विधि आटोपल्यानंतर तो वेदीवर येऊन उभा राहिला. आपले दोन्ही हात छातीवर धरून, चेहरा आकाशाकडे वर करून तोंडांतल्या तोंडांत पुटपुटत त्यानें परमेश्वराची प्रार्थना केली.

---

* इग्रेज—चर्च. × मिस—रविवारीं सकाळीं चर्चमध्यें होणारा धार्मिक विधि.

श्रोत्यांचे डोळे त्याच्या चेहऱ्यावर स्थिर झाले. या नवीन पाद्र्याच्या तोंडून आपल्याला कसला उपदेश ऐकावयाला मिळतो, या आशेनें सगळ्यांचीं श्रवणेंद्रियें उत्कंठित झालीं.

आपल्या गंभीर चेहऱ्यावर हळुहळू जास्तच गांभीर्य आणीत त्यानें प्रवचन सांगावयला सुरवात केली.

तो त्यागासंबंधीं बोलला.—त्यागाशिवाय परमेश्वर मिळत नाहीं, ख्रिस्त एवढा मोठा दैवी पुरुष, पण त्याला देखील क्रॉसवर मरावें लागलें. मनुष्य-जातीकरतां त्यानें आपलें प्राणार्पण केलें खरें; पण परमेश्वराच्या राज्यांत त्याला अढळपद मिळालें, व मानवजातीच्या हृदयांत त्याला कायमचें स्थान मिळालें. दर घटकेला परमेश्वर आपणाला हेंच सांगत आहे, कीं आपल्या सत्पुत्रा-प्रमाणें तुम्ही सर्वस्वाचा त्याग करा. पण आमच्याकडून त्याग कसला होणार! स्त्री व पैसा यांच्यामागें लागलेले आम्ही लोक परमेश्वराकरितां कसला त्याग करणार! स्त्रीचा मोह मोठा कठीण आहे. परमेश्वरप्राप्तीपासून मनुष्याला परावृत्त करून त्याला नरकांत लोटणारी स्त्रीसारखी दुसरी कोणती शक्ति आहे? म्हणूनच, धर्मग्रंथांत ख्रिस्तानें म्हटलें आहे, कीं परमेश्वर हवा असेल तर माझ्याबरोबर ये. पक्ष्याला जड धोंडा बांधला म्हणजे त्याला जसें आकाशांत उड्डाण करितां येत नाहीं, तसेंच स्त्रीला बरोबर घेऊन तुम्हांला देवाच्या राज्यांत प्रवेश मिळणार नाहीं. परमेश्वरानें मनुष्याच्या सोबतीला स्त्री उत्पन्न केली व तेव्हांपासून नंदन-वनाचा नरक बनला. स्त्री म्हणजे भयंकर "तेंतासांव."* परमेश्वराच्या कार्याचा विध्वंस करण्याकरितां परमेश्वरानें ही कृत्या उत्पन्न केली.

वरील अर्थाचें मेंदोसनें भाषण केलें. त्याचा तो भावनापूर्ण आवाज, उंच मूर्ति, गंभीर चेहरा, बोलतांना अर्थानुरूप हावभाव करण्याची पद्धत, मधूनमधून मानव-जातीच्या कळकळीनें सुस्कारे टाकण्याची शैली, या गोष्टीमुळें त्याच्या प्रवचनाचा श्रोतृवर्गावर फार चांगला परिणाम झाला. ख्रिस्तानें मनुष्याकरितां सोसलेल्या हालांचे जेव्हां तो आपल्या रसभरित वाणीनें वर्णन करूं लागला, तेव्हां स्त्रियांच्या

---

* तेंतासांव—टेम्प्टेशन, मोह.

डोळ्यांतून अश्रू झरूं लागले. त्यांनीं मनांतल्या मनांत म्हटलें, "किती 'आवें-सोआद' पाद्री!"

० ० ०

मेंदोंस त्या दिवशीं सायंकाळीं, त्याचा एक जुना मित्र तेथें सरकारी कामाच्या निमित्तानें रहात होता, त्याला भेटण्याकरितां गेला. पणजीला 'लिसेवां'त* त्या दोघांची मैत्री जडली व ती पुढें टिकली. पण मेंदोंस पाद्री होण्याकरितां रायतुरला आला व त्याचा मित्र सौझ सरकारी नोकरींत शिरला. यामुळें गेल्या पांच सहा वर्षांत त्यांची भेट झाली नव्हती. आज अकस्मात इंग्रेजीच्या दारांत त्याला सौझ एका स्त्रीबरोबर दिसला, तेव्हांच मेंदोंसनें मनाशीं ठरविलें कीं, सौझाच्या घरांत प्रवेश करावयाचा!

मोठ्या उत्सुकतेनें तो सौझाच्या घरांत शिरला. बाहेरच्याच दिवाणखान्यांत एका डोलत्या खुर्चीवर एक तरुणी बसली होती. तिचे केंस मोकळे असून दोन कुरळ्या बटा खांद्यावरून पुढच्या बाजूला लोंबत होत्या. अंगांत एक पातळ गुलाबी कापडाचा तंग झगा घातल्यामुळें तिचें वक्षःस्थल, कटीप्रदेश इत्यादि अवयव रेखून दिसत होते. गुडघ्याखालचे पाय उघडे होते. झग्याच्या वरचा भागही मोकळाच होता. एखाद्या सुंदर चौकटींत सुंदर चित्र खुलून दिसावें, त्याप्रमाणें तिचा तो गोड चेहरा कानावरून आलेल्या करड्या विपुल केशसंभारांत शोभून दिसत होता.

त्या तरुणीला पाहतांच मेंदोंस किंचित् गोंधळल्याशिवाय राहिला नाहीं. तिची नजर त्याच्याकडे जातांच ती हंसत हंसत लगबगीनें उठली व वाचीत असलेल्या पुस्तकांत डाव्या हाताची तर्जनी घालून मेंदोंसशीं हस्तांदोलन करीत म्हणाली,

—या पाद्रीसाहेब! आपण खुशाल ना?

मेंदोंसनें तिचा हात दाबीत म्हटलें,—ओब्रिगाद!× सौझ घरीं नाहींत का?—पण, हा प्रश्न करतांना त्याला चांगलें ठाऊक होतें, कीं यावेळीं सौझ घरीं नाहीं.

—नाहींत. यावेळीं ते ऑफिसांत आहेत. आणखी तासाभरानें येतील. तोंवर बसा आपण.—एका खुर्चीकडे हस्तक्षेप करीत तिनें आर्जवी स्वरांत म्हटलें.

* लिसेव—उच्च शिक्षणाची पाठशाळा, कॉलेज. × ओब्रिगाद—थँक्स.

—काल तुम्हांला इग्रेजीच्या दारांत पाहिलें, तेव्हां म्हटलें, सौझाची चौकशी करून यावी.

—आपली त्यांची जुनी ओळख वाटतें !

—पणजीला लिसेवांत शिकतांना आमची ओळख. नंतर मी रायतूरला सेमिनारींत शिक्षण घेण्याकरितां गेलों व सौझ नोकरींत शिरला. यामुळें पांचसहा वर्षं दोघांचीही भेट झाली नाहीं.

—हें पहा ! आपण पाद्री होऊन फार बरें केलेंत !—आपल्या मनांतील आदर लुईजानें व्यक्त केला.

मेंदोंसला फार आनंद झाला. त्याला वाटलें, आपण पाद्री झालों हें खरोखरच चांगलें झालें. जबाबदारी टाळून सुखोपभोग घ्यायला पाद्र्याचा धंदा फार चांगला. लुईजाच्या चेहऱ्याचें निरीक्षण करीत त्यानें म्हटलें,

—खरंच आपणाला असं वाटतं का ?

—खरं तर ! परमेश्वराच्या कृपेनं पाद्री व्हावयाचं, अन् त्याचं कार्य किती महत्त्वाचं, किती पवित्र ! आपणासारखे पाद्री नशिबानं लाभायचे ! कालचं आपलं प्रवचन किती सुंदर झालं म्हणून सांगूं ! गेल्या दहाबारा वर्षांत या बाजूला असलं प्रवचन कुणी ऐकलं नव्हतं.

मेंदोंसला धन्यता वाटली. त्यानें उत्तरादाखल म्हटलें,

—आमचा रैतोर नेहमी असंच म्हणे. महत्भाग्यानें पाद्रीपणा मिळतो. परमेश्वराच्या सान्निध्यांत नेहमी रहायला मिळतं म्हणून तो धन्य होय.

—आपलं प्रवचन मला इतकं आवडलं कीं कालपासून माझ्या मनांत त्यासंबंधींच विचार चालू आहेत. Envagelhos मध्यें त्यागासंबंधीं Mateusनें सांगितलेला उपदेश मीं वाचीत बसलें होतें.—असें म्हणून डाव्या हातांत धरलेलें पुस्तक तिनें पुढें केलें.

मेंदोंसनें पुस्तक घेण्याकरितां हात पुढें केला; पण खुणेकरितां लुईजानें पुस्तकांत बोट घातलें होतें, त्याचा स्पर्श पुस्तक घेतांना त्याच्या हाताला झाला. त्यानें पुस्तक हातांत घेऊन म्हटलें, आपल्यासारख्यांनीं इतक्या आवडीनें धर्माचा अभ्यास करावा ही गोष्ट कौतुकाची आहे !

—पाद्रीसाहेब, यांत कौतुक करण्यासारखं कांहींच नाहीं. लहानपणापासून मी धार्मिक वातावरणांत वाढलें. माझी आजी किती धार्मिक स्त्री होती! माझा एक चुलता पाद्री होता. रोमला जाऊन त्यानं पोपची देखील भेट घेतली. आमच्या घरांत नेहमीं धर्मकृत्यं होत असत. ख्रिस्त व मेरी यांचीं सगळीं स्तोत्रं माझ्या आजीनं मला शिकविलीं. तेव्हांपासून मला हा नादच लागला म्हणाना!

—आपण धन्य आहांत! ख्रिस्ताची कृपादृष्टि आपल्यावर सदैव असावी ही माझी इच्छा. पण सौझला हें आपलं धर्मप्रेम आवडतं ना?

—हो तर! ते फार सज्जन अन् धर्मभोळे आहेत. मीं म्हटलेलं त्यांना मान्य. मिसाला जातांना ते नेहमीं मला बरोबर घेऊन जातात. आणि मिस व माझं 'कॉंफिस्सांव'* होईपर्यंत तासभर इग्रेजीच्या बाहेर बसून रहातात. ते इतके सहनशील आहेत म्हणून तर मला सर्व धर्मकृत्यं करायला मिळतात.

पाद्री मेंदोंसला हे उद्गार ऐकून हृदयाच्या खोल भागांत सूक्ष्म आनंद झाला. लुइजाला धर्माचें वेड व तिचा नवरा तिच्या तंत्रानें वागणारा!

—आपली आवड पाहून मला फार आनंद झाला. पाद्यानं सांगितलेल्या उपदेशाचं मनन करणारी व्यक्ती पाहिली म्हणजे त्याला किती तरी बरं वाटतं! पाद्र्यांना मान देणारीं माणसं दिवसेंदिवस दुर्मिळ होत चाललीं आहेत.

—पाद्रीसाहेब, खरंच सांगूं का? आपणासारखे उपदेशक लाभले तर आपला उपदेश पाळणाऱ्या व्यक्ती तयार होतात. आपली उदात्त वाणी, प्रवचनांत दिसून येणारी आपली कळकळ, आपली भव्य मूर्ति यांचा परिणाम श्रोत्यांच्या मनावर झाल्याशिवाय कसा राहील?

लुईजाचे हे उद्गार ऐकून मेंदोंसचा चेहरा लाल झाला. तो किंचित् गोंधळून गेला व त्यानें म्हटलें,—उद्यां आपण मिसाला याल ना?

—हो! यापुढं मी नेहमींच येईन. पण आपण आमच्यावर एक उपकार करा. आपण नेहमीं थोड्या वेळापुरते इथं येत जा. म्हणजे धर्मासंबंधीं आपल्याशीं मला बोलतां येईल. माझ्या नवऱ्याला देखील त्यामुळं आनंद होईल.

---

* कॉंफिस्सांव—कन्फेशन, हृदयाविष्करण.

—हो. अवश्य येईन मी. आतां मला उशीर होतो. उद्यां याच वेळीं मी फिरून येईन.—त्यानें म्हटलें, व लुइजाचा हात दाबून तो मोठ्या आनंदानें आपल्या बिन्हाडाकडे परतला.

० ० ०

आदितवार उगवला. सगळ्या ख्रिश्चन लोकांचा हा सुटीचा धार्मिक दिवस. सभोंवतालच्या निसर्गावर सकाळचें कोंवळें ऊन चमकत होतें, व सगळ्यांच्या मुखांवर आनंद झळकत होता. माड व आंबे इत्यादि वृक्षांच्यावर आलेलें इग्रेजीचें शुभ्र शिखर देखील त्या गांवच्या लोकांच्या हृदयांत स्वर्गांतील आनंद खालीं आणून ओतांत होतें. इग्रेजीपुढें विस्तृत मैदान पसरलें होतें व त्यांत शेतें वाढलीं होतीं. कांहीं ठिकाणीं तीं पिकून पिंवळीं झालीं होतीं.

इग्रेजीच्या घंटा वाजूं लागल्या व हळुहळू पुढच्या पटांगणांत स्त्रीपुरुष जमा होऊं लागले. मेंदोंसचें शेवटचें प्रवचन फार परिणामकारक झालें होतें; त्यामुळें आज गांवांतील सगळी मंडळी इग्रेजींत येत होती. म्हाताऱ्या बायकादेखील मुद्दाम आल्या होत्या.

पाद्री मेंदोंस आज किती तरी आनंदी दिसत होता. संतांच्या चेहऱ्यावर एक प्रकारचें दैवी तेज विलसत असतें, तसलें तेज मेंदोंसच्या मुखमंडळावर विलसत आहे असें ख्रिस्ती बाया म्हणूं लागल्या. हृदयांतून उफाळून वर येणारा आनंद त्याच्या चेहऱ्यावर पसरला होता, व दुसऱ्यांना आनंदित बनविण्याची शक्ति त्या आनंदांत होती.

मिस संपलें. समाधानपूर्ण चेहऱ्यानें हंसत हंसत मेंदोंस वेदीवर येऊन उभा राहिला. त्यानें आपली स्निग्ध, मधुर दृष्टि खालीं भक्तिभावानें विनम्र झालेल्या लोकसमुदायावरून सावकाश फिरविली. एका विशिष्ट स्थलीं नजर जातांच त्यानें स्मित केलें व लगेच चेहरा वर करून, डोळे आकाशाकडे लावून आपल्या नाद-गंभीर स्वरांत म्हटलें,—Meus Irmaos ( माझ्या बंधूनो ) !

आज मेंदोंस वैवाहिक नीतीसंबंधीं बोलूं लागला.

—नीति हा मानवी जीविताचा प्राण आहे. नीतीचीं कांहीं सूत्रें प्रथम मोझेसनें आपल्या जुन्या करारांत घालून दिलीं, व ख्रिस्तानें त्यांना उजाळा देऊन आपल्या शिष्यांकरवीं जगांत त्यांचा प्रसार केला आणि आपला धर्म स्थापला. पण

—हो. अवश्य येईन मी. आतां मला उशीर होतो. उद्यां याच वेळीं मी फिरून येईन.—त्यानें म्हटलें, व लुइजाचा हात दाबून तो मोठ्या आनंदानें आपल्या बिऱ्हाडाकडे परतला.

० ० ०

आदितवार उगवला. सगळ्या ख्रिश्चन लोकांचा हा सुटीचा धार्मिक दिवस. सभोंवतालच्या निसर्गावर सकाळचें कोंवळें ऊन चमकत होतें, व सगळ्यांच्या मुखांवर आनंद झळकत होता. माड व आंबे इत्यादि वृक्षांच्यावर आलेलें इग्रेजीचें शुभ्र शिखर देखील त्या गांवच्या लोकांच्या हृदयांत स्वर्गांतील आनंद खालीं आणून ओतीत होतें. इग्रेजीपुढें विस्तृत मैदान पसरलें होतें व त्यांत शेतें वाढलीं होतीं. कांहीं ठिकाणीं तीं पिकून पिंवळीं झालीं होतीं.

इग्रेजीच्या घंटा वाजूं लागल्या व हळुहळू पुढच्या पटांगणांत स्त्रीपुरुष जमा होऊं लागले. मेंदोंसचें शेवटचें प्रवचन फार परिणामकारक झालें होतें; त्यामुळें आज गांवांतील सगळी मंडळी इग्रेजींत येत होती. म्हाताऱ्या वायकादेखील मुद्दाम आल्या होत्या.

पाद्री मेंदोंस आज किती तरी आनंदी दिसत होता. संतांच्या चेहऱ्यावर एक प्रकारचें दैवी तेज विलसत असतें, तसलें तेज मेंदोंसच्या मुखमंडळावर विलसत आहे असें ख्रिस्ती बाया म्हणूं लागल्या. हृदयांतून उफाळून वर येणारा आनंद त्याच्या चेहऱ्यावर पसरला होता, व दुसऱ्यांना आनंदित बनविण्याची शक्ति त्या आनंदांत होती.

मिस संपलें. समाधानपूर्ण चेहऱ्यानें हंसत हंसत मेंदोंस वेदीवर येऊन उभा राहिला. त्यानें आपली स्निग्ध, मधुर दृष्टि खालीं भक्तिभावानें विनम्र झालेल्या लोकसमुदायावरून सावकाश फिरविली. एका विशिष्ट स्थलीं नजर जातांच त्यानें स्मित केलें व लगेच चेहरा वर करून, डोळे आकाशाकडे लावून आपल्या नाद-गंभीर स्वरांत म्हटलें,—Meus Irmaos ( माझ्या बंधूनो )!

आज मेंदोंस वैवाहिक नीतीसंबंधीं बोलूं लागला.

—नीति हा मानवी जीविताचा प्राण आहे. नीतीचीं कांहीं सूत्रें प्रथम मोझेसनें आपल्या जुन्या करारांत घालून दिलीं, व ख्रिस्तानें त्यांना उजाळा देऊन आपल्या शिष्यांकरवीं जगांत त्यांचा प्रसार केला आणि आपला धर्म स्थापला. पण

मानवजात इतकी कोडगी व आत्मघातकी निघाली, कीं दोन हजार वर्षें ख्रिस्ताची शिकवण सारखी ऐकून देखील ती सुधारली नाहीं. स्त्री ही मोहाची वस्तु असल्या-मुळें ती टाळा व माझ्या मागून या, असें ख्रिस्तानें सांगितलें. पण तें कांहीं मनुष्यानें केलें नाहीं. संसाराचा त्याग करणें कठीण खरें. पण परस्त्रीचा अभिलाष धरूं नकोस असा जो एक मँडेट ( आज्ञा ) आहे, त्याप्रमाणें तुमचें आचरण आहे का ? ज्यानें परस्त्रीचा अभिलाष धरला त्या मनुष्याला स्वर्गाचा लाभ कसा होईल ? त्याला नरकाची शिक्षा सांगितली आहे. परस्त्रीचा अभिलाष धरल्यामुळें मोठ-मोठ्या पुरुषांचा नाश झाला आहे. सीझरचा नाश व्हायला मुख्य कारण म्हणजे क्लिओपाट्राची त्यानें धरलेली संगति; ट्रोजन युद्धाचें मुख्य कारण तुम्हांला माहि-तच असेल. पारीस नांवाच्या राजपुत्रानें मेनेलावची लावण्यवती पत्नी हेलिना पळविली; यामुळें ग्रीस व ट्रॉय या दोन्ही राज्यांत काहीं वर्षेंपर्यंत भयंकर युद्ध माजून राहिलें व शेवटीं त्यांत ट्रॉयचा सर्वस्वी नाश झाला ! यासारखीं आणखी पुष्कळ उदाहरणें देतां येतील. देवाचें राज्य तुम्हाला मिळवायचें असेल तर तुम्ही परस्त्रीचा अभिलाष धरूं नका. जगांत नीतीचें राज्य स्थापण्या-करितां ख्रिस्तानें आपला धर्म स्थापन केला. म्हणून तुम्ही नीतीनें वागलें पाहिजे.

हें प्रवचन चालू असतांना पुष्कळ स्त्रियांचे चेहरे गोरेमोरे झाले होते, आणि त्या हळूच खालच्या नजरेनें ऐकमेकांकडे पहात होत्या.

मेंदोंस नंतर कॉंफिस्सांव करण्याच्या खोलींत गेला. कॉंफिस्सांव करण्याकरतां दोनतीन पुरुष व एकदोन बायका बाहेर आल्या. मेंदोंसनें एकाला आंत नेऊन दार लावलें व त्याला विचारलें,—तुला काय सांगायचं आहे तें मोकळेपणानं सांग, म्हणजे तूं केलेल्या पापापासून मुक्त होशील.

त्या इसमानें लज्जेनें खालीं घातलेली मान भीतभीतच वर करीत म्हटलें,

—पाद्रीसाहेब, मी पापी ! मला मुक्ति नाहीं !

—अरे तूं चुकतोस. ख्रिस्तानं आपला विश्वासघात करणाऱ्या ज्युडाला देखील क्षमा केली; मग तुम्हांला तो ती केल्याशिवाय कसा राहील ? पातक करणं वाईट खरं, पण तें लपवून ठेवणं जास्त वाईट. पापाचं परिमार्जन करण्याकरतां ख्रिस्तानं हा किती सोपा मार्ग सांगितला आहे ! पातक कबूल कर, म्हणजे तूं त्यापासून मुक्त होशील. चित्तशुद्धीला पश्चात्तापासारखा दुसरा उपाय नाहीं.

THANA

—पाद्रीसाहेब ! परस्त्रीशीं माझा संग घडला...

मेंदोंसची जिज्ञासा जागृत झाली. किंचित् हेव्यानेंच त्यानें त्या ख्रिश्चनाकडे पहात म्हटलें,—कुणाशीं संग घडला ?

—आमच्या शेजारच्या एका कुमारिकेशीं.

—काय नांव तिचं ?

—मारीय !

—तुला खरोखर पश्चात्ताप झाला आहे का ?

—हो पाद्रीसाहेब ! मला सध्या झोंप लागत नाहीं. भयंकर स्वप्नें पडतात, नेहमीं सैतान दिसतो !

—यापुढं तूं प्रायश्चित म्हणून नेमानं नव्या कराराचीं पारायणं करीत जा. देवाची सकाळ सायंकाळ नियमितपणें प्रार्थना कर. म्हणजे तूं पापापासून मुक्त होशील.

त्या ख्रिश्चनाच्या नेत्रांतून पश्चात्तापाचे अश्रू गळत होते. केलेल्या पापानें त्याचें अंतःकरण जळत होतें. पण मेंदोंसला त्याचा हेवा वाटत होता.

o o o

दुसऱ्या दिवशीं सायंकाळीं सौझाची वायको लुईजा मेंदोंसच्या घरीं गेली. तिनें रेशमी कापडाचा उंची झगा वापरला होता. पायांत उंच बारीक टांचांचे पोर्तुगालचे बूट घातले होते.

तिनें दारावरील घंटा वाजविली. लगेच मेंदोंस बाहेर आला. तिला पहातांच त्याला आश्चर्य वाटलें व फार आनंद झाला. तिच्याशीं हस्तांदोलन करीत त्यानें म्हटलें,—तुम्ही खुशाल ना ?

मेंदोंसचा हात आपल्या हातानें जोरानें दावीत तिनें म्हटलें,

—तुमच्या कृपेनं खुशाल आहों.

मेंदोंस घरांतल्या पोशाखांत होता. पायांत पातळ चिटाचा पायजमा व अंगांत सैल अंगरखा होता. माथ्याला कांहींच नसून केंस मागें वळविले होते. काळ्या पोशाखाचा उग्रपणा यावेळीं दिसत नसल्यामुळें त्याचें मूळचें सौंदर्य खऱ्या स्वरूपांत दिसत होतें.

—सौझ नाहीं आले ?—मेंदोंसनें विचारलें.

—ते पणजीला गेले आहेत. उद्यां येतील.—लुईजा गोंधळून म्हणाली.

—बरं. पण तुम्ही बसा ना ! इथं परकीपणा वाळगूं नका.—मेंदोंसनें तिला बसायला आग्रह केला.

ती बसली. मेंदोंसही बसला. तिच्या मनाची धडपड, तिच्या चेहऱ्यावरील भाव, त्यामुळें तिच्या सुंदर चेहऱ्यावर होणारा फरक, यांकडे तो सूक्ष्म दृष्टीनें पाहूं लागला.

लुइजानें थोड्या वेळानें म्हटलें,—तुम्हांला एक शंका विचारायची आहे.

—कसली शंका ? अवश्य विचारा.

मेंदोंसच्या हृदयाचे ठोके जोरानें पडूं लागले.

—आपण कालच्या प्रवचनांत म्हणालां, कीं स्त्री ही पुरुषाला घातक आहे. तिचा मोह त्यानें टाळला पाहिजे. हा न्याय स्त्रियांना लागू करावयाचा नाहीं काय ?

—हो तर ! स्त्रियांना देखील तो लागू आहे.

—मग स्त्रियांच्यासंबंधीं आपण कांहींच बोललां नाहीं !

—तें खरं. पण आपल्या धर्मग्रंथांत स्त्रियांना वेगळा उपदेश केलेला नाहीं. पुरुषांना केलेला उपदेश स्त्रियांनीं मार्गदर्शक मानून चाललं पाहिजे.

—पुरुषांनीं स्त्रियांचा मोह टाळला पाहिजे, मग स्त्रियांनीं कुणाचा मोह टाळणें अवश्य आहे ?

—अर्थात् पुरुषांचा !

लुईजा यावर कांहींच बोलली नाहीं. मेंदोंसला काहींतरी विचारण्याकरितां तिचे ओंठ हलले. पण त्यांतून शब्द निघाले नाहींत.

—जरा बसा हं. मी लवकरच येतों.—असें म्हणून मेंदोंस आंत गेला व थोड्या वेळानें पोषाख करून बाहेर येतांना त्यानें म्हटलें,

—जरा डोंगरावरून फिरून येऊं ! वारा छान सुटला आहे आज. जवळच्या डोंगरावरून समुद्राचा देखावा तुम्ही पाहिला आहे का ?

—नाहीं; आतां पाहूं.—असें म्हणत लुईजा हंसतच उठली. तिची वृत्ति पूर्ववत मोकळी झाली. दोघेंही टेंकडी चढून वर माथ्यावर आलीं. बऱ्याच अंतरावर समुद्र पसरलेला दिसत असून, तो आकाशाशीं भिडला आहे असें वाटे. मावळता सूर्य समुद्राच्या दृश्य सीमारेषेवर टेंकला होता. पश्चिम क्षितिजाकडचा बराच भाग

तांबडा लाल झाला होता व त्याचें प्रतिबिंब पाण्यांत पडल्यामुळें वेगवेगळ्या रंगांचें मिश्रण समुद्रांत ओतल्याप्रमाणें दिसत होतें. समुद्राचा किनारा अर्धवर्तुलाकार दिसत होता; व त्यावर असलेल्या होड्या, वाळत टाकलेलीं जाळीं, रांपणी* ओढीत असलेले कोळी लोकांचे तांडे, इत्यादि दृश्यें त्या टेंकडीच्या माथ्यावरून मजेदार दिसत होतीं.

टेंकडीच्या माथ्यावर एक मोठा काळा खडक होता, तेथें दोघेंही गेलीं. मेंदोंस आधीं चढला. लुईजाला चढायला येईना. तेव्हां त्यानें आपला हात पुढें केला. त्याच्या हाताचा आश्रय घेत तिनें म्हटलें,

—आपल्या हातांत मी हात देत आहें. मी पडणार नाहीं ना ?—आणि मान वर करून तिनें त्याच्याकडे साभिप्राय पाहिलें.

—पाद्री हा परमेश्वराचा अंश. त्याच्या हातांत हात दिला तर तुमचा उद्धार होईल !—त्यानें तिच्या नजरेवर आपली नजर स्थिर करीत म्हटलें.

दोघेंही एकमेकांना खेटून बसलीं. मेंदोंसनें समुद्राकडे हस्तक्षेप करीत म्हटलें,

—तें त्या दिशेनं जाणारं जहाज पाहिलंत का ? एकाद्या लहान पक्ष्याप्रमाणं दिसत आहे तें !

—कुठं ? मला दिसत नाहीं अजून !—लुईजा म्हणाली.

मेंदोंसनें तिच्या चेहऱ्यामागें आपला चेहरा आणून तिच्या नजरेपुढें बोट धरीत म्हटलें.—त्या-तिथं. डाव्या बाजूला.

त्याच्या ओंठाना तिच्या केंसांचा स्पर्श झाला.

—हो. खरंच ! किती सुंदर दिसतं तें जहाज ! जणूं काय पक्षीच !—तिनें चटकन् मान वळवीत म्हटलें. पण मेंदोसचें तोंड इतकें जवळ होतें कीं त्याच्या ओंठाचा स्पर्श तिच्या गालांना झाला.

ती चटकन् मागें सरकली. मेंदोंसही गोंधळला. दोघेंही खालीं उतरलीं. वाटेंत तिनें म्हटलें,

—पाद्रीसाहेब ! उद्यां मीं आपणापाशीं कॉंफिस्सांव करीन.

—सौझ कुणापाशीं कॉंफिस्सांव करतात ?—मेंदोंसनें विचारलें.

—त्या म्हाताऱ्या गाब्रिएलशीं.

---

* रांपण—मासे पकडण्याचें फार मोठें जाळें.

—मग तुमचा हा विचार त्यांना आवडेल का ?

—माझ्या आवडीविरुद्ध ते कधींच जात नाहींत. मीं म्हणेन तें त्यांना मान्य.

—अस्सं !—मेंदोंसनें इतकेंच म्हटलें. पण एका शब्दांतच त्यानें आपलें हृदय व्यक्त केलें.

o o o

दुसऱ्या दिवशीं मेंदोंस नेहमींपेक्षां जास्त आनंदित वृत्तीनें इग्रेजींत आला. त्याला पाहून बायका कुजबुजूं लागल्या.

—किती आनंदी, समाधानी वृत्ति आहे पाद्रीसाहेबांची ! पूर्वींचे सगळे पाद्री नेहमीं दुःखी असत. पण यांना पहातांच किती आनंद होतो ! परमेश्वराचा साक्षात्कार यांना खास झाला असला पाहिजे, नाहीं का ?

—हा पाद्री आल्यापासून मी फार बरी आहें. पूर्वीं मला स्वप्नांत सैतान दिसे. धर्मकृत्यांकडे लक्ष लागत नसे. सध्यां मी समाधानांत आहे.—दुसरी स्त्री म्हणाली.

मिसाचा कार्यक्रम आटोपला; व मेंदोंस वेदीवर चढला. खालीं जमलेल्या समुदायावरून त्यानें नजर फिरविली, किंचित् हास्य केलें, व नंतर प्रवचनास सुरवात केली. तो म्हणाला,

—परमेश्वरानें आधीं ॲडम निर्माण केला, व त्याच्या करमणुकीकरतां ईव्हची त्याला सोबत दिली. त्याच्या रुक्ष जीवनाला माधुर्य आणावें हा परमेश्वराचा हेतु होता. पण ईव्हनें ज्ञानवृक्षाचें फळ ॲडमला दाखविलें व तें खाण्याचा आग्रह धरला. ॲडमनें तिच्या इच्छेकरितां तें फळ खाल्लें व त्या वेळेपासून त्याचें सुख नष्ट झालें. या आज्ञाभंगाला 'पेकादु ओरीजिनाल'× म्हणतात. या पापकृत्याला मूळ कारण स्त्री ! पुरुषापेक्षां स्त्रीची प्रवृत्तीच पापाकडे अधिक झुकलेली आहे. म्हणून स्त्रीनें आपल्या मनावर जास्त बंधन घातलें पाहिजे. नव्या करारांतील मँडेट स्त्रियांनाच जास्त लागू आहे. परपुरुषाचा अभिलाष त्यांनीं स्वप्नांत देखील करूं नये. मेरीप्रमाणें व्रतस्थ कुमारिकांच्या पोटींच ख्रिस्तासारखे दैवी पुरुष जन्मास येतात. ख्रिस्ताची जास्त मदार स्त्रियांवर होती. त्या अनीतिमान झाल्या तर मुलें चांगलीं कशी निपजतील ?

× पेकादु ओरीजिनाल—मूळ पाप

या प्रकारचें प्रवचन झाल्यावर मेंदोंस कॉंफिस्सांव करण्याच्या खोलींत गेला. त्याच्यामागोमाग लुईजा गेली.

त्यानें खोलीचें दार लावून घेतलें. त्याचें हृदय धडधडत होतें, व चेहरा तांबडालाल झाला होता.

लुईजा खुर्चीवर वसली. तिची नजर खालीं जमिनीवर लागली होती.

मेंदोंसनें म्हटलें,

—सिंयोरा लुईजा ! पाद्री हा देवाप्रमाणंच आपला हितकर्ता आहे असं समजा व आपलं हृद्गत माझ्यापाशीं उघडं करा.

लुईजानें चेहरा किंचित् वर करून म्हटलं,

—पाद्रीसाहेब, मी पापी आहें !

—कोणतं पाप घडलं तुमच्या हातून ?—तिच्या शेजारीं येऊन मेंदोंसनें स्नेहभरानें म्हटलें.

तिनें उत्तर केलें नाहीं. हातांतील रुमाल चुरगाळीत ती खालीं पहात राहिली.

—लुईजा, आपलं मन मोकळं व्हायला पाहिजे ना ? पातकापासून मुक्त व्हायची आपली इच्छा आहे ना ?

—पाद्रीसाहेब, मी परपुरुषाची अभिलाषा धरली !—तिनें क्षणमात्र भेदक नजरेनें मेंदोंसकडे पाहिलें.

मेंदोंस आश्चर्यचकित झाला. त्यानें मोहवश होऊन विचारलें,

—कुणाचा मोह पडला आपल्याला ?

—पाद्रीसाहेब, आपला ! या पापाला प्रायश्चित्त काय सांगितलं आहे ?—लुईजानें विचारलें.

—लुईजा ! हें पाप नव्हे. पाद्री हा ईश्वराचा प्रतिनिधि. त्याला आनंदी करण्याकरतां तूं झटलीस तर परमेश्वर आनंदी होईल ! तुझा देह सत्कारणीं लागेल ! इतकें म्हणून त्यानें विकारवशतेनें तिला आपल्या बाहुपाशांत घेतलें आणि तिचें मुख चुंबनांनीं भरून टाकलें !

**तिचा उद्धार**

ले.—मार्च १९३२
अप्रकाशित

# लग्नाचा ध्यास

धाकू उदास मनानें घरीं आला. माडाच्या चुडितांनीं झांकलेल्या पडवीच्या एका कोपऱ्यांतली जागा त्यानें आपल्या कांबळीनें दोनतीनदां झटकली. लंगोटीच्या पुढच्या लांब टोंकानें तोंडाचा घाम पुसून टाकला व कांबळ जमिनीवर पसरून तो भिंतीला टेंकून बसला.

वाड्यावरच्या एका घरांतून मंगलवाद्यांचे ध्वनि वातावरणांत आल्हाद ओतीत होते. पोफळीच्या असंख्य शुभ्र खोडांतून धाकूची नजर त्या दूरच्या घरांत स्थिर झाली. त्या घरापुढें विणलेल्या चुडितांचा मंडप घातला असून तो आंब्याच्या-डहाळ्यांनीं, लता-पल्लवांनीं व रानफुलांच्या माळांनीं शृंगारला होता. अंगणाच्या एका कोपऱ्यांत वाजंत्री बसले असून ते सूर, सनई, ताशा व ढोल वाजविण्यांत गुंतले होते. गावड्यांचीं काळीं कुळकुळीत पोरें नवीन पोशाख करून इकडे तिकडे आनंद-भरानें नाचत होतीं, व लग्नघरांतील बायका गडबड करतांना दिसत होत्या.

हें दृश्य पाहून धाकूची निराशा द्विगुणित झाली. आज सहा महिने बायको मिळविण्याकरतां आपण केवढी खटपट करीत आहों; पण आपणाला यश लाभत नाहीं, आणि वाड्यावरचे लोक लग्नें करतात ! असा विचार त्याच्या मनांत आला.

आज दोन दिवस तो घरीं नव्हता. एका दूरच्या गांवांत मुलगी मिळविण्या-करितां तो गेला होता. त्यामुळें वाड्यावरचें वर्तमान त्याला नव्हतें. त्यानें माथ्याला बांधलेल्या पंचांत खोंवलेली विडी काढीत आपल्या थोरल्या बहिणीला हांक मारून म्हटलें,

—येसू, विस्तव आण पाहूं जरा.

जळकें लाकूड हातांत धरून येसू बाहेर आली व भावाच्या हातांत तें देत म्हणाली,—केव्हां आलास ?

इतकें बोलल्यावर ती भिंतीला टेंकून उभी राहिली. ' मुलगी मिळाली का ? ' असें भावाला विचारावें असें तिला वाटलें. पण त्याची उदास मुद्रा पाहून ती गप्प राहिली. वाईट बातमी विचारणाऱ्याला व सांगणाऱ्याला दोघांनाही त्रास होतो असा तिनें विचार केला.

धाकूनें विडी पेटवीत म्हटलें,—नुकताच आलों मी. पण येसू, वाड्यावर आज हें काय वाजत आहे ?

—फेस्तूचें लग्न आहे ना आज ?—येसू म्हणाली. मनगटापासून कोंपरापर्यंत भरलेल्या तिच्या हातांतल्या पितळेच्या पातळ बांगड्या खळखळल्या. कपाळावर आलेले अस्ताव्यस्त केंस तिनें हातानें मागें सारले.

—खरंच का ?—त्यानें आश्चर्यानें विचारलें.

—फेस्तू तुझ्यापेक्षां चार-पांच वर्षांनीं मोठा, पण त्याला मुलगी मिळते अन् त्याचं लग्न होतं! आणि तुझ्या लग्नाची ही गत! आज वर्षभर आम्ही आसपासच्या गांवांतून मुलगी मिळविण्याकरितां खटपट करीत आहों; पण आशा कांहीं दिसत नाहीं !—येसू निराशेनें म्हणाली.

—मुलगी कुठची मिळाली त्याला ?—धाकूनें बहिणीला प्रश्न केला. अंतरंगांत दुःखाचा वणवा पेटावा, पण तो इतरांच्या लक्षांत येऊं नये म्हणून त्यांना भलतेच प्रश्न विचारावे, तसें त्याचें झालें. बहिणीचे सहानुभूतीचे शब्द; पण तेच त्याला असह्य झाले.

इतरांचें सुख पाहून अज्ञान, दुःखी माणसाला त्रास होणें साहजिक आहे. फेस्तू धाकूपेक्षां अधिक म्हातारा. त्याला बायको मिळाली हा का त्याचा दोष ? पण त्यामुळें येसूच्या अडाणी भावना प्रक्षुब्ध झाल्या. तिनें भावाला म्हटलें,

—कोठंबीची मुलगी मिळाली त्याला. अन् किती सहज ! तिच्या बापाला काय दिलें यानें-तर शंभर रुपये ! अन् आम्ही तितकेच पैसे द्यावयाला तयार आहों, तरी लहान मोठें कसलेंच पोर आम्हांला मिळत नाहीं !

धाकूनें आपल्या वाढलेल्या दाढीवरून हात फिरविला. आपले केंस पिकले म्हणून, कीं आपण गरीब म्हणून आपल्याला बायको मिळत नाहीं, हा त्याला विचार पडला. फेस्तूच्या लग्नाचें दृश्य पाहून त्याला वाईट वाटलेंच; पण तें आल्हादकारी वाद्य, बायकामुलांचा तो निरागस गोंधळ, रानमाळांच्या फुलांनीं शृंगारलेला तो

मंडप, हें सगळें पाहून त्याची रानवट, सरळ वृत्ति लग्नाच्या सुखसोहळ्यांत तदाकार झाल्याशिवाय राहिली नाही. सगळ्या लोकांना—गरीबांना देखील बायका आहेत, मुलें आहेत आणि आपल्या घरांत दिवा लावायला हक्काचें माणूस नाहीं ! लग्नाच्या आशेनें त्याचें मन अस्वस्थ झालें; पण त्या अस्वस्थतेंतही त्याला एक प्रकारच्या उन्मादकारी माधुर्याचा अनुभव आला.

येसू पुढें म्हणाली,—भावाची बायको जगली असती तर तुला तरी लग्नांत पडण्याचें काय कारण होतें ? पण घरांत कुणी तरी बायको हवी ना ? दिवा लावायला, अमावास्येच्या दिवशीं वाडवडिलांना 'काकोळ'* घालायला कुणाचा तरी आधार हवा म्हणून एखादें पोर आणायचें. भावजय वारल्यापासून मी इथें आहें, पण नेहमीं मला कसें राहतां येईल ? माझें घर आहे ना मला ?

येसू बोलत होती; पण आपल्यापेक्षां धाकूलाच बायको आणण्याची तळमळ जास्त लागली आहे हें तिला माहित नव्हतें.

—येसू, मी काल कुठें गेलों होतों तें ठाऊक आहे तुला ?—धाकू म्हणाला.

—माळणीला गेला होतास ना तूं ? पण कां गेला होतास तें कांहीं तूं मला सांगितलें नव्हतेंस. खरेंच, कां गेला होतास तिकडे तूं ? कांहीं 'देवसपण' वगैरे होतें वाटतें ?—येसू त्याच्याजवळ बसत म्हणाली.

—मुलगी पहायला गेलों होतों ना मी ? त्या गांवांत चवकशी करायची राहिली होती. तिथें जाऊन आलों.—धाकूनें आशा व निराशा या भावनांच्या कात्रींत सांपडून म्हटलें. होडी चालविण्याकरितां उभविलेलें शीड केव्हां केव्हां वाऱ्याच्या झोतानें फडफडत राहातें, तशी त्याच्या मनाची स्थिति झाली.

—मग मुलगी मिळाली का ?—येसूनें स्त्रीस्वभावसुलभ अधीरतेनें विचारलें.

—मिळाली नाहीं पण मिळेल. अशी आशा आहे. पण...—सृष्टीवर क्षणमात्र ऊन पडावें व लगेच ढगांची छाया पसरावी तशी त्याची मुद्रा आळीपाळीनें पालटली.

—काय झालें तें मला सांग पाहूं !

—माळणीचा मस्तो गांवकार आमच्या फार ओळखीचा. त्याला एक मुलगी आहे असें ऐकलें म्हणून त्याच्याकडे गेलों. कालचा दिवस तेथेंच राहिलों. मुलगी

* काकोळ—काकबलि.

पाहिली. लग्न करायला देतोस का म्हणून विचारलें. मुलगी अगदीं लहान, आठ दहा वर्षांची. तेव्हां यंदा लग्न करायला तो कबूल होईना. शेवटीं म्हटलें, ‘ रुपये कितीही द्यावे लागले तरी देतों. पण मुलगी पाहिजे.’ तेव्हां कबूल झाला. पण मागितले रुपये दीडशें !

बायको मिळेल या कल्पनेनें होणारा आनंद व पैसे मिळविण्याची अशक्यता लक्षांत येऊन झालेलें दुःख लागोपाठ त्याच्या चेहऱ्यावर उमटलें.

—धाकू !—तिनें आश्चर्यातिरेकानें तोंड उघडून म्हटलें,—दीडशें रुपये ! पंचवीस रुपयांना पोरें मिळतात ! अन् दीडशें रुपयांना आठ वर्षांचें पोर ! दीडशें रुपये ! कुठून आणणार तूं हे पैसे ?

‘ खरेंच कुठून आणणार ? ’ धाकूला प्रश्न पडला. लग्नाच्या आशेनें त्यानें हे पैसे कबूल केले; पण त्याला इतके रुपये कोण कसल्या आशेनें द्यायला कबूल होणार ? त्यानें खरोखरच डोकें खाजविलें. पण त्यांतून विडीचें एक थोटुक निघालें ! पैसे मिळविण्याची युक्ति कांहीं निघाली नाहीं.

घरापुढच्या गोठ्यांत दोन पुष्ट बैल बसून रवंथ करीत होते. आजूबाजूच्या पोफळींना पिंवळ्या सुंदर पोफळांचे घोंस बांधून टाकल्याप्रमाणें लटकत होते. केळींच्या हिरव्या चार व डौलदार झाडांना केळ्यांचे घड लागले होते. अधूनमधून जमिनींत पुरलेल्या उंच खुंटांवर नागवेली चढल्या होत्या. व त्यांच्या गर्द पर्णराजी-मुळें खालीं दाट सांवली पडली होती. निसर्गाच्या या वैभवसंपन्न राजवाड्यांत मौक्तिकमालांनाही लाजवितील, असे जलबिंदूंचे फवारे सगळीकडे एक तालावर उसळत होते.

गोठ्यांतला एक बैल ‘ सटसट ’ आवाज करीत उठला. येसूचें लक्ष तिकडे गेलें, आणि तिच्या मस्तकांत एक कल्पना चमकली. तिनें भावाला म्हटलें,

—धाकू, हे आपले बैलं आहेत ना ?

वाऱ्याचा मोठा झोत येतांच पोफळीचें झाड खालपर्यंत वांकावें तसें धाकूचें मन दुःखभारानें वांकलें. त्यानें आपली करुण नजर बैलांवर स्थिर करून मंद आवाजांत म्हटलें,

—आमचे बैल, आमचें धन...!

—पण त्या धनापेक्षां आम्हांला बायको माणसाची आज जास्त गरज आहे. नाहीं का ?—येसू म्हणाली.

—बैल विकायचे ?—धाकूनें फिरून म्हटलें.

—पोटाला नसतें तर तूं बैल विकले नसतेस का ? मग आतांची गरज काय लहानसहान !...

शेवटीं बायकोचा मोह जास्त प्रभावी ठरला. धाकूला येसूचें म्हणणें पटलें. त्यानें म्हटलें,

—बैल विकले म्हणून दीडशें रुपये कोण देणार ?

फिरून दोघेंही अडचणींत पडलीं. फार झालें तर बैलांबद्दल शंभर रुपये येतील. बाकीचे पन्नास रुपये व लग्नाकरितां होणारा इतर खर्च कुठून आणावयाचा, हा धाकूला प्रश्न पडला. इतक्यांत दारापुढच्या माडीचें एक पोफळ वाऱ्यानें खालीं पडलें. तें नजरेला पडतांच येसू म्हणाली,

—धाकू, आतां मागेंपुढें पहायचें नाहीं. घरभाट गहाण ठेवायचें !

या उद्गारांत जी दुःखद कल्पना दडून राहिली होती तिच्यामुळें धाकूचें हृदय भरून आलें. बायकोकरितां केवढें हें दिव्य करायचें ! पण तें न करून कसें चालेल ? घरांत दिवा कोण लावील ? आपणाला गोटे शिजवून कोण घालील ? आपल्यामागें घर कोण चालवील ?

त्यानें कातर स्वरांत म्हटलें,—येसू ! शेवटीं घर देखील गहाण टाकायचें ना ?

तो थोडा वेळ गप्प राहिला. त्यानें शून्य दृष्टीनें बैलांकडे पाहिलें. घरभाटांतल्या पोफळींवर नजर फेंकली व एक निःश्वास टाकून विडीचें थोटुक पेटविलें.

येसू आंत गेली. तिला जास्त बोलवेना. बिचारा धाकू तेथेंच बसून राहिला. समोर चाललेल्या लग्नाचें दृश्य त्याला दिसतच होतें. वाद्यांचे स्वर कर्णरंध्रांत शिरून त्याच्या मनांत आल्हादकारक हुरहूर उत्पन्न करीत होते. तिन्हीसांजच्या वेळीं केव्हां केव्हां अंधार व प्रकाश यांचें रम्य पण उदासीन असें संमेलन घडतें, त्याप्रमाणें परस्परविरोधी भावनांनीं धाकूची स्थिति झाली.

तो जाग्यावरून उठला व त्या लहानशा दारांतून वांकून घरांत गेला, आणि येसूनें आंत वाढून ठेवलेली उकड्या तांदुळांची पेज कशीबशी पिऊन लगेच बाहेर आला.

दीडशें रुपयांची रक्कम त्या मुलीच्या बापाला दुसऱ्या दिवशीं सायंकाळपर्यंत पाठवून देण्याचें त्यानें कबूल केलें होतें. ती रक्कम तयार केल्याशिवाय धाकूला कसें चैन पडणार !

मनांत काहीं तरी निश्चय करून तो बैलांच्या गोठ्यांत गेला, त्यांचीं दावीं सोडलीं, त्यांच्या पाठी प्रेमानें थोपटून त्यांना बाहेर आणलें व त्यांना हांकीत त्यांच्या मागोमाग तो चालूं लागला.

बैल विकायचा व जमीन गहाण टाकायचा त्यानें निश्चय केला. तो त्याला त्रासदायक झालाच. पण ही विक्री गोविंद पैकडे करावी लागत आहे, याचें त्याला भारी दुःख झालें. कारण गोविंद पै हा त्या गांवांतला सावकार असून सगळी रयत त्यांच्या आहारीं गेली होती. एकटा धाकू अजूनपर्यंत त्याच्याशीं स्वतंत्र बाण्यानें वागत होता. त्याच्या श्रीमंतीची धाकूनें कधींच पर्वा केली नाहीं. बैलांची सुंदर जोडी आणि तें चिमुकलें घरभाट या दोहोंच्या आधारावर त्या दोघां भावांचा संसार गोविंद पैची हांजी हांजी केल्याशिवाय स्वतंत्रपणें चालला होता. पण आतां रक्कम उभी करायला धाकूला गोविंद पैकडे गेल्याशिवाय गत्यंतर नव्हतें.

धाकू बैल घेऊन गोविंद पैच्या घराकडे पोंचला तेव्हां गोविंद पै बाहेर वलकांवावर *बसला होता. धाकूला पाहून तो चकित झाल्याशिवाय राहिला नाहीं. धाकू जवळ पोंचतांच त्यानें म्हटलें,

—काय धाकू ! आज वाट चुकून इकडे पोंचलास वाटतें ?—गोविंद पैनें लगेच ताडलें कीं धाकूला आपल्या पैशांची गरज भासली म्हणून तो आपणाकडे आला.

धाकूनें नम्रतेनें म्हटलें,—असें कसें म्हणतां गोविंदबाब ? मी मुद्दाम आलों आपणाकडे.

आपल्या कामाकरतां त्यानें आपला स्वतंत्रतेचा बाणा सोडला.

—माझी थट्टा करायला लागलास ना तूं धाकू ? यापूर्वीं माझ्याकडे कधीं फिरकलास का रे ? कामाकरितां केव्हां बोलावणें धाडलें तर तूं आलास का कधीं इथें ? माझी काय पर्वा तुला ? बैल आणि जमीन असल्यावर तूं मला कसचा लेखतोस बाबा !—गोविंद पै उपरोधिक स्वरानें म्हणाले.

---

* वलकांव—गोमंतकांतील बहुतेक घरांना बसण्याउठण्याकरतां बांधलेला घराचा दर्शनी भाग, ओटी.

—गोविंदबाव, असें म्हणूं नका ! आपण श्रीमंत, आम्ही गरीब ! आमचें काम आपल्याकडे नसायचें तर कुणाकडे ? माझ्या कामाकरतांच आलों मी आपणांकडे.—धाकूनें म्हटलें. त्याच्या हृदयाला वेदना झाल्या. आतांपर्यंत आपण अजित होतों; पण आतां पराजित झालों, इतर कुळवाड्यांप्रमाणें गोविंद पैचा गुलाम बनलों, या विचारामुळें त्याला जास्तच वाईट वाटलें.

गोविंद पैनें बैलांची पहाणी करून म्हटलें,—हे बैल आमच्याकडे कशाला घेऊन आलास, बाबा ?

—पैशांची गरज होती म्हणून...

—म्हणून का बैल विकायला आणलेस !—गोविंद पै कुचेष्टेनें हंसत म्हणाला.

—नशिबांत आलें त्याला कोण काय करणार ?

—असें काय झालेंय् ?

—लग्न करायला पैसे हवेत !

—कुणाचें लग्न ?..

—माझें !

—धाकू ! तूं आतां लग्न करणार ? वयानें माझ्याबरोबरीचा तूं ! आमचें लग्न आतां तिरडीशीं !—इतकें म्हणून गोविंद पै खदखदां हंसला.

या शब्दांनीं धाकूला मेल्यागत झालें. पण तो बोलला नाहीं. ' एका बायकोकरितां किती अपमान सोसायचे हे ! ' त्याच्या मनांत विचार आला.

गोविंद पै पुढें म्हणाला,—मग काय ? बैल विकतोस हे ? किती रुपये देऊं यांचे ?

—गोविंदबाब, बैल हें माझें सर्वस्व ! ते विकणें नशिबीं आलें हें दुःख. त्यांत किंमतीबद्दल आणखी घासाघीस ती काय करायची ? आपण हात उचलून द्याल ती किंमत घेईन.

—ऐशीं रुपये देतों तुला. माझ्याकडे कधीं न येणारा तूं ! तुला नाखुष करीत नाहीं मी.

—आणखी एक उपकार केला पाहिजे, गोविंदबाब. माझें घरभाट आपणाकडे गहाणवट ठेवून मला शंभर रुपये द्या.

—अरेरे ! घरभाट देखील गहाण टाकतोस का तूं ?—धाकूची लाचार स्थिति त्याला जास्त भासवून द्यावी म्हणून गोविंद पैनें कृत्रिम सहानुभूतीनें म्हटलें.

धाकू मान खालीं घालून गप्प राहिला. गोविंद पैनें जास्त आढेवेढे घेतले नाहींत. त्याच्यासारखा सावकार ही सोन्याची संधि कशी सोडील ? घरांत जाऊन त्यानें एकशें ऐशीं रुपये आणून धाकूच्या हातावर टें[illegible] व म्हटलें,

—आजपासून हे तुझे बैल आणि तुझ्या घरा कट तुझी ती जमीन माझ्या मालकीची झाली बरें का !

धाकूला वाटलें ते रुपये गोविंद पैच्या तोंडावर फेंकावे. पण बायकोचा मोह...!

दोघां साक्षीदारांच्या समक्ष गहाणखत लिहिलें गेलें. धाकूनें लिहितां येत नसल्यामुळें, आपल्या आंगठ्याचा ठसा त्याच्यावर उमटविला व रुपये घेऊन तो घराकडे परतला. बैल व जमीन यांनीं त्याच्या हृदयाला जो आधार दिला होता, तो अशा रीतीनें तुटला !

घरीं येऊन त्यानें येसूला म्हटलें,—आज सायंकाळीं हे पैसे घेऊन माळणीला जा, मस्तो गांवकराकडे ही रक्कम दे व लग्नाचें ठरवून ये.

जेवण उरकल्यानंतर येसू बाहेर पडली, व धाकू विचित्र, असहाय मनःस्थितींत तेथेंच पडवींत पडला !

o o o

दुसऱ्या दिवशीं येसू परतली. तिची चर्या उतरली होती व तिचें पाऊल जड पडत होतें. ती पडवींत शिरली तेव्हां धाकू कांबळीवर पडला होता.

दोघांनींही एकमेकांना पाहिलें. कोणीच बोललें नाहीं. येसूनें पदराची गांठ सोडली व नेलेली रक्कम धाकूपुढें ठेवून म्हटलें,

—मुलगा लहान अन् तूं वयानें फार मोठा म्हणून ते तुला मुलगी देत नाहींत !

धाकूनें पैशांकडे पाहिलें, बैलांच्या रिकाम्या गोठ्याकडे पाहिलें, घरापुढच्या गर्द पोफळींकडे पाहिलें, आणि सुस्कारा सोडून व कपाळावर हात मारून म्हटलें,

—माझें नशीब !

लग्नाचा ध्यास

ले.—ऑगस्ट १९३२
प्र.—रत्नाकर १९३२

# अंतरींची ओढ

श्रीनागेशाच्या देवळाभोंवतीं प्रचंड जत्रा भरली होती. पण नेहमीं पालखीपुढें नृत्यगायन करणारी, विलासी, सुंदर कलावंतीण लालन आज घरींच राहिली होती. कोणत्या तरी गोष्टीमुळें आज तिचें मन तळमळत होतें. या वेळीं तिचा पोषाख साधा होता. तिचा मोहक चेहरा उदासीन दिसत होता. तिच्या नजरेंतील नेहमींचें चांचल्यपूर्ण तेज आज शिथिल झालें होतें. खिडकीच्या कठड्याला टेंकून समोरच्या विस्तीर्ण तलावांतील पाण्यावर तिनें आपली दृष्टि स्थिर केली होती.

चारी बाजूंनीं बांधकाम केलेला तो तलाव फार सुंदर दिसत होता. त्याचें संथ पाणी उंच पोफळींच्या झाडींतून शिरणाऱ्या चंद्रप्रकाशामुळें चमकत होतें. एका बाजूनें अग्रशाळेचें प्रतिबिंब पाण्यांत पडलें होतें.

—लालन, जत्रेला कां गेली नाहींस तूं आज?—दाराशीं येऊन एका म्हाताऱ्या बाईनें प्रश्न केला. तिचे पुढचे दांत पडले होते; चेहऱ्यावर सुरकुत्या पडल्या होत्या; डोळे कोल्ह्यासारखे चतुर व त्यांत व्यवहारीपणाची छटा तरळत होती.

—नाहीं गेलें.—लालननें उदासपणें अर्धवट उत्तर केलें.

—कां नाहीं गेलीस ? तुझं आपलं सगळंच विचित्र ! आज जत्रेचा दिवस. नागेशाची पालखी देवळाभोंवतीं फिरत आहे. शेंकडों श्रीमंत महाजन पालखीजवळ कलावंतिणींचं नृत्य पहाण्याकरितां जमा झाले आहेत. आणि अशा संधीला तूं इथं अशी दडून बसलेली ! आजारी न म्हातारीं यांच्याशिवाय आज कुणी घरांत रहातं का ? माझं इतकं वय झालेलं. पण मला दिखील असं वाटतं कीं, तुझं एकादं सुंदर पातळ नेसून पालखीपुढं नाच करावा नाहींतर एखादी जीज म्हणून देवाची सेवा करावी.—हें म्हणतांना तिचे डोळे चकाकले व तिच्या चेहऱ्यावर हृदयांत उद्भवलेल्या मधुर आठवणींचें चांदणें पसरलें.

मावशीची ही भोगप्रियता पाहून त्या उदास मनस्थितींतहि लालनला हंसूं आल्याशिवाय राहिलें नाहीं. तिनें आपल्या हृदयांत चाललेली भावनांची खळवळ चेहऱ्यावर न दाखवितां म्हटलें,—मावशी, मला बरं वाटत नाहीं या दिवसांत.

—काय होतं आहे तुला ?—मावशीनें फार उत्सुकतेनें विचारलें.

—या दिवसांत मला घेरी आल्यासारखं होतं, अन् ओकारी येते. लालननें मान खालीं घालून उत्तर केलें. तिच्या चेहऱ्यावर नाजुक भाव पसरले.

—पण पोरी, इतक्या लवकर...

—मावशी...,—लालननें प्रेमगर्भ दटावणीनें म्हटलें.

—किती दिवस गेले आहेत तुला ? मी दोन महिने इथं नव्हतें त्याचा हा परिणाम ! किती वेडी आहेस ग तूं ! मागच्या खेपेला तुला मी सांगितलेलं तूं विसरलीस वाटतं ?

—काय विसरलें मी मावशी ?—केविलवाण्या नजरेनें मावशीच्या तोंडाकडे पहात लालननें अधीरतेनें प्रश्न केला.

—ज्यास्त दिवस गेले–म्हणजे–कठीण पडतं.—मावशी अडखळत बोलूं लागली.

—मावशी, किती कठोर होतेस ग तूं ? गेल्या दोन्ही खेपा तुम्ही माझ्या मना-विरुद्ध मला औषध देऊन टाकलं. दोन्ही खेपा माझी काय अवस्था झाली ! देवा, नागेशा !—अंगावर शहारे आल्याप्रमाणें मान देवळाकडे वळवून तिनें आपल्या दोन्ही गालांवर भाविकपणानें उजव्या हातानें चापट्या मारल्या !

—मी वेडी, अन् तूं शहाणी !—कुणाच्या बऱ्याकरितां तसं केलं आम्ही ?

—माझं बरं केलं तुम्ही ! पण या खेपेला–मी तुमच्या पायां पडतें–तसं कांहीं करूं नका मला.—तिनें गद्गद स्वरांत म्हटलें. तिच्या दुःखाचा स्फोट तिच्या रुदनानें झाला.

देवळाच्या प्राकारांत दारूकामाचा गडगडाट चालला होता. जनसंमर्दाच्या कोला-हलांतून कलावंतिणीच्या गाण्याचे सुस्वर आलाप अस्पष्ट ऐकूं येत होते.

—लालन, कां रडतेस अशी ? तुला स्वतःचं हित कळत नाहीं का ?

—माझ्या हिताकरितां कांहींहि करायचं ? हृदय दिखील मारून टाकायचं का ?— लालननें दीनपणें विचारलें.

—कलावंतिणीनं आपलं हृदय मारून टाकावं तेव्हांच ती आपल्या धंद्यांत यशस्वी होते. हृदयाला किंमत देशील तर तुझ्या नशिबांत सुख नाहीं असं समज.

—सध्यां मी सुखी आहें असं तुला वाटतं ?

—सुखी नसायला काय झालं तुला ? काय उणं आहे तुला, सांग ना ग ? दर-महा शंभर देणारा यजमान नागेशाच्या कृपेनं मिळाला आहे. हातांत सोन्याच्या वांगड्या आहेत, कानांत दोनशें रुपयांचीं मोत्यांचीं कुडीं आहेत; आणखी काय पाहिजे तुला ? तुम्हांला हें हृदयाचं वेड लागलं म्हणजे सुख तें तुम्हांला दुःख दिसतं व दुःख तें सुख वाटूं लागतं.—पैशांत सुख असतें हें व्यावहारिक तत्त्व जपणारी मावशी ! तिला काय ठाऊक कीं सुखी व्हायला भावनांची गरज असते !

उत्तरादाखल लालननें एक लांब सुस्कारा सोडला. त्या सुस्काऱ्यांत केवढा अर्थ भरला होता !

—लालन, तुला आपलं हित कळत नाहीं. वेश्येचा धंदा मोठा कठीण आहे. कोणत्या भांडवलावर हा धंदा चालतो सांग पाहूं ?—मावशीनें विषयाशीं तादात्म्य होऊन प्रश्न केला.

लालनला या विषयाचा मनापासून कंटाळा आला. तिनें कांहींच उत्तर केलं नाहीं.

मावशी पुढें म्हणाली,—सौंदर्य व तारुण्य हें आमच्या धंद्याचं भांडवल ! तें नसलं तर उपाशीं मरायची पाळी. पुरुषांना तुझ्या मनाची काय पर्वा ? तुझ्या गुणांकडे कोणी ढुंकून देखील पहात नाहीं. तारुण्य दिसलं तर लोक तुझ्या घरांत प्रवेश करतील. म्हणून सौंदर्य व तारुण्य राखण्याची काळजी तूं घेतली नाहींस तर तुझी स्थिति कठीण होईल.—मावशीचें हें व्यावहारिक सत्य लालनला पटलें. पण तें ऐकून तिचा हृदयस्थ मोठेपणा दुखावला.

—पण त्याकरितां कांहींहि करायचं ?—लालननें विचारलें.

—आमचा धंदा ह्याच मुळीं पापानं भरलेला ! त्याच्यापुढं सगळीं पापं तुच्छ आहेत ! हा धंदा सोडायचा वेडेपणा तुला करावयचा नाहीं ना ? मग मी सांगितलेला उपाय तुला केलाच पाहिजे !

—मावशी, या खेपेला असं नको करूं. माझं मन तळमळत आहे...!

—मुलाकरितां का ? पण एकदां का मूल झालं कीं तुझ्या तारुण्याचं–सौंदर्याचं मातेरं झालं म्हणून समज. पुरुषांना तुझं मूल नको. तुझं सौंदर्य हवं. तुझ्या

तारुण्याचं, सौंदर्याचं मोल देऊन तुला मूल विकत घ्यायचं असलं तर तसं कर. पण मुलाच्या रडण्याला तुझ्या रडण्याची साथ तुला जन्मभर करावी लागेल.

—मावशी, किती कठोर होतेस ग तूं?

—लालन, मी कठोर नाहीं. सत्य कठोर आहे. जास्तींत जास्त काळ तारुण्य टिकविणं व त्याच्या बळावर पुढल्या आयुष्याकरितां संपत्ति मिळवून ठेवणं हेंच आम्हां वेश्यांचं भवितव्य! म्हणून सांगतें कीं, हृदयाचं खूळ बाजूला ठेव आणि उद्यां मी देईन तें औषध घेऊन टाक.

—मावशी, पण 'त्यांना' मूल असावं असं वाटलं तर तुझं कांहीं म्हणणं नाहीं ना?

—अशी संमति देणारा पुरुष तुझ्याकडे कां आला असता? शिवाय, जन्मभर तुला ठेवून घेईन असा त्यानं तुझ्याशीं करार केला आहे का? तसं असेल तर त्याच्या संमतीला किंमत. नाहीं तर, आतां म्हणेल तुला मूल होऊं दे आणि नंतर तुला टाकून जाईल तो.

—मावशी, मी गोंधळांत पडलें आहें! काय करावं तें मला कळत नाहीं! हृदयाची ओढ मात्र कळते.—लालन निराश होऊन म्हणाली.

आणि इतक्यांत, घराच्या पायऱ्या चढून एक रंगेल, श्रीमंतीची झांक मारीत असलेला तरुण घरांत शिरला!

० ० ०

लालन नुकतीच किती दुःखी होती! चेहरा उदासीन दिसत होता! हृदय जळत होतें, डोळ्यांतून अश्रू वहात होते. पण अप्पासाहेबांवर नजर पडतांच तिनें चेहरा हंसरा केला, अश्रू पुसून टाकले, मुखावर उसने नाटकी भाव खेळविले. ती कृत्रिम बनली. आणि एवढें तिनें कां केलें? तिला मावशीचें सत्य पटलें. तिच्या मनांत विचार आला, 'मला रडण्याची देखील चोरी! आवडत्या माणसाला दुःख सांगतां येण्याचें भाग्य आपल्या नशिबीं नाहीं. हृदय जळत असलें, तरी परपुरुषांना संतुष्ट ठेवण्याकरितां आनंदी, हंसतमुख असलं पाहिजे! त्यांची इच्छा पुरविण्याकरितां स्वतःच्या इच्छेविरुद्ध वागलें पाहिजे! पैशाकरितां हृदय विकलें पाहिजे!'

अप्पासाहेब खोलींत गेला व त्याच्या मागोमाग, लालन आंत गेली. त्यानें खुर्चीवर अंग टाकून हंसत हंसत म्हटलें,

—'लालन, पालखीपुढं नाचायला कां आली नाहींस तूं आज?

खुर्चीला अगदीं टेंकून, त्याला सहेतुक स्पर्श करीत ती उभी होती. हृदयांत चाललेली खळवळ लपवून, आनंदी दिसायची कला तिला चांगली अवगत होती. थोड्या वेळापूर्वी रडणारे तिचे काळेभोर, चंचल डोळे आतां हंसत होते. ओंठाच्या पाकळ्यांची ठेवण तिनें मुद्दामच अशी बनविली होती कीं, आपल्या शुभ्र बारीक दांतांची शोभा सगळ्या चेहऱ्यावर पसरावी. मोत्याचा पाणीदार तांबुसपणा आणि हिऱ्याचें तेज यांना घनीभूत करून परमेश्वरानें तिचे दांत घडविले आहेत असेंच कुणालाहि वाटावें. ओंठांची मोहक हंसरी ठेवण आणि हनुवटीचा रेखीव, कलायुक्त आकार यांचा सौंदर्यपूर्ण मिलाफ पाहून तिच्या चेहऱ्याकडे पाहाणाराचें मन उल्हसित होई. पाण्याच्या कारंजांतून नयनमनोहर फवारा सतत उडावा त्याप्रमाणें आपल्या प्रत्येक अवयवांतून नवेंनवें सौंदर्य प्रतीत व्हावें म्हणून ती क्षणाक्षणाला काळजी घेई. आणि त्यामुळें, तिच्या मानसिक शक्तींना पडणारा ताप तिला मनांतून असह्य होई.

तिला केव्हां केव्हां असें वाटे कीं, आपण जशी आहों तशी दिसावें. अप्पासाहेबांना आनंदित ठेवण्याकरितां कराव्या लागणाऱ्या लाघवीपणाचा, कृत्रिमतेचा तिला फार कंटाळा येई !

तिनें भिंतीला टांगलेला, कलाबतूनें मढविलेला एक सुंदर रेशमी पंखा काढला व त्यानें ती अप्पासाहेबांना वारा घालूं लागली. वारा घालतांना होणाऱ्या तिच्या हाताच्या हालचालीवर व बोटांच्या चलनवलनावर तिचें किती लक्ष्य होतें ! त्यांत किती कृत्रिमता, सहेतुकता होती ! अप्पासाहेबांनीं तिच्या हातून पंखा घेतला व तिचा उजवा पंजा पकडून फिरून तोच प्रश्न केला.

—लालन, पालखीपुढं नाचायला कां गेलीस नाहींस तूं आज ?

मावशीनें केलेलाच प्रश्न ! त्याला उत्तर काय द्यायचें ? तिला दिलें तेंच. पण तें कौशल्यानें दिलें पाहिजे, मावशीनें आणूं घातलेलें संकट टाळण्याची युक्ति शोधून काढली पाहिजे, असा विचार मनांत आणून, तिनें शालीनतेनें, लाडिकपणानें म्हटलें,

—काय गरज होती माझी तिथं ?

—इतर कलावंतिणी कां गेल्या होत्या तिथं ?—अप्पासाहेबांनीं प्रश्न केला.

—लोकांचं मनरंजन करायला–आपलं सौंदर्य दाखवायला !—लालननें नाजुकपणानें, आवाजांत माधुर्य आणून भावनानुरूप हावभाव करून म्हटलें.

—मग तूं देखील लोकांचं मनरंजन करायला व तुझं सौंदर्य दाखवायला जायचं होतंस.

—पण, मला त्याची गरज नाहीं. तुमचं मनरंजन झालं कीं पुरे ! माझं सौंदर्य आपण पहात असतांना इतरांना तें दाखविण्याची मला काय गरज ?—यावेळीं तिनें चेहऱ्यावर लहान मुलाचे सरल, निष्पाप भाव खेळविले. तिचे उद्गार ऐकून कुणाला आनंद झाल्याशिवाय राहील ?

—खरंच का माझ्यावर तुझं इतकं प्रेम आहे ?

—मी जातीनं वेश्या असलें, म्हणून माझं तुमच्यावर प्रेम आहे हें सांगणं देखील कसंसंच वाटतं.—पण क्षणापूर्वी हंसणाऱ्या चेहऱ्यावर आतां गांभीर्याचें, उदासीनतेचें आवरण पडलें !

अप्पासाहेबांना वाटलें, तिला आपला राग आला. त्यानें तिला आपल्याजवळ ओढली व तिचा हात आपल्या हृदयाजवळ धरून म्हटलें,

—लालन, तूं मला किती आवडतेस !

—खरंच ! अन् आपण देखील मला कित्ती कित्ती आवडतां ! पण, मी आपणाला एक विचारूं का ? रागावणार नाहीं ना आपण ?—लालननें सर्वस्वी आपण अप्पासाहेबांचीच आहों अशा आविर्भावानें म्हटलें.

—विचार तूं. नाहीं रागवायचा तुझ्यावर मी.—तिच्या नाजुक शुभ्र बोटांशीं खेळत त्यानें म्हटलें.

लालननें खिडकींतून बाहेर पाहिलें. पोफळीच्या दाट झाडीवर चंद्रबिंब दिसत होतें. खालीं तलावांतील पाण्यांत, कांठच्या दिव्यांचें प्रतिबिंब पडलें होतें. थोड्या वेळानें तिनें प्रश्न केला,—मी कां आवडतें आपल्याला ?

—कां म्हणजे ?—तो थांबला. त्याला सुचेना. खरें उत्तर द्यायचें तर तें इतके दिवस फिरून फिरून सांगितलेल्या प्रेमाशीं विसंगत ! त्यानें तोंड उघडलें व आश्चर्ययुक्त नजरेनें तो लालनकडे पाहूं लागला !

—कां आवडतें मी आपल्याला ?—तिनें प्रश्न केला;

—म्हणजे–? माझं तुझ्यावर प्रेम आहे म्हणून.—त्यानें उत्तर केलें, व एका संकटांतून सुटल्याप्रमाणें मुद्रा केली. आपण किती छान उत्तर दिलें असें त्याला वाटलें.

—आपण कां करितां माझ्यावर प्रेम ?—लालननें लहान मुलाच्या लाडिक हट्टीपणानें विचारलें.

—तूं गुणी आहेस म्हणून !—त्यानें उत्तर केलें व विजयानंदानें तिच्याकडे निरखून पाहिलें.

लालन खूष झाली. मावशीचें म्हणणें खोटें ठरत आहे म्हणून तिला आनंद झाला. आपल्या तारुण्याकरितां नव्हे, तर आपल्या गुणांवर लुब्ध होऊन अप्पा-साहेब आपल्यावर प्रेम करीत आहे, हें कळून तिच्या हृदयांत सुखसंवेदना उत्पन्न झाल्या. मुलाच्या पायीं आपलें तारुण्य कमी झालें तरी आपणाला भय नाहीं असें तिला वाटलें.

पण कलांवतिणीचा जातिवंत धूर्तपणा तिच्या अंगीं होता. त्याला अनुसरून तिनें म्हटलें,—माझे कोणते गुण आपल्याला आवडतात ?

अप्पासाहेबांना फिरून पेंच पडला. त्यानें क्षणभर विचार करून म्हटलें,

—तूं सुंदर आहेस. तुझें गाणें मधुर आहे. नृत्यकलेंत तूं पारंगत आहेस. वादन देखील तुला अवगत आहे. आणखी कोणते गुण पाहिजेत ? नमुनेदार कलावंतिणीचे सगळे गुण तुझ्यापाशीं आहेत.

—हें खरं ना ? मी आपल्याला आवडतें ना ? आपलं माझ्यावर प्रेम आहे ना ?—लालननें त्याचें मन अंकित करण्याच्या सर्व कृति करून म्हटलें.

—काय हा प्रश्न ? तुझ्या प्रेमाकरितां मी कांहींहि करीन...

—खरं ना हें ? मग आपलं प्रेम वाढावं, तें चिरस्थायी व्हावं, असं आपल्याला वाटत नाहीं का ?—त्याच्यावर आपली मोहिनी पसरवून लालननें विचारलें.

—आपलं प्रेम चिरस्थायी होण्याकरितां काय करूं मी ?

—आपल्या प्रेमाची साक्ष म्हणून माझ्या मांडीवर एखादं मूल खेळावं असं आपल्याला वाटत नाहीं का ?—हा प्रश्न करतांना तिचें हृदय जोरानें धडधडत होतें. आप्पासाहेबांच्या संमतीकरितां तिचा जीव धडपडत होता.

—मग, मूल होणं आपल्या हातांत आहे का ? तुला मुलाची आवड खरी. पण मी तुला मूल कुठून देणार ?—त्यानें उत्तर केलें. लालनचा आंतरहेतु त्याला काय ठाऊक ?

—पण आपलं मूल आपण मला मांडीवर घेऊं द्याल ना ? आपल्या मांडीवर तें आपण बसवाल ना ?—यावेळीं भावनेद्रेकानें तिचा स्वर गद्गदित झाला. डाव-पेंच खेळणारी चतुर लालन यावेळीं उघड, सरळ झाली. तिला गहिंवरून आलें !

लालनचे प्रश्न ऐकून अप्पासाहेब चमकला. अकस्मात् अंगावर चाबूक बसतांच एखाद्याची मुद्रा भयचकित व्हावी, तशी त्याची स्थिति झाली. आपल्यापासून

लालनला मूल व्हावें, ही गोष्ट त्याला अकल्पित वाटली. त्यानें आश्चर्यानें विचारलें,

—म्हणजे ? काय बोलतेस तूं लालन ?

अप्पासाहेबांच्या चेहऱ्यावरील दुःखी भाव पाहून लालनला वाईट वाटलें. तिनें म्हटलें,—आणखी पांच सहा महिन्यांनीं मी आई होणार !

तिला मुलाच्या प्रेमाचें भरतें आलें. तिची कृत्रिमता नष्ट झाली.

—लालन, काय बोलतेस तूं हें ?—कोणतें तरी संकट आपल्यावर ओढवत आहे अशा आविर्भावानें त्यानें म्हटलें.

—आपलं मूल आपल्याला नको का ?—तिनें केविलवाण्या मुद्रेनें विचारलें.

—पण लालन,–हें पहा–मूल झालं तर–तुझं कसं होईल ?—अप्पासाहेबांनीं अडखळत म्हटलें. तो गांगरल्यासाखा झाला.

—माझं कसं होईल कीं आपलं कसं होईल ?—एवढा वेळ अप्पासाहेबांचें मन राखून बोलणारी शांत, मधुर लालन आतां स्पष्ट बोलूं लागली.

—लालन, हें पहा. तूं शहाणी आहेस. मूल म्हणजे विघ्नच नाहीं का ?—त्यानें लालनला जवळ ओढून आर्जवाच्या स्वरांत म्हटलें.

लालनला संताप आला. आपण आई होणार हें कळतांच आप्पासाहेबांना आनंद होईल अशी तिची अपेक्षा होती. ती चुकली. तिच्या नाजुक भावना एकदम दुखावल्या. तिनें स्पष्ट शब्दांत त्याला विचारलें,—मूल झाल्याबरोबर माझे गुण नाहींसे होतील असं आपणाला वाटतं काय ?

—तसं नाहीं. पण आपल्या सुखांत, आनंदांत व्यत्यय येईल ना ? मूल म्हटलं कीं रड आलीच. शिवाय मुख्य असं कीं, तुझं आरोग्य खालावेल.—अप्पासाहेबांनीं निर्विकार राहून म्हटलें.

लालनला मावशीचें म्हणणें पटलें. पुरुषांची दृष्टि हीन खरीच. आप्पासाहेबांचा तिला कंटाळा आला.

—मूल झालें तर माझ्या तारुण्यांत, माझ्या सौंदर्यांत कमतरता येईल असंच ना ? माझ्यावर आपलं प्रेम होतं ना ? मग मला मूल झालं तर तें प्रेम कमी कां व्हावं ?—लालन कळवळून बोलत होती.

—तसं नाहीं लालन. तूं शहाणी ना ? तुला सगळं मीच कां सांगितलं पाहिजे ? आयुष्यांतील दिवस आनंदांत घालविण्याकरितांच मी इथं येतों ना ? घरांतला

मुलांवाळांचा त्रास चुकविण्याकरितां मी तुझी संगत धरली आहे. घरीं रड, इथेंहि रड. मग कसं होईल ?—अप्पासाहेबांचें अंतरंग खऱ्या स्वरूपांत प्रगट झालें.

लालननें एवढा वेळ थोपवून धरलेले अश्रू आतां वाहूं लागले. तिला गुदमरल्यासारखें झालें. तिचें मन कुणालाच समजलें नाहीं. मावशी व्यावहारिक; तिला पैसा पाहिजे. अप्पासाहेब विषयाचे भोगी; त्यांना तारुण्य पाहिजे. आणि आपणाला प्रेम पाहिजे. तें या दोघांजवळहि आपणास मिळणार नाहीं. पोटांत फिरणारा गर्भच आपली तळमळ शांत करूं शकेल.

तिनें मनाचा निर्धार करून म्हटलें,—मग आतां काय करायचं ?

—अवघे दोनच महिने गेले आहेत तुला.मावशीकडून औषध आणून घे म्हणजे झालं.—अप्पासाहेबांनीं अगदीं साधा उपाय सांगितला.

—आपण देखील इतके कठोर होतां का ?—तिचा कंठ दाटून आला. आपल्याइतकी असहाय्य स्त्री जगांत दुसरी कोणीच नाहीं असें तिला वाटलें.

—इतर सगळ्या कलांवतीणी असं करीत नाहींत काय ? तारुण्य व सौंदर्य न राखलं तर कलावंतिणीला कोण विचारतो ?—अप्पासाहेब निर्लज्जपणें म्हणाले.

लालननें पदरानें अश्रू पुसले व निराश, उदास अंतःकरणानें तिनें खिडकींत येऊन श्रीनागेशाच्या दीपस्तंभावर शून्यपणें नजर टाकली.

लालनला आपल्या स्थितीची आतां चांगली कल्पना आली. कलांवतीण म्हणजे परिस्थितीच्या बंधनांनीं बांधली गेलेली स्त्री. इतरांच्या दृष्टीनें ती स्वतंत्र.पण स्वतःच्या भावनांचें जिला समाधान करतां येत नाहीं, मातृपदासारखी नैसर्गिक स्थिति जिला मिळूं शकत नाहीं, ती स्त्री कसली स्वतंत्र ? हृदयाची ओढ शांत करण्याकरितां मावशीच्या–अप्पासाहेबांच्या म्हणण्याविरुद्ध गेलें तर पुढचें आयुष्य त्रासांत जाणार हें निश्चित. आपल्याला मूल झालें तर अप्पासाहेब आपल्याला सोडून दुसऱ्या तरुणीच्या संगतींत राहील. मूल झालेली कलावंतीण त्याच्या दृष्टीनें निरुपयोगी ! माझे गुण, माझ्या भावना कुणाला पाहिजेत ? मावशीला पैंसा पाहिजे, अप्पासाहेबांना तारुण्य, करकरीत तारुण्य पाहिजे. पण या पेंचांत मी कशी जगेन ? लालन याप्रमाणें विचार करूं लागली.

० ० ०

कालची लालन आज बदलली होती. कलावंतिणीचा लाघवीपणा नष्ट झाला होता. सौंदर्याचीं कृत्रिम साधनें तिला नकोशीं झालीं होतीं. दुसऱ्याला मोह घालण्यासाठीं उपयोगी पडणारे दिखाऊ नाटकी भाव तिला आतां निरुपयोगी वाटूं लागले.

लालन खऱ्या स्वरुपांत दिसत होती. तिचे केंस अव्यवस्थित व मोकळे सुटले होते. चेहऱ्यावर गांभीर्य पसरलें होतें. डोळ्यांतील चंचल भेदकपणा नष्ट झाला होता. तिचें हृदय व देह यांत सुसंवादीपणा उत्पन्न झाला होता.

मावशीनें तिला म्हटलें,—लालन, माझं म्हणणं पटलं ना तुला ?

लालननें उत्तर केलें नाहीं. आपल्या पोटच्या गोळ्याला क्रूरपणें मारूं पाहणारी मावशी आपली वैरीण आहे, असें तिला वाटलें. मावशीच्या आधारावर आपण वाढलें, ती आपली जाणती आहे; तेव्हां अंगावर असलेले दागिने काढून मावशीच्या अंगावर फेंकून द्यावे व कुठें तरी गरिबीनें, या धंद्यापासून अलिप्त राहून, दिवस काढावे असें तिला वाटलें. पण मावशीचा जाच नको !

मावशी म्हणाली,—लालन, अशी डोक्यांत राख घालून कसं चालेल ? हें पहा, मोठ्या प्रयासानें मी तुझ्याकरितां औषध आणलं आहे. तूं आपलं म्हणणं खरं करशील तर उपाशीं मरण्याची पाळी येईल आमच्यावर !

मावशीनें पुढें केलेली औषधाची बाटली लालननें हातांत घेतली व पुढें पसरले तलावाच्या पाण्यांत भिरकावून दिली !

मावशी स्तंभित झाली !

पण, हीन, तामसी, कृत्रिम भावनांचा आपल्यांत नाश होत असून, आपल्या हृदयांत उच्च, सात्त्विक, नैसर्गिक भावनांचा उदय होत आहे असें लालनला वाटलें. तिनें भक्तिभावानें दोन्ही हात जोडून सद्गदित अंतःकरणानें म्हटलें,

—नागेशा ! मला धीर दे !

अंतरींची ओढ

ले.—मे १९३१
प्र.—मनोरंजन ३२

# चिरंतन फसवणूक

पश्चिम क्षितिजावर निसर्गाचा कुशल, अदृश्य हात अद्‌भुतरम्य रंगांत गंधर्वनगरी रचीत होता.

वुंदा आणि वसुधा एका नाजुक जिव्हाळ्याच्या विषयावर घराच्या व्हरांड्यांत बोलत बसल्या होत्या.

हिंदु स्त्रियांना वैवाहिक सुखदुःखाशिवाय दुसरा जिव्हाळ्याचा विषय कोणता असणार ? लहानपणापासून साऱ्या आशा–अपेक्षा वैवाहिक सुखावर केंद्रित झालेल्या असतात. त्यामुळें ह्या सुखाला स्त्री अंतरली म्हणजे सर्वस्वनाशाचें दुःख तिला होत असतें. आणि हें दुःख निवेदन करून आपलें जड हृदय हलकें करायला, तिला कुणी तरी जिव्हाळ्याचें माणूस हवें असतें. असलें माणूस मिळावें म्हणूनच वसुधा दोन वर्षांनंतर वुंदेच्या भेटीला मुद्दाम आली होती.

रामायण–महाभारत वाचून त्यांतील उदात्त, पत्नीव्रत आणि तपोनिष्ठ पुरुषांचें चारित्र्य अवलोकून वसुधेनें लहानपणापासून आपल्या भावी नवऱ्याचें कल्पनाचित्र रेखाटलें होतें. सीता हरवली तेव्हां रामानें किती शोक केला ! लतावृक्षांना अलिंगनें दिलीं. वेड्यापिशाप्रमाणें मिळेल त्या वस्तूला सीतेसंबंधीं विचारलें. नळराजाचीही अशीच स्थिति झाली होती. असल्या आदर्शभूत पुरुषांच्या चरित्रवाचनाचे संस्कार वसुधेच्या मनावर झाले होते. त्यामुळें आपणासाठीं जगणारा एकनिष्ठ नवरा आपल्याला मिळावा अशी तिची अपेक्षा होती.

वसुधेच्या नवऱ्यांत बाकीचे सगळे गुण होते. विद्वत्ता, रूप, धाडस, प्रेमळपणा या स्वभावविशेषांनीं त्याचें चारित्र्य नटलें होतें. हजारों सर्वसामान्य लोकांवर आपल्या बौद्धिक तेजानें वजन पडणारा तो पुरुष होता. परंतु, पत्नीव्रताच्या बाबतींत तो

आदर्श पुरुष नव्हता. आपल्याखेरीज इतर कांहीं स्त्रियांशीं त्याचा प्रेमसंबंध आला आहे; विवाहापूर्वी देखील त्याची ही भ्रमरवृत्ति लोकांना परिचित होती; इत्यादि गोष्टी वसुधेला ज्यावेळीं समजल्या, त्यावेळीं आपल्या संसारसुखाचा पायाच कोसळला असें वाटून ती पोरक्या मुलाप्रमाणें खूप रडली. ती मनांतल्यामनांत त्याचा तिटकारा करूं लागली; परंतु हा तिटकारा व्यक्त करून नवऱ्याला आपल्या दृष्टीनें सन्मार्गगामी करण्याचा धीर तिला झाला नाहीं. तिचा संताप, तिचा तिटकारा तिच्या हृदयांत धुमसत राहिला आणि तिला जाळूं लागला. ह्या वेदना असह्य झाल्या, तेव्हां तिला वाटलें, आपली जीवाभावाची मैत्रीण वुंदा आपल्याला कांहींतरी उपाय सुचवील. आणि म्हणूनच कोणताही आडपडदा न ठेवतां आपलें असीम दुःख तिनें वुंदेला सांगून टाकलें.

वातावरणांतून उष्णतेचे निःश्वास बाहेर पडत होते. वाऱ्याची झुळूक नसल्यामुळें समोरच्या पिंपळाचीं पानें स्तब्ध होतीं. बाजूच्या ओहळांतील पाणी आटून गेलें होतें. आणि पाण्याची बारीक धार तळांतल्या खड्यांवरून वाहतांना सर्पसदृश हाल-चाल करीत, निस्तेज सूर्यप्रकाशांत चमकत होती. दोन हांकांच्या अंतरावर कांहीं लहानमोठ्या टेकड्या आकाशांत शून्यपणें उठून दिसत होत्या, आणि त्यांच्या मस्तका-वरील झाडींनें तेथील क्षितिजाचा परिघ अगदींच आकुंचित झाला होता.

वसुधेचा चेहरा दुःखानें लालसर झाला होता. आपल्या अमर्याद संकटाची जाणीव तिच्या अश्रुपूरित नेत्रांत तरळत होती. आपलें सौंदर्य मोहक खरें. परंतु आपल्या पुरुषाला हस्तगत करायला तें किती अपुरें पडतें ह्याची जाणीव तिच्या हृदयावर असूयेचे, अपमानाचे कढ उत्पन्न करी; आणि त्यांचे आवर्त तिच्या नाजुक ओंठावर प्रतीत होत होते.

संसार ही एक समरभूमि आहे. नशीब, प्रयत्न इत्यादि गोष्टींवरच तेथील जयापजय अवलंबून असतो. या युद्धांत वसुधा पराजित झाली होती. आणि विजयानंदाची भावना वुंदेच्या अंतरंगांत गुदगुल्या करीत होती. वुंदा दुष्ट होती, असें नव्हे. उलट वसुधेच्या निःसहाय स्थितीची तिला दयाच आली. परंतु, माणूस जीवाभावाचें झालें तरी, त्याला पीडणाऱ्या दुःखापासून आपण मुक्त आहोंत ही जाणीव आपल्याला सुखदायक असतेच. त्या न्यायानें वैवाहिक सुखाच्या बाबतींतील आपलें श्रेष्ठत्व वुंदेनें मनांत प्रस्थापित केलें, आणि मग ह्या बाबतींत वसुधेशीं बोलायला,

तिला सल्ला द्यायला, आपण अधिकारी आहोंत अशी तिनें आपल्या मनाची समजूत करून घेतली.

तसें पाहिलें तर वसुधा वुंदेपेक्षां कितीतरी बावतींत सरस होती. नवऱ्याला अंकित करण्याचे गुण वुंदेपेक्षां तिच्या अंगांत अधिक होते. ती धूर्त होती. बऱ्याच मोठ्या प्रमाणांत ती स्वाभिमानीही होती. उलट प्रेमळपणा आणि विश्वासशीलता हे वुंदेचे स्वभावविशेष होते.

वसुधेचें सगळें म्हणणें ऐकल्यावर वुंदेनें तिला विचारलें,—तुझा नवरा तुझ्यावर प्रेम करीत नाहीं का ग ?

हा प्रश्न ऐकतांच वसुधा कावरीबावरी झाली. तिनें आपल्या मैत्रिणीला नवऱ्या-संबंधीं इतर गोष्टी सांगितल्या होत्या. परंतु तो आपल्यावर नेहमींप्रमाणेंच प्रेम करीत आहे, त्याच्या सान्निध्यांत असतांना संसारांतली कोणतीच उणीव आपल्याला जाणवत नाहीं, त्याच्या चंचलतेमुळें त्याच्यावद्दल वाटणारा तिरस्कार देखील आपण त्या क्षणांत विसरून जातों, ही वस्तुस्थिति तिनें उघड केली नव्हती. म्हणूनच, आतां आपल्या नवऱ्याचे इतर गुण लक्षांत आल्यावर तिनें म्हटलें,

—तसं म्हणशील तर ते माझ्यावर प्रेम करतात. परंतु, इतर स्त्रियांशीं त्यांचा संबंध आला आहे हें समजल्यापासून मला असं वाटूं लागलं आहे कीं, ज्याला मी प्रेम समजत होतें तें खरं प्रेम नसून तो एक दांभिकपणा आहे, तें एक ढोंग आहे.

—म्हणजे ते तुझ्यावर प्रेम करीत नसून तुझी फसवणूक करण्यासाठीं ते तुझ्या-जवळ प्रेमाचा फार्स करीत आहेत असं तुला वाटतं का ?

—ते माझ्याशीं एकनिष्ठ नाहींत म्हणूनच मला तसं म्हणावंसं वाटतं.

—म्हणजे त्यांच्या प्रेमांत तुला कोणतीच उणीव दिसून येत नाहीं. परंतु प्रेम हें एकनिष्ठ असलं पाहिजे, आणि ते एकनिष्ठ नाहींत, अशी तुझी समजूत असल्या-मुळं तुला त्यांचं प्रेम कृत्रिम व दोषास्पद आहे असं वाटतं, नाहीं का ?

—बुंदा, मी तुला एक गोष्ट विचारतें, तिचं उत्तर देशील का मला ?

—हो, विचार तूं अवश्य.

—एकीपेक्षां अधिक स्त्रियांवर एखादा पुरुष सारख्याच उत्कटतेनं, सरळपणानं प्रेम करूं शकतो असं तुला वाटतं का ?

—ह्या बावतींत आम्ही केवळ कल्पनाच करावयाच्या. त्यापलीकडे आम्हांला जातां येत नाहीं. असले अनुभव पुरुष आम्हांला सांगत नाहींत, असं नाहीं का तुला वाटत?

—पण तुझं मत सांगायला हरकत आहे का कांहीं?

—मला असं वाटतं कीं, सारख्याच उत्कटतेनं, मनःपूर्वक, एक पुरुष दोन स्त्रियांवर प्रेम करूं शकेल. सामाजिक व नैतिक कडक बंधनांच्या अभावीं बनलेली शिथिल मनोवृत्ति, जगांत नेहमीं मोकळेपणानं फिरण्याचा प्रसंग येत असल्यामुळं, निरनिराळ्या मोहांचा मनावर होणारा परिणाम, वैषयिक सुखोपभोगाच्या बावतींत पुरुषांची स्वभावतःच असलेली भिन्न प्रवृत्ति, इत्यादि गोष्टींमुळं पुरुष एकपत्नीव्रत होऊं शकत नाहीं असं मला वाटतं. परंतु त्यांची वृत्ति स्वभावतःच अशी असते, म्हणूनच तो ढोंगाचा आश्रय केल्याशिवाय पुष्कळ स्त्रियांवर प्रेम करूं शकतो. आणि याचकरतां मला वाटतं कीं, तुझा नवरा तुझ्यावर जें प्रेम करतो तें खरंखुरं असलं पाहिजे.

—पुरुषप्रेमाच्या बावतींत तूं जो हा नियम सांगितलास त्याला तुझा नवरा अपवाद नाहीं ना?

—वसुधा, मी तुझ्यापासून कांहीं लपवून ठेवलं आहे का कधीं?

—नाहीं. म्हणूनच मी तुला विचारतें कीं, तुझा नवरा तुला फसवीत नाहीं ना?

—पुरुष स्वभावतः चंचल हें खरं असलं तरी, आपल्या पत्नीवर त्याचं अलोट, धार्मिक स्वरूपाचं प्रेम असलं तर तो असल्या प्रकृतीला बंधन घालूं शकतो. त्यांच्या बावतींत असं घडलं आहे, असं मला वाटतं. कोणतीच कृत्रिम भिंत आमच्यांत उभी नाहीं. आपलीं सगळीं गुपितं, सगळीं रहस्यं मला सांगायला त्यांची तयारी असते. माझ्यासाठींच ते जगत असावेत असं मला केव्हां केव्हां वाटतं. आपल्यावर आलेले कांहीं मोहाचे प्रसंग त्यांनीं मला सांगितले आहेत; आणि अशा वेळीं कोणत्या मनोधैर्याच्या बळावर त्यांतून ते पार पडले आहेत तें मला चांगलं माहित आहे.

—वुंदा, मी देखील हल्लींहल्लींपर्यंत असंच समजत होतें. परंतु, त्यांचं प्रेम माझ्यावर असलं तरी इतरांवर देखील आहे ह्या गोष्टीचे मला पुरावे मिळाले म्हणूनच त्यांच्यावरील माझा विश्वास उडाला आहे.

—वसुधा, सध्यां तरी मी एका गोड श्रद्धेंत रमून गेलें आहें. आणि कधीं काळीं त्यांच्या हातून वाईट कृत्य घडलंच, आणि त्यांनीं तें मला न सांगितलं, तरी माझी गोड श्रद्धा कायमच राहील. जग फसत असलं तरी आपल्या फसवणुकीची त्याला जाणीव नसल्यास, त्याला दुःखी होण्याचं कारण नाहीं. कटु सत्यापेक्षां गोड फसवणूक देखील चांगली नाहीं का ?

सूर्य अस्ताला गेला. संध्येची रहस्यमय सावली सर्वत्र पसरली. पश्चिम क्षितिजा-वरील रंगांचें मोहजाल अदृश्य झालें. आकाशाच्या निळसर घुमटावर पांढरे धूसर पट्टे ओढलेले दिसूं लागले. जवळच्या दाट झाडींतून विरल धुराचीं वर्तुळें आकाशांत चढूं लागलीं. आणि दोन टेकड्यांच्या खांचींत लपलेल्या एका देवळाच्या प्राकारांतून सनईचे स्वर तें शांत वातावरण कंपित करूं लागले.

वसुधेचें मन किती तरी हलकें झालें.

० ० ०

तापाचें निमित्त होऊन वुंदा आजारी पडली. दोन तीन दिवसांतच आजार वळावला आणि ताप टायफॉइड ठरला. वुंदेचा नवरा रमेश अतिशय गांगरून गेला. वुंदा त्याला जीव कीं प्राण होती. वेळीं अवेळीं वुंदा त्याच्या प्रेमाची आपल्या मैत्रणीपाशीं स्तुति करी ती अस्थानीं नव्हती. तिचें रूप, तिचे गुण रमेशला आवडत होते. त्याचा बोलका, विनोदी, मोकळा स्वभाव, तिच्या स्निग्ध सहवासांत खुलून दिसे. त्याचें व्यक्तित्व तिच्या सहवासांत विकसत होतें. त्यांच्या जीविताचे प्रवाह एकत्र झाले होते. रमेशनें दिवसरात्र तिच्या शेजारीं बसून आपल्या जीवि-ताची ज्योतच निस्तेज होत जाणाऱ्या तिच्या शरीरांत ओतली होती.

डॉक्टरचें भाकित खोटें ठरवून वुंदा वांचली. रमेशची प्रचंड इच्छाशक्ति आणि त्यानें सोसलेले खडतर त्रास, यामुळें ती वांचली असें लोकांना वाटलें. रमेशला वाटलें, आपलें उत्कट प्रेमच विजयी ठरलें.

ताप जाऊन महिना झाला, तरी वुंदा अंथरुणावरून उठली नाहीं. या अवधींत रमेश तिच्या शुश्रुषेसाठीं घरींच राहिला.

वुंदा उठूं फिरूं लागली, तेव्हां रमेश आपल्या विम्याच्या व्यवसायानिमित्त घरा-बाहेर पडूं लागला.

० ० ०

दोन दिवसांच्या गैरहजेरीनंतर तो आजच घरीं आला होता. आजारामुळें वुंदा पलंगावर पडून होती. जवळच्या खिडकींतून वाऱ्याच्या झुळका आंत येत आणि पिंपळाच्या पानांचा नाच खोलींतून दृष्टीस पडे. कांहीं अंतरावर पोफळींची शुभ्र, सरळ खोडें, आणि केळींचीं गोंडस डौलदार झाडें दिसत होतीं. या दृश्याकडे पहात वुंदा आपला बहुतेक वेळ घालवी.

रमेशला पाहतांच तिला कितीतरी आनंद झाला. घाईघाईनें पलंगाच्या कठड्याला ती टेंकून बसली आणि तिनें म्हटलें,

—दोन दिवस आपण नसल्यामुळं मला इथं किती कंटाळा आला !

—मला देखील.

—आपणाला कंटाळा यायला काय झालं ? आजाऱ्याच्या सहवासांत आपण सतत तीन महिने राहिलांत. इथून निघाल्यावर आपणाला किती तरी बरं वाटलं असेल !

—इथं कंटाळा येतो म्हणून मी निघालों का इथून ?—रमेश तिचे हात कुरवाळीत म्हणाला.

—कामाकरितां निघून गेलांत आपण हें माहित आहे मला. पण नेहमीं बाहेर फिरायची आपल्याला संवय होती ना ? अन् मी आजारी पडल्यापासून आपण गांवाबाहेर कधीं गेलां नाहींत.

—अन् आतां गेलों तो इथं करमत नव्हतं म्हणून का ?

—तसं नाहीं. पण मी आजारी माणूस. माझा सहवास कंटाळवाणाच नाहीं का ?

रमेशचें असीम प्रेम तिला माहित होतें. त्यानें तिच्यापायीं केलेला त्याग तिला अज्ञात नव्हता. उदात्त व निरपेक्ष भावनांनीं स्फुरणारें त्याचें हृदय जगाच्या बाजारी, हिशोबी वृत्तीपासून सर्वस्वी अलिप्त आहे ह्याची तिला जाणीव होती. परंतु, आपण आजारी पडल्यापासून स्त्रीसहवासाचें पूर्ण सुख त्याला मिळत नाहीं, त्यामुळें त्याला आपला कंटाळा येतो का ? अन् हा कंटाळा टाळण्यासाठीं बाहेर फिरण्याची गरज भासते का ? इत्यादि प्रश्न तिच्या श्रद्धाळु मनाला भेडसावीत. परंतु, रमेशच्या प्रेमळ वागणुकींतील उत्कटता अन् स्वाभाविकता पाहून तिला आपल्या मनाच्या आंदोलनाचा राग येई. आणि प्रेमाच्या व कृतज्ञतेच्या भरांत रमेशच्या छातीवर मस्तक ठेवून ती रडूं लागे.

आजहि ती अशीच रडली. रमेश कावराबावरा झाला. त्याच्या मुद्रेवर वेगवेगळे भाव येऊन गेले.

काल रात्रीं घडलेला तो रोमांचकारी प्रसंग त्याच्या मनांत थैमान घालूं लागला.

० ० ०

तीनचार महिन्यांनंतर दोन दिवसांपूर्वी तो आपल्या कामानिमित्त × × गांवाला गेला होता. त्या गांवांत ख्रिश्चन सुखवस्तु लोकांचीच अधिक वस्ती होती. आणि त्यानें मिळविलेले पांचसात श्रीमंत विमेदार त्याच गांवांत होते.

रमेश तेथें पोंचला तेव्हां सहा वाजून गेले होते. एका तासांत विम्याच्या हप्त्याची वसुली करून जवळच्या गांवांत त्याचा एक मित्र होता तेथें जाण्याचा त्याचा विचार होता.

गांवापुढच्या मैदानांत शेंकडों गुरांचे कळप गांवाकडे परतत होते. उजव्या बाजूला समुद्रकिनारा दिसत होता. आणि पाण्याच्या सीमारेषेवर टेंकलेलें सूर्यबिंब तांबड्या रंगांत जणुं काय न्हाऊन निघत आहे असें वाटत होतें. दूरवर माडांच्या झाडींत लहान लहान खेडीं वसलेलीं दिसत होतीं.

रमेश एका मोठ्या घराच्या पायऱ्या चढूं लागला, तेव्हां सूर्य अदृश्य झाला होता. आपलें काम होऊन रात्र पडण्यापूर्वी जवळच्या मुक्कामाला आपल्याला जायला मिळेल असें त्याला वाटत होतें.

व्हरांड्याच्या दगडी कठड्यावर लहान मोठ्या आकाराच्या तांबड्या कुंड्यांत निरनिराळ्या प्रकारचीं झाडें लावलीं होती. छपरावर निळ्या फुलांच्या वेली चढलेल्या होत्या, आणि त्यांच्या आच्छादनानें एक प्रकारचा गारवा खालीं बसलेल्यांच्या प्रत्ययास येत होता. समोर अफाट मैदानें आणि झाडींत आच्छादलेलीं खेडीं दिसत होतीं.

व्हरांड्यांत बसलेली एक तरुणी रमेशला पाहतांच उठून त्याच्याजवळ आली. आपल्या मधुर कोंकणी भाषेंत लाडिकपणानें तिनें हंसतच त्याला म्हटलें,

—चार महिन्यांनंतर तुम्ही आज इथं दिसत आहां, नाहीं का? मला तर असं वाटलं कीं तुम्ही परप्रांतीं गेलांत!

—बायको तापानं आजारी पडली, त्यामुळं इथं यायला मिळालं नाहीं.—रमेश तिच्या शेजारीं खुर्चीवर बसत म्हणाला.

—आतां बरी आहे ना ती?

—हो. आतां हिंडूंफिरूं लागली आहे.

आपल्या मधुर नजरेनें आपलें अंतरंग न्याहाळीतच जणुं काय ती बोलत आहे असें रमेशला वाटलें. ती अतिशय सुंदर होती. तिचें वय पंचविशीच्या पलीकडे गेलें नव्हतें. तिचा नवरा आज चार वर्षें आफ्रिकेला पैसे कमवीत होता. आणि तो आज येईल उद्यां येईल म्हणून विचारी मातिल्दा अधीर मनानें, आपल्या तारुण्यावर विवेकाचें दडपण टाकीत दिवस कंठीत होती.

तिच्या नवऱ्यानें आफ्रिकेला जाण्यापूर्वी रमेशकडे पांच हजारांचा विमा उतरला होता. आणि त्याच्या हप्त्याचे पैसे मातिल्दा नियमितपणें रमेशकडे फेडीत होती. दर दोन महिन्यांनीं विम्याच्या निमित्तानें रमेश तिला भेटत असे. तिच्या नवऱ्याचा तर तो मित्रच होता. त्यामुळें मातिल्देशीं त्याचा निकट स्नेह होता. आणि तिचा स्वभाव त्याला पूर्णपणें माहित होता.

ह्या खेपेला मात्र मातिल्देंत कितीतरी बदल झाला आहे असें त्याला दिसून आलें. तिच्या नजरेंत पूर्वीचा प्रशांतपणा नव्हता. कोणती तरी अस्वस्थता, कोणती तरी खळबळ तिच्या डोळ्यांत प्रतीत होत होती. आपलें सौंदर्य, आपलें तारुण्य उपभोगणारा नसल्यामुळें तें निष्फळ होत आहे असें तिला वाटत होतें; आणि अशा विचारामुळें जी बेफिकिरी, जी बेपर्वाई वृत्तींत उत्पन्न होते, तिचें अस्तित्व तिच्या चेहऱ्यावर ठसठशीतपणें दिसून येत होतें.

अनोळखी पुरुषानें चालतांना पुनः पुन्हां तिच्याकडे वळून पहावें, इतके तिचे अवयव रेखीव आणि प्रमाणबद्ध होते. तिच्या डोळ्यांत गोड जादू होती; आणि तिचे काळेभोर केंस पाठीवर मोकळे सुटले, म्हणजे वर्षाकाळांत दगडाच्या पाटांतून वाहणारा तो जणूं काय लोटच असें पाहणाऱ्याला वाटावें.

—आंबेलचं ह्या दिवसांत पत्र आलं आहे का ?—रमेशनें तिला विचारलें.

—कालच आलं आहे. खुशाल आहे तो.

—लवकर येईल का तो आतां ?

—काय सांगावं, आज उद्यां करतां करतां चार वर्षं निघून गेलीं. आमचं लग्न झाल्यानंतर लवकरच एका वर्षानं येणार म्हणून तो नोकरीची बदली पत्करून आफ्रिकेला गेला. दोन वर्षं त्याचीं पत्रं वाचून समाधान मानून राहिलें. नंतर आणखी दोन वर्षं निघून गेलीं.

—चार वर्षं तुम्ही एकटेपणांतच काढलीं. मूल ना बाळ...

—अन् आई ना बाप. रमेश तुम्ही तरुण आहांत. एक दिवस आपल्या बायकोपासून दूर राहिलांत तर तुमची काय स्थिति होते! मग सतत चार वर्षं प्रिय माणसाच्या सहवासाशिवाय माझ्यासारख्या अबलेनं काढणं किती कठीण आहे ह्याची कल्पना करा.

—तुम्ही नवऱ्याला इथं येण्याबद्दल कां लिहीत नाहीं?

—या गोष्टी ज्याच्या त्याला समजायला नकोत का? शिवाय मी देखील कांहीं कमी लिहिलं नाहीं. परंतु, आणखी दोन वर्षं राहून इथं परत आल्यास, नंतर सध्यां मिळत असलेला तेथील पगार नेहमीं मिळेल असं त्याचं म्हणणं आहे.

—तुम्ही कांहीं गरीब नाहीं. पैशाचा मोह त्याला पडूं नये. तुमच्यासारखी प्रेमळ अन् देखणी बायको इथं असतांना...

—पैशाचा मोह कीं दुसरा कसला तें कुणीं सांगावं!

—आफ्रिकेच्या निग्रो पोरी येथल्या लोकांना दास करून ठेवतात असं म्हणतात. असल्या पोरींबद्दल त्यानं लिहिलं नाहीं का तुम्हांला?—रमेश हंसतच म्हणाला. परंतु लगेच हें वाक्य बोलल्याबद्दल त्याला पश्चाताप झाला.

—असल्या गोष्टी तुम्ही पुरुष उघड करतां का कधीं? आपला नवरा आपल्याला विसरत नाहीं ह्या समजुतीवर विसंबून आम्ही दिवस काढतों. कालच त्याच्याकडून पत्र आलं आहे, त्यांत तो म्हणतो, कीं माझ्याशिवाय चैन पडत नसून इथं यायची आपल्याला तळमळ लागली आहे. परंतु नोकरीचा जास्तींत जास्त फायदा मिळावा म्हणून आणखी एक वर्ष आपल्याला आफ्रिकेंत कंठावं लागणार. आणखी एक वर्ष!......तीनशें पांसष्ट दिवस .....

मातिल्देनें एक सुस्कारा सोडला. पुरुषाच्या सहवासाची तिला लागलेली ओढ तिच्या आवाजांत, हावभावांत, तिच्या एकंदर वृत्तींत रमेशला स्पष्ट दिसली.

दिवस पूर्णपणें मावळला होता. पश्चिमेकडून फांकणाऱ्या संधिप्रकाशांत आसपासची सृष्टि गूढरम्य दिसत होती. अजून चंद्रप्रकाश पसरला नव्हता. डोळे झांकलेल्या सृष्टीच्या मूक संगीतांत समुद्राचें तांडवनृत्य उठून दिसत होतें.

गांवच्या इगर्जीची घंटा वाजली. मातिल्दा उठून उभी राहिली, आणि मस्तक, हृदय, इत्यादि अवयवांना हस्तस्पर्श करीत तिनें कांहीं मंत्र गुणगुणण्यास सुरवात

केली. एका म्हाताऱ्या नोकरानें पेट्रोमॅक्स दिवा पेटवून आणून व्हरांड्यांत टांगला. त्याच्या शुभ्र प्रकाशांत पुढच्या आवारांतील झाडें अपूर्व आनंदानें चमकूं लागलीं.

थोड्या वेळानें एका बाईनें जर्मन सिल्व्हरच्या नक्षीदार ताटांत चहाचे दोन कप आणून त्यांच्यापुढें ठेवले. त्यांपैकीं एक कप उचलून रमेशाच्या पुढें करीत मातिल्देनें म्हटलें.—थोडा चहा घेतां ना ?

रमेशनें कप हातांत धरून चहा तोंडाला लावला. आंतील घड्याळांत सात वाजलेले ऐकतांच तो भानावर आला. त्यानें घाईनें चहा पिऊन टाकला, आणि तिपाईवर कप ठेवून म्हटलें,

—मला आतां गेलं पाहिजे. आबेलच्या विम्याचा हप्ता भरतां का आतां ?

—रमेश, विमाएजंटाला एवढी घाई कांहीं शोभत नाहीं. हप्ता पाहिजे तर तुम्हांला आतांच देईन; पण आतांच तुम्ही इथून निघणार का ?

—× × कांहीं दूर नाहीं. पाऊण तासाची वाट. तिथं माझ्या एका मित्राच्या घरीं माझी सगळी सोय होईल.

—अन् मला तुमची एक मैत्रीण मानून, तुमची सगळी सोय इथंच करून घ्यायला काहीं हरकत आहे वाटतं ? तुम्ही रात्रीचं जेवीत नाहीं. खरं ना ? आबेल इथं असतांना तुम्ही एकदां आमच्याकडे रात्रीच्या वेळीं राहिलां होतां. तेव्हां तुम्ही फराळ केल्याची मला पक्की आठवण आहे. आज देखील तुमच्यासाठीं फराळाची व्यवस्था करीन. माझ्या एका मैत्रिणीनं मुंबईहून कांहीं फळं पाठविलीं आहेत. त्यांचा उपयोग करतां येईल मला तुमच्यासाठीं.

—मातिल्दा, तुम्ही वाईट वाटून घेऊं नका. अजून कांहीं फार वेळ झालेला नाहीं. मी लवकरच पोंचेन. तुम्ही त्रास घेऊं नका.

—आजची रात्र राहा ना इथं. चार वर्षं कोंडून ठेवलेलं माझं सुखदुःख मी तुमच्यापुढं उघडं करणार आहें. तुम्ही मला भितां का ?—तिनें आर्जवी मुद्रेनें, हलक्या स्वरांत, रमेशवर आपली गोड नजर स्थिर करीत म्हटलें.

मनांत चाललेल्या विचित्र विकारांची आवराआवर करीत, रमेश जाग्यावर बसला. पुरुषांत कमीअधिक प्रमाणांत वसत असणाऱ्या अनैतिक पण नैसर्गिक पाशवी वृत्तीला ती आव्हान करीत आहे, आणि पूर्वीची विवेकी व संयमित वृत्तीची मातिल्दा सर्वस्वी बदलली असून, परिस्थितीची पर्वा न करतां, अज्ञात सुखाच्या

लाटांवर उडी टाकण्यास तयार झालेली, उच्छृंखल, बेफाम स्त्री आपल्यापुढें बसली आहे, हें त्याला कळून चुकलें.

तिच्या मागोमाग रमेश घरांत गेला. पहिल्याच दालनांत उंची लांकडी सामान व्यवस्थितपणें मांडलेलें दिसत होतें. चारी बाजूंना चार उंची सोफे, प्रत्येक सोफ्याच्या बाजूला दोन दोन खुर्च्या, मध्यें वर्तुळाकार मेज, त्यावर एका पितळी नक्षीदार भांड्यांत ठेवलेली एक पामची कुंडी, भिंतींना निवडक चित्रें, खुर्च्यांवर रेशमी अभ्रे चढविलेल्या नाजुक गाद्या, इत्यादि व्यवस्था पाहात रमेश आंत गेला.

घरांतील भिंतींचा रंग, दिव्याचा प्रकाश, सामानाची मांडणी, आणि मुख्य म्हणजे माणसांचा अभाव, हें सगळें आपल्या वैषयिक वृत्ति जणुं काय चेतवीत आहे असें त्याला वाटलें. आणि मातिल्देच्या मागोमाग जेव्हां त्यानें तिच्या निजण्याच्या खोलींत प्रवेश केला, तेव्हां तो अभावितपणें किती तरी घाबरला. तिनें त्याला धीर देऊन एका खुर्चीवर बसविलें, आणि स्वैंपाकीणबाईला हांक मारून फराळाचें ताट आणायला तिनें हुकूम दिला.

फराळ आला. रमेशनें बुट पाटलूण काढली, हात तोंड धुतलें, आणि थोडीं फळें खाऊन हात धुतले. नेहमीं तो तिच्याशीं अविरतपणें चुरूचुरू बोलत असे. परंतु आतां त्याची वृत्ति मुग्ध बनली.

तिनें नोकराला हांक मारली. आणि पाहुण्यासाठीं जवळच्या खोलींत बिछाना घालायला सांगितलें. आणि पाहुण्याजवळ कांहीं खाजगी बोलायचें असल्यामुळें, आपल्याला कोणी भेटायला आल्यास, आपण आजारी असल्याचें सांगण्याबद्दल तिनें त्याला सूचना दिली, आणि नंतर रमेशच्या जवळच ती त्याच्याशीं बोलावयास बसली.

—रमेश, तुम्हांला माझ्याबद्दल काय वाटतं? मी पापी, अपराधी स्त्री आहें असं वाटत नाहीं का तुम्हांला? पण मी खरी गोष्ट तुमच्याजवळ उघड केली नाहीं तर एका निंद्य तिरस्कृत स्त्रीच्या सहवासांत आपण एक रात्र काढली असा ठसा बरोबर घेऊन तुम्ही इथून निघून जाल. चार वर्षांत निरनिराळे मोहाचे प्रसंग माझ्यावर किती आले हें तुम्ही कल्पनेनं ताडूं शकाल. स्त्रीपुरुषांच्या साहचर्याचे प्रसंग आमच्या समाजांत किती तरी येतात. आणि एखाद्या स्त्रीचा नवरा परदेशीं आहे, अन् तो लवकर परत येत नाहीं हें एकदां लोकांना समजलं म्हणजे उच्छृंखल तरुणांचा त्रास तिला असह्य होतो. माझ्या नवऱ्याच्या प्रेमावर विसंबून मी माझ्या

प्रवृत्तींशीं झगडलें, परंतु तो तिकडे काळ्या पोरींबरोबर मजा मारीत आहे, ही कल्पना मला स्वस्थ कशी बसूं देईल? मला मूल ना बाळ! कुणाच्या आधारावर मी दिवस कंठूं? गरिबींत जन्म झाला असता तर हातांत कोयती घेऊन मी डोंगर-माथ्यावर लांकडें तोडायला गेलें असतें; किंवा लोकांच्या घरीं मजुरीचीं कामें करायला गेलें असतें; आणि अशा रीतीनं माझ्या मनाला विरंगुळा पाडला असता. पण आतां मला असं वाटतं, हें घर आणि सगळी संपत्ति सोडून तुमच्यासारख्या तरुणाबरोबर दूर दूर पळून जावं...—ती थोडा वेळ थांबली. भावनांच्या आवेगामुळें तिला दम लागला. वैषयिक सुखोपभोगाची अलोट इच्छा तिच्या प्रत्येक हालचालींतून व्यक्त होत असलेली रमेशला दिसली.

गोड भावनांनीं चमकणारा तिचा चेहरा, पुरुषाच्या सहवासाशिवाय एकलेपणांत तडफडणारे तिचें सरळ हृदय, तिच्या आर्जवांतील प्रेमळ जोर, वुंदा आजारी असल्यामुळें गेले चार महिने त्यानें स्त्रीविषयक जें व्रत पत्करलें होतें, त्यामुळें आलेला मादकपणा, आणि स्वप्नसृष्टींत एखादी परी भेटावी त्याप्रमाणें जगाला कोणताच मागमूस न लागूं देतां अकल्पितपणें त्याच्या प्रमत्त पौरुषाचें समाधान करूं पाहणारी ती आतुर गौरकाय ललना, अशा परिस्थितींत रमेश मंत्रमुग्ध बनला यांत आश्चर्य नाहीं!

—रमेश, तुमच्या आयुष्यांतील हें एक स्वप्न, गोड पण भयानक स्वप्न आहे असं समजा.

आणि रमेशला तें स्वप्नच वाटलें. त्यानें सौंदर्य आणि तारुण्य यांच्या त्या सुरम्य मूर्तीला दोनही हातांनीं जवळ ओढलें.

० ० ०

वरील प्रसंग आठवून रमेशच्या मनाची स्थिति विचित्र झाली. किती तरी विचार त्याच्या मस्तकांत नाचूं लागले. वुंदेच्या रूपानें सगळी स्त्रीजातच विश्वस्त-पणें पुरुषांच्या हृदयावर टेंकून पडली असून, पुरुषजात आपल्या स्वभावसिद्ध प्रवृत्तीं-मुळें तिची चिरंतन फसवणूक करीत आहे असें त्याला वाटलें, आणि त्यानें दयेच्या व प्रेमाच्या आवेशांत वुंदेला अधिक जवळ ओढली व तिचें मस्तक कुरवाळलें.

**चिरंतन फसवणूक**

ले.–एप्रिल १९३६
प्र–ज्योत्स्ना, व. १ अं.१

# शाळामास्तर

तो भीत भीतच त्या प्रशस्त आवारांत शिरला. आवाराच्या चारी कडांनीं वेगवेगळ्या सुंदर फुलझाडांची आणि इतर चित्रविचित्र पानांच्या शोभिवंत झुडपांची बाग तयार केली होती. एका कोंपऱ्यांत विहीर होती. मध्यें कारंजें उडत होतें. वाड्याचा शुभ्र रंग आणि दोन्ही मजल्यांच्या उंच विस्तृत खिडक्या उदार मनानें जणुं काय, आपलें स्वागतच करीत आहेत असें त्याला वाटलें.

पांचदहा रुपड्यांची याचना करीत गांवोगांव फिरत असलेला शाळामास्तर तो. घराबाहेरच्या त्या वैभवसंपन्न दृश्यानें त्याचें कष्टी मन क्षणमात्र आनंदलें आणि तो आशापूर्ण मनानें वाड्याच्या पायऱ्या चढूं लागला.

बांकावर दोघे गृहस्थ बसले होते. खरें म्हणावयाचें म्हणजे ते लोळत पडले होते. दोघांनींहि मस्तकांचें मुंडण केलें होतें. मिशांचे लांब आंकडे राखले होते. कपाळावर, पोटावर भस्माचे पट्टे ओढले होते. नेसलेलीं धोतरें वर खोंवल्यामुळें जांघापासून सगळे पाय उघडेच टाकले होते. चेहऱ्यावर खानदानी वृत्तीची झांक मारत होती. आणि त्यांचे पिकलेले केंस दुरून दिसत नसले तरी ते पन्नाशीच्या घरांत आले असावेत, असें त्यांच्या मुद्रेवरून स्पष्ट दिसत होते.

मास्तरनें हातांतली वळकटी वर ठेवली आणि त्यांच्याकडे पाहिलें. भिकूदादांनीं एका क्षणांत या अनाहुत पाहुण्यांची परीक्षा केली. ती फाटकी टोपी, मळका, गबाळ कोट, कसल्या तरी जिन्नसांनीं भरलेले खिसे, अनवाणी पाय, हताश, गळलेला चेहरा, निष्प्रभ डोळे, आणि गरीबांना सर्वसाधारण असा आडदांड मूर्खपणा, इतकें पाहून भिकूदादांना कळून चुकलें कीं, आपल्यापुढें उभा असलेला बुजऱ्या चेहऱ्याचा प्राणी एक आशाळभूत मास्तर आहे, आणि तो पोटाची याचना करण्याकरतां आपल्याकडे आला आहे !

--बसा. कुणाला शोधतां ?

—मी मास्तर आहें.

—मास्तर ? शाळामास्तर कीं पोष्टमास्तर ?—बांकावर पहुडलेल्या दुसऱ्या गृहस्थानें प्रश्न केला. भिकूदादांचा खुषमस्कऱ्याच तो. त्यानें विनोद केला.

—मी शाळामास्तर आहें. आणि तुमच्याकडे रहाण्याच्या इच्छेनें आलों आहें.

—पण आमच्याकडे मास्तर नाहीं हें कसं कळलं बोवा तुम्हांला ?

—ती माहिती घेत घेत मी इकडे आलों.

—मग आमच्याकडे रहायचं आहे का तुमच्या मनांत ?

—हो.

—किती महिने रहाणार तुम्ही इकडे ?

— तुमचं आमचं जुळलं तर नेहमींच राहीन.

—तुम्ही बाहेरून येणारे मास्तर नेहमीं असेच उपरी असतां. दोन दिवस राहतां आणि कसल्या तरी निमित्तानें तिसऱ्या दिवशीं निघून जातां !—भिकूदादा म्हणाले.

—गेल्या दीड वर्षांत आमच्याकडे सातआठ मास्तर राहून गेले.—सांतू शेणै म्हणाला.

एका तीव्र शंकेनें मास्तराचें मन भयभीत झालें.

— मला बायकोमुलं आहेत. इकडे तिकडे फिरून मला कसं चालेल ? एकाच चांगल्या झाडाच्या आसऱ्याखालीं मला राहिलं पाहिजे.

मास्तर अर्धवट बसला. धोतराच्या टोंकानें त्यानें कपाळाचा घाम पुसला. आठ-दहा पोरें घरांतून धांवत बाहेर आलीं, त्यांच्याकडे त्यानें आशाळभूत नजरेनें पाहिलें.

—आमच्याकडे या दिवसांत बरेच मास्तर येऊन गेले.—भिकूदादा म्हणाले.

—इकडे नारळ त्याप्रमाणें तुमच्याकडे मास्तर अगदींच स्वस्त आहेत नाहीं का हो ?—सांतू शेणैनें विचारलें.

—पोटाला नसलं म्हणजे सगळं कांहीं करावं लागतं.

—बाकी, त्यामुळं आमची सोय झाली आहे.

—ती कशी ?

—जेवणाच्या प्रत्येक पदार्थात आम्ही इकडे नारळाचा उपयोग करतों, त्याप्रमाणं संसारांतील प्रत्येक लहानमोठ्या कामांत आम्ही मास्तरांचा उपयोग करून घेतों.

मास्तरानें आश्चर्यचकित मुद्रा केली.

—म्हणजे असं कीं, घरच्या मुलांना राखायला, शिकवायला मास्तर उपयोगी पडतोच. परंतु, नारळांचा पाडा करणं, गुडगुडी भरून देणं, घरच्या सुनांना माहेरीं व मुलींना सासरीं पोंचविणं, गरजप्रसंगीं गांवच्या नाटकांत विदुषकाचं काम करणं, अशीं एक ना दोन, किती तरी कामं आम्ही मास्तराकडून करून घेतों. आपण रहाणार, तेव्हां आपणाला आम्ही स्पष्टच विचारतों, हीं सगळीं कामं करायची आपली तयारी आहे का ?

भित्र्या माणसापुढें अकस्मात भूत उभें रहावें, तशीच स्थिति मास्तराची झाली. तो दचकून गेला. पण लगेच आपलें मोडकें घर, घरभाटावर काढलेलें तीनशें रुपयांचें कर्ज, आपली प्रेमळ संसारी बायको, आणि प्रखर उन्हांत मोठ्या कष्टानें खुरटत खुरटत वाढणाऱ्या सुकुमार झाडांप्रमाणें, गरीबीच्या तप्त वातावरणांत वाढणारीं आपलीं तीन मुलें, हें दृश्य नजरेसमोर दिसूं लागतांच त्यानें आपलें मन कठोर केलें, आणि ती जागा पत्करण्याचें ठरविलें.

—साहेब, असलीं कामं मीं कधीं केलीं नाहींत. पण आपण थोर आहांत; आपलं घर कुलीनाचें आहे; आपल्या संगतींत असलीं कामं करायला मी लाज मानणार नाहीं.

मास्तराचे हे उद्गार ऐकून भिकूदादांचा चेहरा स्वार्थी आनंदानें चमकला. सांतू शेणैनें आपलें दंतविहीन तोंड वासून त्यांत तंबाकूचा बार भरला.

—मास्तर, तुमचा पगार काय तो सांगा पाहूं.—भिकूदादा म्हणाले.

—जेवणखाण घालून बारा रुपये द्या आपण. मास्तरनें भीतभीतच उत्तर केलें.

—बारा रुपये ! आठ रुपये पगार मागणाऱ्या चार मास्तरना आम्ही गेल्या आठ दिवसांत परत लावलं आहे. तुम्ही तर बारा रुपये मागतां. मग तुमचं आमचं कसं जुळेल ?

—कांहीं झालं तरी बारा रुपयांपेक्षां कमी पगार मला देऊं नका. मला घरीं बायकोमुलं आहेत; त्यांच्यासाठीं...

—मास्तर, बायकोमुलं कुणाला नाहींत ? त्यांच्यासाठींच तर हा संसाराचा खटाटोप करावा लागतो. पण आठ रुपयांवर काम करणारे इसम असतांना आम्ही तुम्हाला कसं ठेवूं ?

घरांतल्या घड्याळांत अकराचे ठोके पडलेले मास्तरला स्पष्ट ऐकूं आले. कारंजाच्या फवाऱ्यांतून आतां इंद्रधनुष्याची जादू दिसूं लागली. मजुरीला गेलेले कुळवाडी लोक घामाघूम होऊन परत येत असलेले दिसूं लागले. पोटांत भूक आणि हृदयांत भीति अशा कैचींत मास्तर तळमळत होता.

—मग आठ रुपयांपेक्षां मला इथं ज्यास्त मिळणं शक्य नाहीं ना ?—मास्तरनें वळकटीला हात घालीत निराशापूर्ण स्वरांत विचारलें.

—तुम्ही चाललां ! मर्जी तुमची !—भिकूदादा म्हणाले. मास्तर मागें पहात दोन पायऱ्या खालीं उतरला. भिकूदादांनीं त्याच्याकडे पहात म्हटलें,

—आतां दुपार झाली. जेवण करून संध्याकाळीं चला.

मास्तरनें आढेवेढे घेतले नाहींत. तो परत येऊन बांकावर बसला. भिकूदादांना त्याची दया आलीसें दिसलें. त्यांनीं खांकरत व मिशांवरून हात ओढीत किंचित् स्निग्ध आवाजांत म्हटलें.

—मास्तर तुम्ही आलां आहांतच तेव्हां रहाच आमच्याकडे. तुम्हांला दरमहा दहा रुपये देण्याची व्यवस्था करतों. आज एक महिना शाळा बंद आहे. तुम्ही उद्यां शाळा सुरू करा. तुमचं नांव गांव मी तुम्हांला विचारलं नाहीं.

—माझं नांव हणमंत राऊत, गांव आचरें, तालुका मालवण. तुमची इच्छा, तेव्हां तुम्ही द्याल तें घेऊन येथेंच राहातों.

—रहा येथें, तुमचं बरं होईल. सांतू, यांना पोषाख उतरायला लाव आणि वरची जागा दाखव; पण आधीं जरा गुडगुडी घालून आण पाहूं. मास्तरना देखील दाखव कशी घालतात ती.

सांतू शेणै आंत गेला. मास्तर अज्ञात गुडगुडीची वाट पहात अधीर मनानें बाहेर बसून राहिला.

सांतू शेणैनें गुडगुडी बाहेर आणली. वरची चिलीम काढून बांकावरच्या फळी-वर उलटी केली, बोट घालून आंतील जळका तंबाखू बाहेर काढला, नंतर चिलमींत

वाटोळा गोटा बसविला. नवीन तंवाखूची कीस मूळच्या जळलेल्या तंबाखूंत मिसळून ती घातली. तिच्यावर दोन निखोर ठेवले. आणि गुडगुडी मालकाच्या पुढें ठेवली.

भिकूदादांनीं गुडगुडीच्या नळीचें टोंक हाताच्या मुठींत धरून तें तोंडाला लावलें. हवा आंत घेतली. गुडगुडीच्या नारळांत ' गरगर ' असा आवाज झाला. नळीच्या द्वारें धूर त्यांनीं तोंडांत घेतला, नाकावाटे बाहेर काढला, आणि पांचसहा मिनिटें याप्रमाणें गुडगुडी ओढल्यानंतर त्यांनीं ती सांतू शेणैच्या स्वाधीन केली.

नंतर बराच वेळपर्यंत दोघेही जण केवढ्या मोठ्यानें खोंकत होते. आणि हा प्रकार पाहून विषण्ण मनःस्थितींत देखील मास्तर मनांतल्या मनांत हंसत होता.

थोड्या वेळानें गुडगुडीची धुंदी उतरल्यानंतर सांतू शेणैनें मास्तरला आंतल्या एका माडीवर नेऊन बसण्याउठण्याची जागा त्याला दाखविली आणि तो खालीं आला.

मास्तरनें पोषाख उतरून भिंतीच्या खिळ्यांना लावला. बॅग कोपऱ्यांत ठेवली, वळकटी एका खोक्यावर टाकली, आणि तेथेंच एक जुनाट मळकट झालेली सतरंजी पडली होती ती पसरून तिच्यावर अंग टाकलें.

जमिनीवर केरकचरा सांचला होता. मास्तराच्या नांवावर काढलेली खोली ती. शेवटच्या मास्तरानें तेथें केरसुणी फिरविली असेल तेवढीच. त्यानंतर, खेळण्याच्या निमित्तानें तेथें जाणारीं मुलें खेरीज करून, इतर माणसें तेथें क्वचित्‌च पोंचलीं होतीं. भिंतींत फुटलेल्या एका उघड्या आरमारींत फुटक्या चिमणीचा एक दिवा, खोबरेल तेलाची एक बाटली, पांचसहा रिकाम्या आगपेट्या, मेणबत्तीचे तुकडे, अस्ताव्यस्त पडलेलीं बरींच पत्रें, विड्यांचीं थोटुकें, एक कपबशी, दोन तीन रिकाम्या बाटल्या, दोन डबडीं, इतकें सामान दिसत होतें. दांडीवर दोन फाटके पंचे, दोनतीन मळकट वस्त्रें, एक मोडकी छत्री, इतक्या वस्तु लोंबकळत होत्या. त्या वैभवसंपन्न जीवंत घरांतील तें दृश्य शाळामास्तराच्या नशिबाप्रमाणें विदारक होतें; आणि तें पाहून हणमंत मास्तराच्या मनावर देखील वाईट परिणाम झाल्याशिवाय राहिला नाहीं.

जेवणाची वेळ होतांच सांतू शेणैनें त्याला खालीं नेलें. जेवण झाल्यानंतर तो फिरून वर आला, तेव्हां घरांतील थाटमाट, खानदानी व्यवस्था, श्रीमंती, इत्यादि पाहून आनंदलेलें त्याचें मन खोलींत पाय ठेवतांच भीतिग्रस्त झालें. तो तसाच आड पडला. त्यानें डोळे झांकून घेतले, पण त्याला झोंप लागली नाहीं. त्याच्या नजरेसमोर आपल्या घरचीं माणसें, घरचे प्रसंग भणभणीत प्रकाशांत, जणुं काय नाचूं लागले. आणि त्याच्या दर्शनानें त्याच्या हैराण मनाला विरंगुळा वाटला.

त्याचा बाप शाळामास्तर होता. त्याच्याकडे तीनचार इयत्ता तो शिकला होता. हेंच त्याचें शिक्षण. बापानें त्याला यापेक्षां अधिक शिकविण्याची खटपट केली नाहीं. तो बुद्धीनें मंद होता आणि त्याच्या अंगीं कर्तबगारी मुळींच नव्हती. बाप पोटापुरतें मिळवीत होता, आणि आई सुईणपणा करून संसाराला मदत करीत होती. यामुळें त्याच्यावर संसाराचा बोजा कधीं पडला नव्हता. बाप हयात असतांनाच त्याचें लग्न झालें होतें, आणि दोनतीन मुलें झालीं तेव्हां त्याचा बाप तापाचें निमित्त होऊन वारला. संसार वंद पडला. पोटासाठीं आईनें सुईणपणा सोडला नाहीं, पण तिची मिळकत अगदींच अपुरी पडूं लागली. शाळामास्तर म्हणून काम करायला लागणारें भांडवल त्याच्यापाशीं नव्हतें. बापानेंच तें त्याला दिलें नव्हतें आणि वुद्धीचें भांडवल देवानें दिलें नव्हतें. परंतु भावनांचा नाजुकपणा त्याच्यापाशीं भरपूर होता. त्यामुळें, आपल्या स्थितीची तीव्र जाणीव त्याला होत असे. परंतु मार्ग सुचत नव्हता किंवा सुचला तर तो चोखाळण्याचें धैर्य व ताकद त्याच्या अंगीं नव्हती. वुद्धिहीन व गरीब मनुष्य भावनाशील असणें म्हणजे त्याच्या दुर्दैवांत भरच पडावयाची. तसेंच त्याचें झालें. जगण्याची कोणती तरी खटपट केली पाहिजे म्हणूनच तो गोमंतकांत आला. तेथें शाळामास्तर व्हायला अमुकच शिक्षणाची गरज नसते हें त्याला माहीत होतें. त्यामुळें आपली नालायकी, घर सोडून दूर जाण्याचें दिव्य, इत्यादि गोष्टींना तोंड देण्याचें ठरवून आईच्या व बायकोच्या आग्रहासाठीं तो मोठ्या कष्टानें परप्रांतांत आला होता.

या सगळ्या गोष्टी त्याच्या स्मृतिपटावरून जाऊं लागल्या. त्यामुळें त्याला मुळींच झोंप लागली नाहीं.

तिन्हीसांजा झाल्या. त्यानें खिडकींतून बाहेर पाहिलें. अंधाराचें विरळ वस्त्र आकाशांतून खालीं कोणी तरी पसरीत आहे असें त्याला वाटलें. पिकलेलीं पिवळीं शेतें त्या वस्त्रांत अदृश्य होऊं लागलीं. आकाशाच्या निळसर पडद्यावर झाडांच्या काळ्या आकृति अधिकच स्पष्ट दिसूं लागल्या. आणि अंधाराच्या पोटांतून निघणारा कर्ण-कटु आवाज जिकडे तिकडे घुमूं लागला.

—मास्तर !—खालून हांक ऐकूं आली.

—मास्तर एखाद्या पाहुण्याप्रमाणें खालीं चौकीवर आला. तेथें एका वांकावर भिकूदादा व सांतू शेणै बसले होते. पांचसहा लहानमोठ्या बायका जमिनीवर वसल्या होत्या. कांहीं मुलें तेथें खेळत होतीं; कांहीं सांतू शेणैच्या गोष्टी ऐकत बसलीं होती. मास्तर एका खांबाला टेंकून उभा राहिला.

—मास्तर, तुम्हांला गायला येतं का?—सांतू शेणैनें विचारलें.

—रावसाहेब, माफ करा. मला गातां येत नाहीं.

—क्रमिक पुस्तकांतील कविता म्हणा एखादी.

—मी कविता म्हटली तर हीं मुलं हंसतील मला, कारण माझ्यापेक्षां तींच चांगली म्हणतील. त्यांनाच म्हणायला लावा.

—मास्तर, पदं म्हणतां येत नाहींत तर कसले मास्तर तुम्ही! आमच्याकडे येऊन गेलेले मास्तर पदं म्हणत, भजन करीत, दिंड्यांत भाग घेऊन नाचत. मास्तरला गाणं माहित असलं म्हणजे घरच्या मंडळीची करमणूक होते. तुम्ही अगदीं गद्य माणूस बोवा!—सांतू शेणैनें मास्तरवर शस्त्र धरलें.

घरच्या बायका मोठ्या कुतूहलानें, उत्सुकतेनें मास्तराकडे पाहूं लागल्या. मास्तर लाजेनें गोंधळून गेला.

मान खालीं घालून तो माडीवरील आपल्या खोलींत आला. त्यानें लिहिण्याचें सामान काढलें आणि आपल्या बायकोला खालील पत्र लिहिलें.

सप्रेम आशिर्वाद,

मी गोव्यांत सुखरूप पोंचलों. सुदैवानें मला एका कुलीन श्रीमंत घरांत चांगली जागा मिळाली आहे. जेवणखाण घालून पगार दरमहा पंधरा रुपये ठरला आहे. दहा रुपये माझ्या खर्चासाठीं ठेवून पांच रुपये तुझ्याकडे पाठवून देईन, ते कर्जाच्या फेडीसाठीं जमवून ठेवायला आईला सांग. आईच्या मिळकतीवर तुमचा खर्च कसावसा चालवावा. मुलांच्या शिक्षणाकडे लक्ष द्यावें. माझ्याबद्दल काळजी करण्याचें कारण नाहीं, मी सुखरूप आहें. या घरची मंडळी फार प्रेमळ, उदार आहे. थंडीताप आला तर घरगुती काढा मिळायला अडचण पडणार नाहीं. शाळा घरांतच आहे आणि मला श्रम देखील फार पडणार नाहींत असें दिसतें. तुमची घडोघडीं आठवण येते. आईला नमस्कार सांग व तिच्या आरोग्याला जप. दर रविवारीं समाचाराचें पत्र पाठवीत जाईन.

तुझा,

हणमंत राऊत.

पत्राची घडी लखोट्यांत घातल्यानंतर, मनाच्या त्या विचित्र स्थितींत, एक प्रकारचें समाधान मानून, तो झोंपी गेला.

o o o

MULLGO... NO...

दुसऱ्या दिवशीं मास्तर जागा झाला, तेव्हां त्याच्या पायांशेजारीं एक कुत्रा बसलेला त्याला आढळला. त्याचें नांव घरच्या इतर माणसांच्या तोंडून मास्तरनें ऐकलें होतें. त्यानें प्रेमळ स्वरांत म्हटलें,—मोट्टू, मोट्टू !

मोट्टू शेपटी हालवीत व सगळा देह डुलवीत मास्तराच्या अगदीं जवळ आला. मास्तरनें त्याच्या पाठीवरून हळुवारपणें हात ओढला; त्याचें मस्तक गोंजारलें, त्याचे पुढचे पाय दोन्ही हातांनीं पकडून व मागच्या पायांवर त्याला उभें करून लाडिकपणें त्याच्याशीं मैत्री करायला सुरवात केली.

मास्तराच्या कोंडलेल्या हताश जिवाला, एका इमानी, साध्या जनावराच्या क्षणिक सहवासानें कितीतरी बरें वाटलें. त्या विषम परिस्थितींतल्या माणसांच्या सहवासांत मास्तराला, कोळ्याच्या जाळ्यांत सांपडलेल्या माशीप्रमाणें अडकल्या सारखें, गुदमरल्यासारखें वाटत होतें. त्याच्या एकलेपणाची, उदासीनतेची तीव्रता कुत्र्याच्या आगमनानें जराशी कमी झाली.

पांचपंचवीस मुलें जमलीं आणि शाळा सुरू झाली. जमलेल्या मुलांपैकीं तीन चार मुलें तेवढींच चांगला पोषाख केलेलीं, अंगावर सुवर्णालंकार असलेलीं, दिसत होतीं. बाकीच्यांच्या फाटक्या, अपुऱ्या व मळकट वस्त्रांवरून त्यांच्या घरच्या गरिबीची स्पष्ट कल्पना करतां येई.

मुलें आपल्या ठरलेल्या जाग्यांवर जाऊन बसलीं. त्यांच्या बऱ्यावाईट जन्मांनींच त्यांच्या शाळेंतील जागा ठरवून टाकलेल्या होत्या. त्याकरितां मास्तरनें परीक्षा घेऊन त्यांची लायकी नालायकी पाहाण्याची जरूरच नव्हती. टेबलाच्या खणांत एक वही होती. मास्तरनें ती बाहेर काढली. तिच्यावर शेवटच्या मास्तरनें शाळेंतील मुलांच्या नांवांची नोंद केली होती. हणमंत मास्तरनें तिच्यावरून नजर फिरविली. पहिल्या नंबराला भिकूदादाच्या मुलाचें नांव होतें, आणि नंतर घरांतल्या इतर मुलांचीं नांवें होतीं. ती शाळा म्हणजे आमच्या समाजाची प्रतिकृतीच आहे, असें मास्तरला वाटल्याशिवाय राहिलें नाहीं.

शाळेंत चौथ्या इयत्तेचीं कांहीं मुलें होतीं, आणि मास्तरला तिसरीपेक्षां अधिक शिक्षण नव्हतें ! तरी पण, त्यानें एका मुलाला उभें केलें. त्या मुलाला चौथ्या पुस्तकाच्या वाचनाशिवाय तिसरीचे इतर विषय देखील येत नव्हते. इयत्ता शिकणें म्हणजे वाचून काढणें अशीच मास्तरांची, घरच्या माणसांची, मुलांची, सगळ्यांचीच

समजूत होतीसें दिसलें. सगळें ढोंग! आणि आपण करीत आहों तें देखील ढ़ोंगच नाहीं काय? असा विचार मास्तराच्या मनांत आला.

आपल्याला मास्तरकीची आवड नाहीं; शिक्षण अपुरें; प्रेमाची मंडळी फार दूर; अशा स्थितींत आपण काय शिकविणार? बायकोमुलें काय करीत असतील, आपल्याला मिळणारे पैसे अपुरे आहेत, घरीं केव्हां परत जायला मिळेल, इत्यादि विवंचना आपल्या मनाला टोंचीत असतांना आपण मुलांशीं समरस कसे होऊं? त्यांना खरें शिक्षण कसें देऊं? पोट जाळण्यासाठींच हें सारें ढोंग नाहीं का?

मास्तरचे विचार वरीलप्रमाणें चालू असतांनाच भिकूदादांनीं खालून हांक मारली.

मास्तर खालीं आला. भिकूदादांनीं त्याला म्हटलें,—मास्तर, जरा गुडगुडी भरून आणा पाहूं!

मास्तराच्या हृदयांतील खळबळ तोंडावर उमटल्याशिवाय राहिली नाहीं. आपल्याला हलकें काम सांगितल्याबद्दल त्याला दुःख तर झालेंच, परंतु शाळेचें काम चालू असतांना आपल्याला हें नवें हलकट काम सांगावें हें त्याला मुळींच आवडलें नाहीं.

गुडगुडी भरून आणायला लावण्यांत आपण मास्तरचा अपमान करीत आहों, असें भिकूदादांना वाटत नव्हतें. आतांपर्यंत कितीतरी मास्तरांकडून त्यांनीं नेमानें हें काम करून घेतलें होतें. त्यामुळें, नवीन मास्तर आला कीं, त्याच्यावर गुडगुडी भरून द्यायची पाळी यावयाची हा क्रमच झाला होता.

मास्तरानें मुकाट्यानें सांतू शेणैनें दाखविल्याप्रमाणें गुडगुडी भरून आणून भिकूदादांच्यापुढें धरली. चिलमींतील निखाऱ्यांवर फुंकर घालतांना मास्तराच्या नजरेपुढें आपला गरीब संसार, प्रेमळ बायको, आपली नालायकी, इत्यादि कितीतरी गोष्टी उभ्या राहिल्या. त्याचे डोळे पाण्यानें भरून आले.

भिकूदादांनीं मास्तरला सांगितलें.—घरच्या मुलांकडे विशेष लक्ष दिलं पाहिजे. त्यांना वेगळ्या रीतीनं वागवलं पाहिजे. तुम्ही इथं नवीन, म्हणून तुम्हांला सांगावं लागतं.

भिकूदादांचा हा उपदेश ऐकून मास्तर वर शाळेंत गेला. दोघां मुलांत भांडण चाललें होतें. भिकूदादांच्या मुलानें दुसऱ्या एका गरीब मुलाला भरपूर चोप दिला असल्यामुळें हा मुलगा असहायपणें आपल्या मनगटांनीं डोळे पुशीत स्फुंदस्फुंदून रडत होता. मास्तरनें मार देण्याचें कारण भिकूदादांच्या मुलांकडून विचारून

घेतलें. तो पोरगा गडवड करीत होता, म्हणून माधवानें त्याला कडक शिक्षा केली होती.

मास्तरनें आपला उद्वेग, आला संताप, गिळून टाकला. त्यानें त्या मुलाला जवळ बोलावलें. त्याच्या मस्तकावरून, पाठीवरून हात फिरविला. आपल्या हातरुमालानें त्याच्या गालांवरील अश्रू पुसले. त्याच्याप्रमाणेंच आपलीं पोरें गरीब आहेत आणि सगळें जग गरीव पोरांनींच भरून गेलेलें आहे; त्यांचे अश्रु कोण पुसणार ? त्यांचें सांत्वन कोण करणार ? मास्तरचें मन आक्रंदूं लागलें.

० ० ०

याप्रमाणें मास्तरचा एक एक दिवस जात होता. घरची मंडळी सांगतील तीं सगळीं कामें करावीं आणि उरलेल्या वेळांत शाळेंत उदास मनानें काम करावें. गुडगुडी भरून देणें, घरचा हिशेब लावणें, भिकूदादांच्या मागें फिरावयास जाणें, अशीं एक का दोन, प्रसंगानुरूप उपस्थित होणारीं कामें मास्तरनेंच करावीं.

त्याच्यापूर्वीं तेथें राहिलेले बहुतेक मास्तर गरज म्हणून, आवड म्हणून, व्यसन म्हणून,वाड्यावरच्या एखाद्या भाविणीकडे किंवा वेश्येकडे दिवसांतून कांहीं वेळ घालवीत. सुरवातीला हा प्रकार अर्थातच गुप्त राही. परंतु, नंतर तो घरच्या मंडळीच्या कानावर जाई, तेव्हां भिकूदादांना, सांतू शेणैला, किंवा घरच्या बायकामंडळींना करमणुकीचा एक नवाच विषय मिळत असे. चौपेटीवर सगळी मंडळी बसली असतांना गप्पागोष्टींच्या वेळीं मास्तरना तेथें बोलावण्यांत येई आणि त्यांची थट्टा करण्यांत येई. ही शोभा मास्तरांच्या अंगवळणीं पडली म्हणजे तेच तींत स्वखुशीनें भाग घेत. आणि अशा रीतीनें ते धन्याची मर्जी संपादन करीत. कुलीन, थोर समजलीं जाणारीं माणसें याप्रमाणें गरीव शाळामास्तरांच्या मानसिक अधःपतनाचा फायदा घेऊन, दिवसांतील कांहीं तास मौजेंत हंसण्याखिदळण्यांत घालवीत.

हणमंत मास्तरांच्या बाबतींत असें कांहींतरी घडलेलें घरच्या माणसांना हवें होतेंच. सांतू शेणैला मोठें आश्चर्य वाटे कीं, आठ दिवस होत आले तरी, मा र वाड्यावरच्या इतर घरांचा उंबरठा देखील ओलांडीत नाहीं कसा ? तो तरुण आहे आणि त्याचें कुटुंब दूर आहे. घरांत मोलमजुरी करायला येणाऱ्या एकदोन देवदासी मास्तरच्या नजरेपुढें येतात जातात, हंसतात खिदळतात; पण मास्तर अजून कांहीं त्यांच्या तावडींत सांपडलेला दिसत नाहीं; या मास्तराचें गूढ कांहीं कळत नाहीं; याप्रमाणें विचार करून सांतू शेणै संधीची वाट पहात बसला होता.

घेतलें. तो पोरगा गडबड करीत होता, म्हणून माधवानें त्याला कडक शिक्षा केली होती.

मास्तरनें आपला उद्वेग, आला संताप, गिळून टाकला. त्यानें त्या मुलाला जवळ बोलावलें. त्याच्या मस्तकावरून, पाठीवरून हात फिरविला. आपल्या हातरुमालानें त्याच्या गालांवरील अश्रू पुसले. त्याच्याप्रमाणेंच आपलीं पोरें गरीब आहेत आणि सगळें जग गरीब पोरांनींच भरून गेलेलें आहे; त्यांचे अश्रु कोण पुसणार ? त्यांचें सांत्वन कोण करणार ? मास्तरचें मन आक्रंदूं लागलें.

o o o

याप्रमाणें मास्तरचा एक एक दिवस जात होता. घरची मंडळी सांगतील तीं सगळीं कामें करावीं आणि उरलेल्या वेळांत शाळेंत उदास मनानें काम करावें. गुडगुडी भरून देणें, घरचा हिशेब लावणें, भिकूदादांच्या मागें फिरावयास जाणें, अशीं एक का दोन, प्रसंगानुरूप उपस्थित होणारीं कामें मास्तरनेंच करावीं.

त्याच्यापूर्वी तेथें राहिलेले बहुतेक मास्तर गरज म्हणून, आवड म्हणून, व्यसन म्हणून,वाड्यावरच्या एखाद्या भाविणीकडे किंवा वेश्येकडे दिवसांतून कांहीं वेळ घालवीत. सुरवातीला हा प्रकार अर्थातच गुप्त राही. परंतु, नंतर तो घरच्या मंडळीच्या कानावर जाई, तेव्हां भिकूदादांना, सांतू शेणैला, किंवा घरच्या बायकामंडळींना करमणुकीचा एक नवाच विषय मिळत असे. चौपेटीवर सगळी मंडळी बसली असतांना गप्पागोष्टींच्या वेळीं मास्तरना तेथें बोलावण्यांत येई आणि त्यांची थट्टा करण्यांत येई. ही शोभा मास्तरांच्या अंगवळणीं पडली म्हणजे तेच तींत स्वखुशीनें भाग घेत. आणि अशा रीतीनें ते धन्याची मर्जी संपादन करीत. कुलीन, थोर समजलीं जाणारीं माणसें याप्रमाणें गरीब शाळामास्तरांच्या मानसिक अधःपतनाचा फायदा घेऊन, दिवसांतील कांहीं तास मौजेंत हंसण्याखिदळण्यांत घालवीत.

हणमंत मास्तरांच्या बाबतींत असें कांहींतरी घडलेलें घरच्या माणसांना हवें होतेंच. सांतू शेणैला मोठें आश्चर्य वाटे कीं, आठ दिवस होत आले तरी, मा[illegible]र वाड्यावरच्या इतर घरांचा उंबरठा देखील ओलांडीत नाहीं कसा ? तो तरुण आहे आणि त्याचें कुटुंब दूर आहे. घरांत मोलमजुरी करायला येणाऱ्या एकदोन देवदासी मास्तरच्या नजरेपुढें येतात जातात, हंसतात खिदळतात; पण मास्तर अजून कांहीं त्यांच्या तावडींत सांपडलेला दिसत नाहीं; या मास्तराचें गूढ कांहीं कळत नाहीं; याप्रमाणें विचार करून सांतू शेणै संधीची वाट पहात बसला होता.

आणि एक दिवस मास्तराच्या दुर्दैवानें, चार चौघांत त्याची टिंगल करण्याची संधि सांतू शेणैनें साधून घेतलीच.

केशर नांवाची एक तरुण मोलकरीण घरांत काम करायला येई. गेल्या दोन वर्षांत आलेल्या मास्तरांपैकीं बरेच मास्तर रात्रीच्या वेळीं तिच्याच आश्रयाला जात. केशरला वाटे कीं भिकूदादांच्याकडे येणाऱ्या प्रत्येक मास्तरवर आपला हक्कच आहे. यामुळें नवीन मास्तर वृत्तीनें स्थिर असला तरी, केशरच्या सहेतुक सलगीमुळें, तिच्या हरएक लाघवांमुळें, आणि वेळीं अवेळीं दाखविलेल्या फाजील कळकळीमुळें तो तिच्या मोहांत सांपडे, आणि तिच्या गोड सहवासांत आपल्या आयुष्याची भयाणता विसरण्याचा प्रयत्न करी.

हणमंत मास्तर तरुण होता आणि दिसायला कांहीं वाईट नव्हता. केशरनें त्याला मोहिनी पाडण्याचा प्रयत्न केलाच. परंतु तो साधण्याचें चिन्ह दिसेना. मास्तराच्या हृदयांत आग पेटलेली असतांना, आयुष्याचा प्रश्न गंभीर स्वरूपांत भेडसावीत असतांना, त्याला स्त्रीविषयक सुखाचे विचार सुचणेंच शक्य नव्हतें. मिळणारे पांचदहा रुपये घरीं पाठवून देण्याचें त्यानें ठरविलें होतेंच. मग एखादे वेळीं स्त्रीविषयक अभिलाषा उत्पन्न झाली तरी पैशांच्या अभावीं तिची तृप्ति अशक्यच नव्हती का ?

केशरनें मास्तरसाठीं आपणहून पाणी उपसून ठेवावें, मास्तरची ताट वाटी घांसावी, मास्तरची खोली झाडावी व मास्तरशीं मुद्दाम बोलणें उकरून काढावें.

मास्तरनें साधेपणानें आणि शून्य मनानें उत्तरें द्यावीं. तिच्या प्रयत्नाला उत्तेजन देण्यासारखें कांहींच करूं नये.

एकदां विहिरीपाशीं मास्तर कपडे धूत असतांना केशर आली. आसपास कोणीही दिसत नव्हतें. केशरनें पाण्याची कळशी काढून मास्तरच्या बादलींत ओतली. मास्तरनें कृतज्ञतेनें तिच्याकडे पाहिलें. तिनें हळूच मास्तरला प्रश्न केला.

—मास्तर, मला एक विचारायचं आहे तुम्हांला. विचारूं का ? रागावणार नाहीं ना तुम्ही ?—आणि हें विचारतांना तिनें आपल्या चेहऱ्याचे आणि इतर अवयवांचे किती तरी मोड केले.

तिची फाजील सलगी पाहून मास्तर किंचित् घाबरला. परंतु जरा धीर करून त्यानें म्हटलें,

—काय विचारायचं आहे तुम्हाला ? एखादं मूल शाळेंत पाठवायचं आहे का ?

—मला अजून मूल झालं नाहीं मास्तर !

—मग आणखी कांहीं विचारायचं आहे का ?

—तुम्हाला घरीं बायको आहे का हो मास्तर ?

—हो आहे. अन् तीन मुलं आहेत.

—अन् तुमची बायको काळी का गोरी आहे ?

—गोरी आहे अन् सुंदर आहे.

—माझ्यापेक्षां सुंदर का ?

मास्तराला हृदयांत कांटा खुपसल्यासारखें झालें. त्याला वाईट वाटलें आणि राग आला. परंतु तो उघड करण्याइतका वृत्तीचा ताठरपणा त्याच्या परिस्थितीनें, त्याच्या दैवानें त्याच्यापाशीं ठेवला नव्हता. म्हणून त्यानें शांतपणें म्हटलें,

—केशरबाई, माझ्या बायकोच्या सौंदर्याविषयीं तुम्ही एवढी विचारपूस कां करतां ?

—वाईट वाटलं का तुम्हाला ?

—तसं नाहीं पण...

—तुम्ही आतां घरीं केव्हां जाणार ?

या प्रश्नाने मास्तरच्या नजरेपुढें घरभाटावर काढलेलें कर्ज उभें राहिलें. तें फेडण्यासाठीं आपण मास्तरचा नावडता पेशा पत्करला आहे, आणि तें फेडल्या-नंतर आपण घरीं जाण्याचा निश्चय केला आहे, याची आठवण त्याला झाली. पण ही खरी गोष्ट केशरपुढें उघड करण्याचें त्याला कारण नव्हतें. म्हणून त्यानें म्हटलें,

—सध्यां वर्षभर तरी घरीं जात नाहीं मी.

—मग इथं तुम्ही एकटेच रहाणार का ?

—मंडळी घरीं आहे. मग एकटा रहायला नको का ?

—माझ्या बोलण्याचा अर्थ तुम्हांला कळला नाहीं, मास्तर !

—कोणता अर्थ तो ?

—...म्हणजे...असं कीं, स्त्रीच्या सहवासाशिवाय राहणं पुरुषाला कठीणच नाहीं का ? लग्नाची बायको जवळ नसली तरी, आपलेपणानं सेवा करणारं दुसरं माणूस पुरुषांना बाळगल्याशिवाय कसं होईल ? तुम्हांला नाहीं असं वाटत ?

—सध्यां कांहीं मला असं वाटत नाहीं. तुझ्याप्रमाणें मला वाटायला लागलं कीं, मी पुढचा विचार अवश्य करीन; अन् तो करतांना मी तुला विचारीन.— मास्तरनें सूक्ष्म हास्य करीत म्हटलें.

घरांतल्या कोणीतरी माणसानें मास्तर व केशर यांचें हें संभाषण ऐकलें असावें, किंवा संभाषण चालतांना त्यानें पाहिलें असावें. कारण लगेच मास्तर व केशर यांचें मोठें गुपीत चाललें आहे अशी बातमी घरच्या सगळ्या माणसांना माहित झाली.

सांतू शेणैच्या करमणुकीला नवा विषय मिळाला.

संध्याकाळच्या रिकाम्या वेळीं, घरची बायकामंडळी चौपेटीवर बसून बारीक सारीक कामें व गप्पागोष्टी करीत असतांना, सांतू शेणैनें मास्तरला हांक मारली.

सर्कशींतल्या सिंहाला हातांतला चाबूक दाखवून काम करायला सांगतांच त्यानें जबडा उघडून, पंजा पुढें करून प्रतिकार करावा, त्याप्रमाणें सांतू शेणैची हांक ऐकतांच, मास्तरचें मन आंतल्याआंत चवतावळें. पण लगेच संवयीप्रमाणें मान खालीं घालून, तो खालीं गेला.

चौपेटीवर बसलेली पंधरावीस मंडळी पुढचा प्रकार पहायला आतुर झाली.

—मास्तर ! तुमचं अभिनंदन करतों.—सांतू शेणै उपरोधिक स्वरांत म्हणाला.

—माझं अभिनंदन ? कां ?—मास्तर आश्चर्यचकित होऊन म्हणाला.

—सहवासासाठीं दुसरं माणूस मिळविल्याबद्दल !

—सांतूबाबा, स्पष्ट बोलायची कृपा कराल का ?—मास्तरनें विनंति केली. परंतु त्याच्या बोलण्याचा रोख मास्तरच्या लक्ष्यांत आला.

—मास्तर, वेड पांघरून पेडगांवला कां जातां ? बाकी, तुम्ही केलं तें योग्यच केलं. इतके दिवस गप्प राहिलां तेंच आश्चर्य ! तुमच्या आधीं इथं असलेल्या बहुतेक मास्तरांनीं हेंच केलं...मग तुम्ही तर अगदीं तरुण आहांत, शिवाय सुरूप आहांत. तुमच्यासारख्यांना तात्पुरती सहचारिणी पाहिजे असतेच. तुम्ही ती मिळविली यांत आम्हांला आनंद आहे...

या भाषणांतील वीष मास्तराच्या अंगांत तावडतोब भिनलें. एखाद्या भयंकर दरींत, झाडाच्या एका जीर्ण फांदीला धरून लोंबकळत असल्याप्रमाणें मास्तरला वाटलें. त्याच्या हृदयानें टाहो फोडला.

मुलें फिदीफिदी हंसत होतीं. बायका साभिप्राय नजरेनें एकमेकांकडे व मास्तर-कडे पहात होत्या. सांतू शेणै विजयी मुद्रेनें आपली नजर आसपास फिरवीत होता. भिकूदादा कोठें तरी बाहेर गेला होता.

मास्तरनें उत्तर केलें नाहीं. त्याला उत्तर करतां आलें नाहीं. त्याचे डोळे अश्रूंनीं डबडबले आणि त्यानें सुस्कारा टाकला.

TEHANA

सांतू शेणै म्हणाला,

—मास्तर! हंसण्याऐवजीं तुम्ही रडत आहां याचं मला आश्चर्य वाटतं.

मास्तर न बोलतां तेथून निघून गेला. बायकामंडळींत दयेचे उद्गार ऐकूं येऊं लागले. सांतू शेणै मनांतल्या मनांत विरमला.

मास्तर आपल्या खोलींत आला. आज आदितवार, त्याच्या पत्राची पाळी होती. त्यानें प्रक्षुब्ध मनःस्थितींतच बायकोला लिहिलें...

सप्रेम आशिर्वाद,

चि. मधु तापानें आजारी आहे हें समजल्यापासून चिंता वाटत आहे. लवकर समाचार कळीव. मी येथें खुशाल आहें. घरची मंडळी मला फारच प्रेमानें वागवितात. मला कांहींच उणें पडूं देत नाहींत. लहान मुलांना शिकवितांना मोठी मजा वाटते. त्यांच्या संगतींत मला तुमची आठवण सुद्धां होत नाहीं. माझ्या मधु-सारखा एक विद्यार्थी दिसतो, त्याच्यावर मी खूप प्रेम करतों. 'मोटू' नांवाचा एक कुत्रा इथें आहे. तो माझा जिवलग दोस्त बनला आहे. तो रात्रींचा माझ्या पायाजवळ पडून राहातो. एकंदरींत माझे दिवस मोठ्या मजेंत जातात. माझी काळजी मुळींच करूं नये. क. हे आशिर्वाद.

तुझा,

हणमंत राऊत.

० ० ०

नारळांचा पाडा* करण्याची कामगिरी मास्तरावर अजून सोंपविण्यांत आली नव्हती. परंतु कांहीं महिन्यांनंतर भिकूदादांनीं त्याला आपल्या एका दूरच्या भाटांत पाडा करण्यासाठीं पाठवून दिलें. मास्तरानें थोडी कुरकुर केली. शाळा बंद ठेवावी लागेल, मुलांचें नुकसान होईल, शिवाय आपणास पाड्याचें काम कळत नाहीं, इत्यादि अडचणी त्यानें दाखविल्या. परंतु भिकूदादांनीं त्याला म्हटलें,

—शाळा दोनचार दिवस बंद ठेवावी लागली म्हणून कांहीं बिघडत नाहीं. बाकी शाळा सुरू असली तरी, मुलं काय शिकतात तें दिसतंच आहे. तुम्हाला पाड्याची माहिती नाहीं म्हणतां, परंतु पाडेल्यांनीं+ पाडलेले नारळ तुम्ही मोजून भागेल्याच्या× स्वाधीन करायचे, एवढंच तुमचं काम.

---

* माडांचे जून नारळ काढून एकत्र करून ठेवण्याच्या कृतीला पाडा म्हणतात.
+ पाडेली—माडावरील नारळ काढणारा माणूस. × भागेली—नारळाची बाग राखणारा धन्याचा माणूस.

हा हुकूम ऐकल्यानंतर मास्तरना राहणें शक्यच नव्हतें. शाळा बंद ठेवून, मास्तर मोठ्या नाखुषीनें चारपांच कोस दूर असलेल्या त्या भागांत पाडेली बरोबर घेऊन गेला.

दिवस पावसाळ्याचे होते. आणि या दिवसांत तर पुष्कळच पाऊस पडत होता. त्यामुळें मास्तरचे फारच हाल झाले. दिवसभर पाण्यांत वावरल्याशिवाय गत्यंतर नव्हतें. प्रत्येक झाडाच्या जवळपास राहून, पडलेल्या नारळांवर नजर ठेवावी लागे. त्यामुळें ओल्याचिंब पोशाखांत तासचे तास काढावे लागत. तेथें ब्राह्मणांची वसति नव्हती. गावड्यांचीं पांचसहा झोंपडीं होतीं. मास्तरला अर्थात् तेथेंच थंड जमिनीवर पडावें लागे आणि आपल्या हातांनीं एखाद्या भागेल्याच्या घरांत गोटे शिजवून खावे लागत. वाड्यावर विहीर नव्हती. सगळे लोक वर्षभर जवळच्या नदीचें पाणी खात. पावसामुळें तें गढूळ होई; परंतु गावडे लोकांना त्याची पर्वा नव्हती. मास्तरलाही त्याच पाण्याचा उपयोग करावा लागला.

पाडा उरकून चारपांच दिवसांनीं मास्तर परत आला तेव्हां त्याला ताप भरला. थंडीताप असेल म्हणून मास्तरनें घरगुती काढा तयार करून घेतला. दोनतीन दिवस गेले. तापाचें प्रमाण वाढतच होतें. मास्तर मनांत भ्याला. घरची मंडळी मास्तरची चौकशी करीत, परंतु तींत ओलावा नव्हता.

आदितवार आला. मास्तरच्या पत्रलेखनाचा दिवस तो. तें काम त्यानें कधींही चुकविलें नव्हतें. त्यानें बायकोला खालील पत्र लिहिलें.

सप्रेम आशीर्वाद,

मी सुखरूप आहें. चारपांच दिवस मी बाहेरगांवीं, मालकाच्या कांहीं कामासाठीं गेलों होतों. दिवस मजेंत गेले. एथील खेडीं फारच सुंदर आहेत. जिकडे तिकडे नारळीचीं आणि पोफळीचीं झाडें, मुरडत जाणाऱ्या लहानमोठ्या नद्या आणि हिरवेचार डोंगर, यामुळें गांवें किती गोजिरवाणीं दिसतात !

धन्याची माझ्यावर वहाल मर्जी बसलेली आहे. घरच्या माणसांचा लोभ वाढता आहे. माझ्यावद्दल काळजी करूं नये. तुम्ही आनंदांत रहावें. संकटांना भिऊन जाऊं नये. आज ना उद्यां आपणांस चांगले दिवस येतील ही खात्री बाळगावी. चि. मधु, खुशी आणि कमी यांची केव्हां केव्हां आठवण होते. कर्जाची फेड परमेश्वर करील.

त्याची इच्छा असेल त्याप्रमाणें घडून येईल. आईला सा. नमस्कार सांग. तिला कांहीं उणें पडूं देऊं नकोस. तिच्या आशीर्वादानें तुमचें बरें होईल.

कळावें, हे आशीर्वाद.

तुझा,

हणमंत राऊत.

चारपांच दिवस झाले तरी ताप काढला नाहीं. घरचें एक माणूस आजारी होतें म्हणून डॉक्टर आला होता. त्याला मास्तरची प्रकृति दाखावण्यांत आली. डॉक्टरच्या मतानें ताप टायफॉइड ठरला.

टायफॉइडचें नांव ऐकतांच सगळीं भ्यालीं. पण तीं मास्तरच्या काळजीमुळें नसून, ताप संसर्गानें घरच्या इतर मंडळीला येईल म्हणून. भिकूदादा, सांतू शेणै, इत्यादि पुरुष मंडळींनीं त्यासंबंधीं कांहीं खलबत केलें, आणि लवकरच मास्तरला त्या जागेवरून हलविण्यांत येऊन, घरापासून थोड्याच अंतरावर उन्हाळ्यांत गुरें बांधण्याच्या पडक्या घरांत नेऊन ठेवण्यांत आलें.

घरच्या नोकराकडून मास्तरला तेथेंच पेजपाणी नेऊन देण्यांत येऊं लागलें. नोकरानें भीत भीत घरगुती उपचार केले.

टायफॉइडची एकएक विकृति मास्तरला होऊं लागली. मस्तक बधिर झालें, भ्रम होऊं लागला, डोळ्यांतील नजरेची स्थिरता नष्ट झाली.

कांहीं क्षण त्याची स्मृति किंचित् जागृत होई, तेव्हां त्याला आपली मंडळी, लहान लहान पोरें, हलाखीचा संसार, घरावर असलेला कर्जाचा बोजा, आपली केंविलवाणी असहाय परिस्थिति, इत्यादि गोष्टींची आठवण होई, अपार दुःखानें हृदय आक्रोश करी, आणि त्याच्या त्या निस्तेज डोळ्यांत अश्रू चमकूं लागत.

त्या रात्रीं भयंकर पाऊस पडला, गडगडाट झाला, विजा पडल्या, वादळ झालें, झाडें मोडलीं आणि त्या भयाण अंधारांत, निसर्गाच्या त्या तांडवनृत्यांत, पोटासाठीं देशोधडीला लागलेला तो भोळाभावडा अभागी जीव अनंतांत विलीन झाला.

**शाळामास्तर**

ले.–ऑगस्ट १९३६
प्र.–प्रतिभा व. ४, अं. १५

क्र ५१ २२३

# कुचंबणा

लुसीयेचा आज अठरावा वाढदिवस होता. वैभवसंपन्न घराण्यांतील एका वजनदार गृहस्थाची आवडती मुलगी ती. तिच्या आवडीसाठीं शेंकडों रुपये खर्चून, वाढदिवसाच्या समारंभासाठीं आसपासच्या गांवांतील प्रतिष्ठित स्त्रीपुरुषांना आमंत्रण करण्यांत आलें होतें.

जेवणाचा कार्यक्रम पार पडल्यानंतर माडीवरच्या प्रशस्त दालनांत नाचाला सुरवात झाली.

विविध प्रकारचें लांकडी सामान त्या दालनांत कलापूर्ण रीतीनें मांडलेलें होतें. वेगवेगळ्या धातूंचीं सुंदर नक्षीकाम केलेलीं घाटदार दुर्मिळ लहानमोठीं पात्रें लहानमोठ्या मेजांवर मांडलीं होतीं. भिंतीचा फिकट हिरवा रंग, खुर्च्या–कोचांच्या गाद्या आणि भव्य तसबिरांच्या रुंद चौकटी यांच्या रंगाशीं सुसंगत होता.

आपल्या उंची पोशाखानें आणि सुंदर आवरणांनीं लुसीया राजकन्येप्रमाणें शोभत होती. ती सुंदर नव्हती. पण तारुण्य आणि श्रीमंती यांचें तेज तिच्या हावभावांतून, तिच्या अवयवांतून प्रतीत होत होतें. तिच्या उत्कट व उदात्त भावना तिच्या प्रशांत नजरेंत दिसून येत होत्या.

तीस चाळीस युगुलें, वाद्यांच्या तालावर, एकाच वेळीं वर्तुलाकार नाचूं लागलीं.

निरनिराळ्या तीस चाळीस वाद्यांच्या संमीलनानें उत्पन्न होणारी स्वरसंगति भव्योदात्त होती. प्रकाशलहरी, नादलहरी, आणि नर्तक–नर्तिकांच्या हस्तपादादि अवयवांच्या चैतन्ययुक्त गतीमुळें उत्पन्न होणाऱ्या सौंदर्यलहरी, यांच्या उन्मादक मिलाफानें कलेचा दृश्य पसाराच तेथें पसरलेला होता.

कांहीं वेळानें विश्रांतीसाठीं नाच थांबला, व मंडळीची जिकडे तिकडे पांगापांग झाली. कांहीं मंडळी मद्याचा आस्वाद घेण्यांत रंगून गेली, कांहीं खुर्च्यांवर बसून संभाषण करूं लागली.

लुसीया बसली होती तेथें एक अनोळखी, देखणा तरुण आला आणि दुसऱ्या नाचांत आपली जोडीदार होण्याची त्यानें मोठ्या शालीनतेनें तिला विनंति केली.

लुसीयेनें स्मितपूर्वक त्याची विनंति मान्य करून त्याला आपल्या जवळ बसायला सांगितलें. त्याची बेदरकार नजर, त्याचे कुरळे केस आणि क्षणाक्षणिक बदलणारे त्याचे आविर्भाव तिला किती तरी मोहक दिसले.

तो नाचासंबंधीं बोलूं लागला. नाचाचे सुंदर प्रकार कोणते, आपण कोणत्या प्रकारांत पारंगत आहों, तेथील मंडळीला खरें नृत्य कसें करतां येत नाहीं, इत्यादि गोष्टींसंबंधीं तो मोठ्या उत्साहानें बोलूं लागला. नृत्यांत तो किती पारंगत आहे हें लुसीयेला अजून कळलें नव्हतें, परंतु थोड्या मिनिटांच्या संभाषणानें तिला कळून चुकलें कीं बोलण्याच्या कलेत तो अतिशय पारंगत आहे !

दुसऱ्या नाचाला सुरवात झाली. दोघेंहि एकमेकांच्या हातांचे पंजे पकडून नृत्याच्या पावित्र्यांत उभीं राहिलीं. वाद्य सुरू झालें, आणि नर्तकांच्या जोड्या गोजिरवाण्या लाटांप्रमाणें, एकाच प्रकारच्या हस्तक्षेपांनीं व पदाघातांनीं हलूं लागल्या.

लुसीयेला तिच्या जोडीदाराचें नृत्यकौशल्य लवकरच कळून आलें. अगदीं लीलेनें, सफाईनें तो तिला नाचवूं लागला. त्याच्या इच्छेप्रमाणें तिच्या अवयवांची हालचाल होऊं लागली. आपल्या हातून एखादी चूक घडेल ही जी भीति तिला पहिल्या नाचाच्या प्रसंगीं होती, ती भीति आतां नष्ट झाली.

नाच थांबला तेव्हां तिचें हृदय धडधडत होतें. तिच्या कपाळावर स्वेदबिंदु चमकत होते. तिचे हातपाय सूक्ष्मपणें कांपत होते. एक प्रकारची अननुभूत धुंदी तिच्या मस्तकांत शिरली होती. ती खिडकीपाशीं गार हवा घेण्याच्या हेतूनें आली. तोहि तिच्या बाजूला येऊन उभा राहिला.

—तुमचं नांव समजेल का मला ?—तिनें आर्जवी स्वरांत विचारलें.

—लुईश कुलास्.—त्यानें उत्तर केलें.

—तुम्ही फार सुंदर नाचलांत. इतकं सुंदर नाचायला तुम्ही कुठं शिकलांत तें कळेल का मला ?

—पणजीला एका क्लबचा मी सभासद आहें. तेथें नेमानें मी नाचायला जातों.

—आपण थोडं मद्य घेतां का ?—तिनें विचारलं.

—आपण बरोबरच घेऊं.

ती मद्याची भोक्ती नव्हती. परंतु त्याच्या या उत्तरानें तिला मद्य घेतल्याशिवाय गत्यंतर नव्हतें. म्हणून तिनें म्हटलें,—चला तर आपण तिथं जाऊन मद्य पिऊं.

आणि त्याला बरोबर घेऊन ती मद्य पिण्याच्या दालनांत गेली, आणि मेजावर ठेवलेल्या बाटल्यांपैकीं उत्तम मद्य पेल्यांत घालायला तिनें पोऱ्याला सांगितलें.

दोघेंहि हंसत, विनोद करीत मद्य प्यालीं. आणि माडीबाहेरच्या सज्जावर आलीं.

आपलं त्या गांवांत आजोळ आहे, मेडिकल कॉलेजचा कोर्स आपण नुकताच पुरा केला आहे, इत्यादि आपल्यासंबंधींची माहिती त्यानें तिला सांगितली.

—मग आणखी किती दिवस रहाणार आपण इथं ?—लुसीयेनें प्रश्न केला.

—नेहमींच रहाण्याचा माझा विचार आहे. इथं प्रॅक्टीस चालण्यासारखी परिस्थितीत असली तर इथंच दवाखाना उघडीन म्हणतों.

या उत्तरानें, लुसीयेला आनंद झाल्यासारखा दिसला. तिनें घाईघाईनें म्हटलें,

—इथं तुमची प्रॅक्टिस चांगली चालेल यांत शंका नाहीं. येथील लोक फार सधन आहेत आणि गांवांत एकच डॉक्टर आहे. शिवाय आसपासच्या चार पांच गांवांत डॉक्टर नसल्यामुळें त्या गांवचे रोगी इथंच येतात. तुम्ही इथं आलां तर तुमचा जम उत्तम बसेल. आमच्या मित्रमंडळींत शिफारस करायला मी बाबांना सांगेन.

—मी आपला आभारी आहें. इथं रहायला मिळालं तर मला दिखील आनंद होईल. आपल्यासारख्या श्रीमंत लोकांचा सहवास कोणाला नको आहे ? माझं इथं रहाणं ठरलं न ठरलं तरी सध्यां कांहीं दिवस मी याच गांवांत काढणार आहें.

त्यानें तिचें नांव विचारून घेतलें, आपलें आजोळ कोणाच्याकडे आहे तें सांगितलें, आपल्याला पेटीवादनाचा आणि संगीताचा नाद आहे ही गोष्ट मोठ्या कौशल्यानें तिच्या लक्ष्यांत आणून दिली, आणि लवकरच तिच्याशीं आपली भेट झाली तर आपल्याला धन्यता वाटेल, असें तिला सांगावयास तो विसरला नाहीं. समारंभ संपल्यानंतर तो निघून गेला. आणि त्याच्यासंबंधी विचार करीत आणि तो करतांना, अननुभूत भावनांचा आस्वाद घेत ती झोंपी गेली.

० ० ०

दुसऱ्या दिवशीं संध्याकाळीं लुसीयेनें सुंदर पोशाख केला आणि ती आपल्या भावजईच्या खोलींत गेली. फिरायला जातांना आपल्या चार वर्षांच्या पुतण्याला बरोबर घेऊन जायला ती कधींच विसरत नसे.

छोटा फेर्नांद बाहेर निघण्याच्या तयारींत होता. तिला पहातांच मोठ्या आनंदानें उड्या मारीत तो तिच्याजवळ आला, व त्यानें तिचा हात पकडून म्हटलें,—चला. आपण आतां बाहेर जाऊ.

ती समुद्रकिनाऱ्यावर पोंचली, तेव्हां लुईश कुलास आपल्या मागोमाग मोठ्या घाईनें येत आहे असें तिला दिसून आलें. त्याबरोबर ती हळू चालूं लागली.

वेळेवरच्या रेतांत छोटा फेर्नांद अवखळपणें नाचत होता; विरणाऱ्या लाटांचा फेस हातांत धरीत होता; रेतीचा चेंडू करून दूर फेंकीत होता; पळणाऱ्या खेंकड्यांना पकडण्याची धडपड करीत होता; आणि लुसीया कौतुकानें, प्रेमानें त्याच्या लीलांकडे पहात, वाऱ्यामुळें उडणाऱ्या केंसांकडे पहात, पावलें टाकीत होती.

लुईश मागाहून येऊन तिच्याबरोबर चालूं लागला तेव्हां तिचे डोळे उत्कट समाधानानें चमकूं लागले.

सागराच्या सीमारेषेवर सूर्यबिंब टेकलें होतें. त्यामुळें विविध रंगांचा सडा पाण्याच्या सपाटीवर पडला होता. दूरवर जाणाऱ्या होड्यांचीं शुभ्र शिडें, क्षितिजाच्या पडद्यावर अस्पष्टपणें उठून दिसत होतीं. किनाऱ्याच्या बाजूला समुद्रांत एक डोंगर गेला होता त्याच्यावर एक कुळागार वसलेलें दिसत होतें.

—आपण इथं बसूं ना थोडा वेळ?—लुईशनें तिला विचारलें.

तिनें त्याच्या म्हणण्याला मान्यता दिली आणि तीं त्या रेतींत बसलीं.

फेर्नांद शिंपले गोळा करूं लागला.

—मग इकडे रहायचं ठरविलं ना तुम्ही?—तिनें त्याला प्रश्न केला. या प्रश्नांतील जिव्हाळ्याचा स्वर त्याच्या लक्ष्यांत आल्याशिवाय राहिला नाहीं.

—अजून बऱ्याच गोष्टींचा विचार करावयाचा आहे मला.

ती थोडा वेळ स्तब्ध राहिली. आपल्यासंबंधीं बारीक सारीक माहिती तो सांगेल तर बरें असें तिला वाटलें. पण ती माहिती स्पष्टपणें विचारणें तिला जड गेलें.

—डॉक्टरचा पेशा पत्करून तुम्ही बरं केलंत असं मला वाटतं.—तिनें थोड्या वेळानें म्हटलं.

—श्रीमंतांना हा धंदा चांगला आहे. पण माझ्यासारख्या मध्यम स्थितींतल्या माणसांना त्या धंद्यांतील अनिश्चित मिळकत त्रासदायक होते नाहीं का ?

—तुम्ही इतके निराश व्हायचं कांहीं कारण नाहीं. लोकप्रिय व्हायचे गुण तुमच्या अंगीं मला स्पष्ट दिसतात.

—लुसीया, स्पष्ट बोलतों त्याची क्षमा करा. पण तरुणींना प्रिय होण्यासारखे गुण असले, म्हणून तेवढ्यानें मी रोझ्यांना प्रिय होईन असं अनुमान तुम्ही बांधू नका.

लाटांची गर्जना थोडी थोडी वाढत होती. आणि सूर्यबिंब आतां अदृश्य झालें होतें.

—तुम्ही इतके निराशावादी कां व्हावं मला कळत नाहीं. इथं आल्यामुळं कदाचित् दुसऱ्या एकाद्या मार्गानं तुमचं हित होईल, कोणी सांगावं ?

—तशी खात्री असती तर मी आनंदानं इथं राहीन.—तिच्या शब्दांतील खोल हेतूला त्यानें उत्तर दिलें.

तिच्या भावनांची विचित्र चाळवाचाळव झाली. पुढच्या गोष्टी तिला अंधुक दिसत होत्या. मग त्याला निश्चित आश्वासन तिला कसें देतां आलें असतें ?

संधिप्रकाश पसरला. तीं दोघेंहि उठलीं. फेर्नांदनें गोळा केलेले शिंपले रुमालांत बांधले आणि तो त्यांच्याबरोबर चालूं लागला.

तीं एका मोठ्या घराकडे पोंचलीं तेव्हां त्यानें तिला म्हटलें,—हें माझ्या मामाचं घर. थोडा वेळ इथं बसायला हरकत आहे का ? माझं पेटीवादन दाखवतों तुम्हाला.

पेटीवादनाच्या मोहानें ती त्याच्याबरोबर घरांत गेली. एका सुंदर दिवाण-खान्यांत बसल्यावर लुईशनें पियानो वाजवायला सुरवात केली. उत्कृष्ट नर्तक, त्याचप्रमाणें तो उत्कृष्ट वादक आहे हें तिला लगेच कळून चुकलें.

आणि त्याची कला, त्याची आर्थिक स्थिति, त्याचा धंदा, इत्यादिसंबंधीं विचार करीत आणि या विचारांतच आनंद मानीत ती घरीं परतली.

o o o

थोड्याच दिवसांत त्यांची मैत्री बरीच वाढली.

तिनें नेहमीं त्याच्याबरोबर फिरायला जावें, त्यानें तिला ऑर्गन वाजवून दाखवावा, सुंदर गाणीं म्हणून दाखवावीं. त्यावेळीं त्याच्या सहवासांत आपलें आयुष्य किती सुखांत जाईल याचीं तिनें कल्पनाचित्रें रेखाटावीं.

तिनें त्याला आपल्याकडे न्यावें, आपलें वैभव दाखवावें, घरच्या मंडळीशीं ओळख करून द्यावी, आणि त्याला देखील तिच्या मैत्रीचें मोठें भूषण वाटावें.

एकदां गायनवादनाच्या एका प्रसंगानंतर त्यानें तिचें चुंबन घेतलें.

ती तरुण होती पण विवेकशील होती. तिच्या भावना, परंपरागत कुलीनतेमुळें असो किंवा जन्मजात स्वभावामुळें असो, सुसंस्कृत बनल्या होत्या. त्याच्या मैत्रीचा फायदा घेऊन चार दिवस मजा करावी हा विचार तिच्या मनाला केव्हांच शिवला नाहीं. आणि म्हणून उन्मादाच्या भरांत त्यानें तिचें चुंबन घेतलें त्यावेळीं तिनें असें ठरविलें कीं, त्याच्याशीं जडलेल्या आपल्या स्नेहाला निश्चित संबंधाचें स्वरूप द्यावें.

आपल्या वडिलांची परंपरागत श्रीमंती आणि लुईशची मध्यम स्थिति यांची तुलना तिच्या मनांत उभी राहिली. परंतु आपल्या अफाट संपत्तीचा तिसरा हिस्सा कायद्याप्रमाणें आपल्याला मिळावयाचा आहे. आणि तो हिस्सा आपण आपल्या नियोजित नवऱ्याला दिला तर त्याचा सामाजिक दर्जा वाढेल, आणि विवाह केल्याचा दोष आपल्या पदरीं लोक बांधणार नाहींत, असें तिला वाटलें.

दुसऱ्या दिवशीं त्याची भेट झाली तेव्हां तिनें त्याला म्हटलें,

—लुईश, आपली मैत्री नेहमींच कायम टिकावी असं नाहीं का तुला वाटत ?

—प्रिय लुसीया, इतकं माझं भाग्य आहे का ?

—तूं लग्नासंबंधीं विचार केला आहेस का कधीं ?

—आतां तूंच विचार कर म्हणजे माझा तेवढा त्रास वांचेल.

—आम्ही लग्न करावं असं मला वाटतं.—तिनें गंभीर मुद्रेनें म्हटलें.

—मला दिखील तसंच वाटत होतं. पण मी गरीब, तूं श्रीमंत; तेव्हां तसं सांगायला मला धीर होत नसे. पण लुसीया, आपला विचार तूं घरच्या मंडळींना कळविला आहेस का ?

—आतां कळविणार आहें मी.

—वडिलांची संमति मिळेल असं वाटतं का तुला ?

—त्यांच्याकडून हरकत येईल असं नाहीं मला वाटत !

—चुकतेस तूं. तुमचं घराणं श्रीमंताचं आहे. अन् घराण्याच्या इस्टेटीवर तुझा हक्क आहे.

—आपल्या सुखाच्या दृष्टीनं हें चांगलंच नाहीं का ?

—पण घराण्याच्या हिताच्या दृष्टीनं तें चांगलं नाहीं असं तुझ्या वडील मंडळींना वाटल्याखेरीज रहाणार नाहीं.

ती अधिक बोलली नाहीं. सगळ्या गोष्टी निश्चित ठरल्याशिवाय आपण आपल्या लग्नाचा प्रश्न लुईशकडे काढला, याचें तिला वाईट वाटलें.

ती घराकडे परतली. रस्त्यांत किती तरी शंकाकुशंकांनीं तिला त्रास दिला.

ती घरांत आली आहे असें कळतांच, तिच्या वडिलांनीं तिला बोलावून आपल्या खोलींत नेली. तिचा वडील भाऊहि तेथेंच होता. ती येण्यापूर्वी दोघांचेंहि आपसांत कोणत्यातरी गंभीर प्रश्नावर बोलणें चाललें होतें हें त्यांच्या मुद्रेवरून स्पष्ट दिसत होतें.

—लुसीया, बस पाहूं इथं. तुझ्याजवळ कांहीं बोलायचं आहे मला.—तिच्या वडिलांनीं म्हटलें.

—अन् पापा, तुम्हाला दिखिल मला कांहीं सांगायचं आहे.

—मग तुझं म्हणणं आधीं कळूं दे मला.—तिच्या वडिलांनीं म्हटलें.

—लुईश कुलासला तुम्ही ओळखतां ना ? त्याच्याशीं माझा स्नेह जमला आहे.

—तूं तरुण आहेस व तो सुंदर अन् हुषार आहे. मग तुमचा स्नेह जुळला, हें स्वाभाविकच नाहीं का ?

—पण आपली संमति मला हवी आहे.—इतकें सांगून तिनें मान खालीं घातली.

—म्हणजे त्याच्याशीं लग्न करण्याचा तुझा विचार आहे का ?

वडिलांच्या स्वरांतून व्यक्त होणारें आश्चर्य पाहून ती गप्पच राहिली.

—प्रिय लुसीया, तूं किती वेडी आहेस ग ! मी तुला सगळं सांगितलं पाहिजे ना ?—त्यांच्या आवाजांत माधुर्य आणि वात्सल्य यांचा मिलाफ झाला होता. ते तिच्याजवळ आले आणि आपला हात त्यांनीं तिच्या पाठीवरून फिरविला.

—लुसीया ! तुझं सुख मला नको आहे का ? पण आपल्या घराण्याच्या परंपरागत श्रीमंतीकडे अन् मोठेपणाकडे लक्ष द्यायला नको का ? किती तरी पुरुषांनीं अन् मुलींनीं आपल्या सुखाकडे दुर्लक्ष केलें म्हणूनच आपली श्रीमंती टिकली, अन् समाजांत व सरकार-दरबारांत आम्हाला मान मिळत गेला. तूं विवाह केलास तर आपल्या या इस्टेटीचा तिसरा हिस्सा तुझा नवरा घेतल्याशिवाय राहील का ? प्रत्येक मुलानं अन् प्रत्येक मुलीनं विवाह केला तर घराण्याची संपत्ति एकाच पिढींत नामशेष

होऊन जाईल. चांगल्या घराण्यांतील तरुण इस्टेटीचा हिस्सा घेतल्याशिवाय तुझ्याशीं लग्न करणार नाहींत. अन् गरीब तरुणाशीं लग्न करून तूं सुखी होणार नाहींस. शिवाय आपल्या घराण्याला तें शोभणार नाहीं....

लुसीया बिचारी काय बोलणार ? इतकी श्रीमंत असून अन् कायद्यानें त्या श्रीमंतीचा वांटा मिळत असूनहि तिला लग्न करतां येत नव्हतें.

तिनें असहाय्यपणें अश्रू गाळले. वडिलांनीं तिचें शांतवन करण्याचा प्रयत्न केला, पण तिचें हृदय तळमळूं लागलें.

ती आपल्या खोलींत आली आणि तिनें खालील पत्र लिहून तें लुईशला पाठविलें.

प्रिय लुईश,

घराण्याच्या कल्याणासाठीं मला वैवाहिक सुखाचा त्याग करावा लागत आहे. माझ्यासाठीं माझ्या इस्टेटीवर पाणी सोडायला तूं तयार असलास, तर मी आजपासून तुझीच आहें.

तुझी अभागी,
लुसीया.

नोकरानें लुईशचें उत्तर थोड्याच वेळानें तिला आणून दिलें. त्यांत त्यानें लिहिलें होतें, " मी गरीब आहें अन् तूं श्रीमंत आहेस. इस्टेटीचा वांटा न घेतां मी तुझा स्वीकार केला तर तें मला अपमानास्पद होणार नाहीं का ? अन् या गोष्टीला मीं तयार झालों तरी माझे वडील मला संमति देणार नाहींत असें वाटतें. तुझ्या स्थितिबद्दल मला फार वाईट वाटतें. "

तिनें पत्र वाचलें आणि आजन्म कौमार्यांत आपल्याला दिवस काढावे लागणार या भीतीनें ती स्फुंदस्फुंदून रडली.

o o o

त्या दिवसापासून तिनें आपल्या भावना व विकार दडपून टाकण्याचा बुद्धिपुरस्सर प्रयत्न चालविला. लुईशला भेटण्याचें तिनें बंद केलें. दिवसेंदिवस ती धार्मिक बनत चालली. बायबल वाचणें, सकाळीं चर्चमध्यें जाणें, प्रार्थना करणें, स्तोत्रें म्हणणें, इत्यादि कामें ती नेमानें करूं लागली.

आयुष्याच्या विलासी बाजूकडे तिनें पाठ फिरविली. शेजारची पाजारची जाणती मंडळी तिच्या आचरणाचें कौतुक करूं लागली.

आपल्या भावजईचें विलासी सुखमय आयुष्य पाहून तिच्या दडपलेल्या भावना उचंबळून वर येत, व ती अस्वस्थ होई.

लग्न करायला न मिळालें तरी इतकें विरक्त होण्याचें कारण नाहीं असें तिला तिचा भाऊ म्हणत असे; आणि किती तरी आजन्म कुमारिका व जरठ कुमारिका आपल्या समाजांत आनंदांत दिवस घालवितात, असें तिचे वडील तिला सांगत.

केव्हां केव्हां उद्वेगाच्या भरांत स्वतःच्या भित्रेपणाची ती निर्भत्सना करी. वडिलांशीं भांडून आपण संपत्तीचा हिस्सा मिळविला पाहिजे होता, असें तिला वाटे.

शील टिकविण्यासाठीं ती स्वतःची मानसिक कुचंबणा करून घेई. त्यापेक्षां आपण कुठें तरी जाऊन एखाद्या गरीब तरुणाशीं लग्न करून त्याच्या सहवासांत आयुष्य काढलेलें काय वाईट, असा तिला प्रश्न पडे. आणि मनाची अशी तळमळ चालली म्हणजे सूडाचे विचार तिच्या मस्तकांत थैमान घालीत, आणि गांवच्या एखाद्या तरुणाशीं उघड उघड अनैतिक संबंध ठेवावा, असें तिला वाटे.

० ० ०

मनाच्या या दोलाचल स्थितींत तिचीं कांहीं वर्षें गेलीं. आणि एका वर्षापूर्वी, त्यांच्याकडे नोकरीला एक तरुण आला. तो नोकर देखणा नव्हता. पण त्याच्या पीळदार व सुदृढ अवयवांत तरुणींचें मन आकृष्ट करून घेण्याचें सामर्थ्य होतें.

पहिल्यांदांच तिनें त्याला पाहिला तेव्हां तिला वाटलें कीं तो आपल्याकडे न येता तर बरें झालें असतें. परंतु, थोड्याशा परिचयानंतर तिला वाटलें कीं आपल्यावर जेव्हां त्याची नजर स्थिर होते, तेव्हां सगळ्या जगापासून लपवून ठेवीत असलेलीं आपलीं गुप्त नाजुक दुःखें त्याला समजलेलीं आहेत, आणि त्यांच्याकडे अत्यंत सहानुभूतीनें पाहून तीं कमी करण्याची शक्ति त्याच्या नेत्रकटाक्षांत आहे.

केव्हां केव्हां ती त्याच्याशीं तुसडेपणानें वागे. परंतु, या दिखाऊ आवरणाच्या मागें असलेली ओढ त्याच्या नजरेला दिसत आहे असें तिला कळून येई, आणि ती मनांतल्या मनांत खजील होई.

तिच्या आज्ञा पाळायला तो मोठा उत्सुक दिसे. आपल्या कौमार्याचा तो भंग तर करणार नाहीं ना, अशी शंका तिच्या हृदयाला चाटून जाई, आणि त्याला शक्य तितका टाळण्याचा ती प्रयत्न करी.

एकदां तिच्या वडील भावाच्या वाढदिवसानिमित्तानें नाच झाला. नाचाला लुईश कुलासहि आला होता. पांच वर्षांनंतर तिनें त्याला इतक्या जवळ आजच पाहिला. त्याला टाळण्याची तिनें पराकाष्ठा केली. पण त्यानें तिची पाठ सोडली नाहीं. आपल्याबरोबर नाचण्याची त्यानें तिला विनंति केली, आणि पांच वर्षांपूर्वीचे त्याच्याबरोबर नाचतांना अनुभवलेले गोड क्षण आठवून तिनें त्याला संमति दिली. ती त्याच्याबरोबर यथेच्छ नाचली. गेल्या पांच वर्षांत आपण घालविलेलें कृत्रिम, दांभिक आयुष्य म्हणजे एक भयानक स्वप्नच होतें असें तिला वाटलें.

त्याच्याबरोबर ती मद्य प्याली. वादळाच्या प्रसंगीं आकाशांतून सैरावैरा धांवणाऱ्या ढगांप्रमाणें तिच्या भावनांची गत झाली.

नाच संपला. सगळी मंडळी घरोघर गेली. डॉ. लुईश देखील परतला.

आणि असीम निराशेनें ती आपल्या खोलींत आली.

अठराव्या वर्षीं आपलें लुईशशीं लग्न झालें असतें तर यावेळीं आपल्याला एक दोन गोजिरवाणीं मुलें झालीं असतीं...विचार, भावना, विकार, यांचें एकाच वेळीं तिच्या मनांत तुंबल युद्ध माजलें होतें.

घरची मंडळी निजली होती. सगळीकडे अंधार पसरला होता. बाहेरची झाडें भयाण दिसत होतीं.तिच्या खोलीचें दार उघडेंच होतें. ती पलंगावर तळमळत होती.

बाहेर आवाज झाला. तिनें वळून पाहिलें. मेणबत्ती हातांत धरून सिमांव—तो तरुण नोकर—दाराशीं उभा होता.

त्यानें कंपित आवाजांत म्हटलें,—बाय, पाणी आणून ठेवायला विसरलों.

तो आंत आला आणि पाण्याचें भांडें त्यानें एका मेजावर ठेवलें.

मेणवत्तीच्या सौम्य प्रकाशांत त्याची उंच अंगकाठी, त्याचा वेडर चेहरा, त्याची भरदार विस्तृत छाती, आणि त्याचे बुभुक्षित डोळे पाहून लुसीया पलंगावरून ताडकन् उठली. तिचें सर्वांग कांपत होतें. तिच्या मस्तकांत आग पेटली होती.

ती तडक दारापाशीं गेली आणि तें लोटून घेऊन तिनें कडी घातली.

नंतर सिमांवपाशीं येऊन तिनें मेणबत्ती विझवून टाकली. आणि दोन्ही हातांनीं त्याचा उजवा हात पकडून त्याला ओढीत म्हटलें,—सिमांव !

० ० ०

वरील प्रसंगानंतर अडीच तीन महिन्यांनीं ती आतां, पलंगावर पडून विचार करीत होती. ती गरोदर स्थितींत होती आणि त्या स्थितींतून मुक्त झाल्याशिवाय तिला गत्यंतर नव्हतें.

तिच्या घराशेजारीं एक हिंदु डॉक्टर होता आणि त्याची एक बहीण बालविधवा असून ती लुसीयेची मोठी मैत्रीण होती.

आपल्या या मैत्रिणीची तिला आतां आठवण झाली. आपली लाजलज्जा आतां तिच्यापुढें उघड करावी आणि तिच्या भावाकडून या संकटांतून आपली मुक्तता करून घ्यावी असें तिनें ठरविलें, आणि ती आपल्या मैत्रिणीकडे गेली.

तिला तारा भेटली. तिनें आपलें रहस्य डोळ्यांत आंसवें आणून तिला सांगितलें. तिची हकीगत ऐकून तारेचे डोळे पाण्यानें भरले.

आपण बालविधवा, पण नवऱ्याचें सुख आपण सातआठ वर्षें तरी भोगलें. पण हरएक प्रकारच्या स्वातंत्र्यांत वाढलेल्या या ख्रिश्चन तरुणी...आजन्म कुमारिका...

स्त्रियांचें दुःख, स्थळ, काळ, समाज, धर्म यांच्या मर्यादा ओलांडून विश्वव्यापी झालेलें आहे, आणि पुरुषवर्गच कां तर निसर्ग व परमेश्वर देखील हात धुवून त्यांच्या पाठीस लागलेला आहे असा विचार तारेच्या मनांत आला, आणि लुसीयेला तिनें जवळ ओढली.

लुसीयेनें केविलवाण्या स्वरांत, तारेचे हात पकडून म्हटलें,

—तारा ! या लज्जेपासून तूं माझी मुक्तता करशील ना ?

तारेनें तिच्या केंसावरून प्रेमळपणानें हात ओढीत म्हटलें,—लुसीया ! भिऊं नकोस !

आणि इतक्यांत तारेचा अडीच तीन वर्षांचा गोजिरवाणा मुलगा दुडूदुडू धांवत तेथें आला आणि त्यानें लुसीयेला मिठी मारली.

—तारा !...नको ग...मी काय करूं ?

लुसीयेनें भेदक, हृदयद्रावक स्वरांत म्हटलें, आणि त्या बालकाला पाहतांच मनाची झालेली द्विधा स्थिति दाखविणारें आपलें तोंड तिनें तारेच्या कुशींत लपविलें.

ले.—१० ऑक्टोबर १९३६
अप्रकाशित

कुचंबणा

# प्रेमाचा मार्ग

कारखान्यांत शिरतांच मार्व्हीसनें उजव्या हाताला असलेल्या खोलींत खिडकीवाटे नजर टाकली, आणि मालकाची उदासीन मुद्रा व त्याच्या अरुंद कपाळपट्टीवर पडलेल्या खोल आठ्या पाहून तो मनांतल्या मनांत हंसला.

त्याच्या जिवणींतून आणि त्याच्या नेत्रांतून उत्साहाचे जणूं काय स्रोतच निघत आणि त्याच्या आसपासच्या मंडळीला प्रफुल्ल करून टाकीत. मनांत दुःख असलें म्हणजेच तें चेहऱ्यावर उमटतें, नेत्रांतून स्रवूं लागतें, किंवा हावभावांतून व्यक्त होतें. मन आनंदानें, बालिश, निरागस आनंदानें परिपूर्ण भरलेलें असलें म्हणजे प्रत्येक अवयव आनंदाशिवाय दुसरी कसली भाषा बोलूं शकणार ? हीच गोष्ट मार्व्हीसच्या बाबतींत घडत होती. त्यानें आपले विशाल डोळे एखाद्यावर स्थिर केले म्हणजे असीम प्रेमानें ते त्याच्या पीडित मनाला कुरवाळूं लागत, आणि त्याच्या मंदहास्यानें उदासीन वातावरण हर्षाच्या लहरींनीं जणुं काय कंपित होई. म्हणूनच तो कारखान्यांत शिरला म्हणजे सगळे कामकरी उल्हसित होऊन मोठ्या नेटानें काम करीत.

आतां तो मालकाच्या खोलींत शिरला, आणि त्यानें अभिवादन करून अदबीनें, पण सुहास्य मुद्रेनें हळूच म्हटलें,—साहेब...

मालकानें नजर वर केली. आणि मार्व्हीस दृष्टीस पडतांच, त्याच्या कपाळपट्टीवरील कांहीं दऱ्या बुझून गेल्या. पण त्याच्या चेहऱ्यावरील गांभीर्यांत मुळींच अंतर पडलें नाहीं.

मंगलोरी कौलांचा भाव बराच वाढलेला आहे; मालाला चांगली मागणी आहे; मजुरीचे दर कमी झाले आहेत; दारांत मोटार आहे; जवळच स्वतंत्र, सुंदर बंगला आहे; असें असतांना हा प्राणी इतका चिंताग्रस्त कां असावा याचें मनांतल्या मनांत आश्चर्य करीत मार्व्हीस मालकाचीं मुक्ताफळें ऐकायला अधीर झाला.

—मान्रीस, पंचवीस हजार कौलांना कालच ही मागणी आली आहे. एवढा माल आज तयार मिळेल ना ?

—आज संध्याकाळपर्यंत एक भट्टी भाजून तयार होईल.

—बरं जा तूं.—मालकानें जड स्वरांत म्हटलें व फिरून कागदपत्रांत तोंड खुपसलें.

मान्रीस तेथून झटकला तो कारखान्याच्या मुख्य आवारांत आला. आठ दहा ख्रिश्चन बायका–पोरी कामाला लागण्याच्या वेतांत होत्या. मान्रीस दिसतांच त्यांनीं प्रेमळ नेत्रकटाक्षांनीं त्याचें स्वागत केलें.

मान्रीसनें दोघां पोरींच्या पाठीवर थापा मारल्या, दुसऱ्या दोघींच्या गालांना जातां जातां हस्तस्पर्श केला, आणि वयस्क बायांची चेष्टा करण्याच्या विचारानें तो त्यांच्या शेजारीं उभा राहिला, तेव्हां त्यांच्यापैकीं एकीनें हंसत हसतच डोळ्याच्या खुणेनें, आवाराच्या एका बाजूला माती आणून टाकीत असलेल्या एका पंधरा साळा वर्षांच्या तरुणीकडे त्याचें लक्ष्य वेधलें.

क्षितिजावरील उषाच आपल्या कारखान्यांत उतरली नाहीं ना ? अशी कल्पना त्याच्या मस्तकांत चटकन् आली आणि त्यानें आकाशाकडे पाहिलें. तेथें अजून सूर्यबिंब उगवलें नव्हतें, परंतु, लाल, केशरी, गुलाबी इत्यादि मनोहर छटांनीं पूर्वा झगमगत होती. पुढच्या झाडींत पाखरांचे निर्भर आनंदाचे बोल घुमत होते. नदीच्या पृष्ठभागावर आकाशाचें प्रतिबिंब पडल्यामुळें निळा रंग आधीं ओतून, नंतर त्याच्यावर पांढरा रंग सारवला आहे कीं काय असा भास होत होता.

त्या तरुणीला पहातांच मान्रीसचें मन विचलित झालें. ती पाठमोरी होती. परंतु तशा स्थितींतहि तिच्या अवयवांचें सौंदर्य त्याच्या नजरेंत भरायला वेळ लागला नाहीं. तिच्या सैल व विपुल केशसंभारांत तिची मान अदृश्य झाली होती. ती परकर नेसली होती आणि तिच्या अंगांत पोलका होता. तिनें परकराचा काचा मारला होता. त्यामुळें तिचा कटिप्रदेश व नितंब उठून दिसत होते. आणि तिच्या भरदार गोंडस मांड्यांच्या पोटऱ्यांचा आकार आकर्षक दिसत होता.

मान्रीसच्या नेत्रांत वेगळाच गोडवा व चमक उत्पन्न झाली. त्यानें जवळच्याच एका बाईला विचारलें,—कोण ती पोरगी ?

ती बाई हंसत म्हणाली,—याच गांवची मुलगी ती. फार गोड दिसते नाहीं का? आतां महिनाभर तुला तिचंच वेड लागेल.

—अन तुमचं वेड लागलं नव्हतं का मला? अन् अजून तरी मी तुमच्या वेडांतून मुक्त कुठं झालों आहें?

आणि मार्व्हीस म्हणत होता तें अगदीं खरें होतें. तो सुंदर पोरींच्याच नादानें हुरळून जात होता असें नव्हे. प्रत्येक स्त्रींत त्याला एखादें सौंदर्य आढळून येई; आणि अचूक त्याच सौंदर्याला तसल्यास प्रकारच्या सौंदर्यानें तो चेतवूं लागला म्हणजे त्याच्या दर्शनानें, त्याच्या सहवासानें कारखान्यांत येणाऱ्या बहुतेक स्त्रिया उल्हसित होऊन जात.

बहुतेक स्त्रिया कुरूप असत. परंतु, त्यांपैकीं कांहींचे डोळे सुंदर असत; अशा स्त्रियांशीं नेत्रकटाक्षांचे खेळ खेळण्यांत तो तरबेज होता. कांहींचें हास्यच फार आकर्षक होतें; अशांना उठतां बसतां हंसायला लावून तो स्वतःची आवड पुरवी. ज्यांचे देह गोंडस होते त्यांना प्रसंगीं कुरवाळायला तो मागें पुढें पहात नसे. आणि ज्या तरुणी स्वरूपसौंदर्यांत अगदीं दरिद्री होत्या, परंतु ज्यांचें हृदय कोणत्या तरी उदात्त भावनेमुळें शोभत होतें, त्यांच्याशीं रिकाम्या वेळीं तो आपलेपणानें, कळकळीनें किती तरी वेळ बोलत बसे. परंतु हें सगळें करतांना, त्यांनीं ज्या कांहीं बऱ्यावाईट भावना किंवा समजुती उराशीं बाळगिल्या होत्या, त्या दुखविण्याचें धाडस तो कधींहि करीत नसे.

कांहीं वेळ तो दुरूनच तिच्याकडे पहात राहिला. तिचे पाय, पावलें, मस्तक, वक्षःस्थळ इत्यादि अवयव त्याला आकर्षक वाटले. पण त्यापेक्षांहि त्या अवयवांची क्षणाक्षणाला होणारी हालचाल त्याला अधिक आकर्षक वाटली. नवीन ठिकाणीं, अनोळखी माणसांत असल्यामुळें, किंचित् भेदरटपणानें आसपास फिरणारी तिची नजर, तिच्या चेहऱ्यावर घटकेघटकेला दिसून येणारे भावभावनांचे बदल आणि स्मिताच्या गोड लकेरी, इत्यादि विविध सौंदर्य पाहून, आपण त्या कारखान्यांत आल्यापासून कधींहि तेथें न फिरकणाऱ्या त्या तरुणीचा त्याला मनांतल्या मनांत राग आला. आणि आपल्या हाताखालीं काम केलेल्या निरनिराळ्या शेंशंभर बायकांत तिच्या पासंगाला लागणारी एक देखील नव्हती, हें आठवून त्याला आनंद झाला.

थोड्या वेळानें तो तिच्याकडे आला. आणि त्यानें तिला प्रश्न केला,

—तुझं नांव मला केव्हां कळणार ?

या प्रश्नांतील सलगीचा स्वर तिला अनपेक्षित वाटला.

—माझं नांव क्लारा.

—क्लारा! तुला शोभेसारखंच नांव ठेवलं आहे तुझ्या आईबापांनीं तुला.

एखाद्या लहान मुलीप्रमाणें क्लारानें मान खालीं घातली आणि आपले हिरवे निळे डोळे जमिनीवर लावले.

—यापूर्वीं तूं इथं कधींच आली नाहींस का?

—आजच पहिल्यांदा इथं येत आहें मी.

—नेहमीं येत जाशील ना इथं?

—घरचं कांहीं काम नसलं म्हणजे येईन.

—घरचीं कसलीं कामं करावीं लागतात तुला?

—घरचं शेत आहे. तें या दिवसांत पिकत आहे.

—मग तें पिकल्यानंतर मी दिखील येईन तुझ्याबरोबर कापायला.

—मी आपली आभारी आहें. पण तेवढी कांहीं गरज नाहीं. माझी आई अन् आणखी दोघी बहिणी आहेत त्या येतील माझ्याबरोबर शेतांत.

—मी येऊं नये असं आहे का?

—तुम्ही इथं कामावर आहांत. हें काम टाकून तुम्ही शेतांत आलां तर तें बरं नाहीं दिसायचं. शिवाय, आमच्या घरचीं कामं तुम्ही करावीं इतके उपकार आम्ही तुमच्यावर कुठं केले आहेत अजून? आमची ओळख ही आतांच होते आहे.

—क्लारा, ज्याच्यावर उपकार केल्यानं मनाला समाधान वाटतं त्याच्या उपयोगी पडायला इतर कारणं कशाला हवींत?

ती बालिशपणानें त्याच्याकडे पाहून हंसली. मार्टीसला थोड्याच वेळांत स्पष्ट दिसून आलें कीं, आपल्या कारखान्यांतील बऱ्याच अविवाहित तरुणींप्रमाणें क्लारा कौमार्यभंगाचा अनुभव घेतलेली नसून, बऱ्याच बाबतींत अगदीं साधीभोळी आहे. इतर तरुणी त्याच्याशीं लगेच स्नेह जुळवीत व सलगीनें वागत, आणि त्याच्याकडून घडणाऱ्या सूचक क्रियांना प्रत्युत्तर देतांना वेळींप्रसंगीं निर्लज्ज बनत. यांत त्याचाहि दोष नसे. आर्थिक दुःस्थितीमुळें आणि विवाहाचें कायदेशीर किंवा धार्मिक बंधन नसल्यामुळें त्यांच्यापैकीं बऱ्याच जणींवर जन्मभर अविवाहित अवस्थेंत रहाण्याचा

प्रसंग येई. ज्यांच्यावर असा प्रसंग येत नसे त्या देखील केव्हां विवाह होईल याचा भरंवसा नसल्यामुळें, आपणास आवडणाऱ्या तरुणाच्या सहवासांत गुप्तपणें चैन करीत. क्लाराचें वय त्यांच्या मानानें लहान होतें आणि एखाद्या अनाघ्रात फुलाप्रमाणें ती पवित्र होती. म्हणूनच त्याच्याशीं बोलतांना ती गोंधळून गेली आणि गोरीमोरी झाली.

तिच्यासंबंधीं विचार करीतच तो त्या दिवशीं घरीं गेला.

कोणत्याहि गोष्टीचा गंभीरपणें विचार करणें हा त्याचा स्वभावच नव्हता. त्यानें आतांपर्यंत वीस पंचवीस तरुणींच्या सहवासाची मजा लुटली होती. परंतु, आपण गुन्हा करीत असल्याची जाणीव त्याला केव्हांहि झाली नव्हती. त्याचें मन शंका-कुशंकांपासून व विचारांपासून अलिप्त असल्यामुळें स्त्रीसहवासाचा जो आनंद तो अनुभवीत असे तो उत्कट असे. कारण पश्चात्तापाचें विष त्यांत कालविलें जात नसे.

क्लाराच्या सोज्वळ नजरेनें मात्र त्याला विचारप्रवृत्त केलें.

दुसऱ्या दिवशीं कारखान्यांत येतांना त्याला वाटेंत क्लारा भेटली. तिच्याशीं केव्हां बोलूं, तिचीं सुखदुःखें समजून घेऊन तिला कोणत्या गोष्टींत उपयोगी पडूं, अशी तळमळ त्याला लागली होती.

नवीन तरुणी कारखान्यांत आली म्हणजे तिच्या आराधनेंत तो गुंग होऊन जाई. ती कुरूप असो किंवा सुरूप असो, तिला आपलीशी करून घेण्यासाठीं तो कसून प्रयत्न करीत असे. आणि ती आपलें सौंदर्य किंवा तारुण्य त्याला अर्पण करीपर्यंत जी अनिश्चित स्थिति उत्पन्न होई, त्या स्थितींतच त्याला समाधान वाटे. मनाच्या या हुरहुरींत, या कातर अवस्थेंत त्याला अननुभूत आनंद होई.

—क्लारा, बरी आहेस ना तूं ? अन् तुझी आई ?—त्यानें आपल्या गोड व धुंद नजरेनें तिच्याकडे पहात म्हटलें.

—देवाच्या कृपेनें आम्ही सगळीं बरीं आहों. तुमची मंडळी खुशाल आहेत ना ?

—माझी मंडळी ! क्लारा ! मला ना आई ना बाप. माझं लग्न दिखील अजून झालं नाहीं.

—मग कां करीत नाहीं लग्न तुम्ही ?—तिनें सरळपणानें प्रश्न केला.

हा प्रश्न ऐकल्याबरोबर त्याच्या नजरेपुढें त्यानें अनुभवलेलें स्त्रीविषयक विविध सुख उभें राहिलें, आणि आपल्यासारख्या माणसानें लग्नाच्या संकटांत केव्हांहि पडूं नये असें त्याला वाटलें.

त्यानें उत्तर केलें नाहीं. पण विषय बदलून त्यानें तिला विचारलें,

—क्लारा, यापूर्वीच तूं कारखान्यांत काम करायला कां आली नाहींस ?

तिनें एक सुस्कारा टाकला आणि भावनांनीं भारावल्याप्रमाणें दिसणारे आपले डोळे किंचित् वर करून म्हटलें,

—माझे वडील—परमेश्वर त्यांना स्वर्गांत सुखी ठेवो—माझे वडील म्हणत होते कीं, वाढलेल्या मुलीला बाहेर सोडली तर ती वाईट बनते. गांवांत पुष्कळ तरुण वाईट आहेत ते तिला फसवितात.—क्लारा म्हणाली.

वाईट बनणें म्हणजे काय आणि फसविणें म्हणजे काय याची यथातथ्य कल्पना मात्र तिला मुळींच नव्हती.

—मग इकडे कां आलीस तर तूं ?

—आई म्हणत होती कीं आपण खंबीर असलें तर लोक कांहीं आपल्याला वाईट बनवूं शकत नाहींत; दिवसाला चार सहा आणे मिळाले तर तितकीच संसाराला मदत होते. दोन महिन्यांपूर्वी वडील वारले...मग आई म्हणाली, ‘ तूं आतां लहान नाहींस. तूं मजुरीला जा. पण जपून वाग. तुझं अजून लग्न व्हायचं आहे. ’ आईनं मोकळीक दिली म्हणून मी इकडे आल्यें. बाकी, गांवचे सगळेच तरुण कांहीं वाईट नसतात. तुमच्यासारखे...

—माझ्यासारखे सज्जन असले तर भिण्याचं कारण नाहीं असंच तुझं म्हणणं ना ? क्लारा, तूं अगदीं वेडी आहेस !

—म्हणजे ?—ती कांहींशा आश्चर्यानेंच म्हणाली. आणि चालतां चालतां ती वाटेवरच थांबली.

तिच्या मुद्रेकडे आणि तिच्या नाजुक हालचालींकडे पहात, मार्व्हीस हंसत होता. पण त्याची वृत्ति मात्र गंभीर बनली होती.

—क्लारा, खरंच सांग. तुला माझी भीति वाटते का ?

—नाहीं, मुळींच नाहीं. माझ्याबद्दल तूं किती कळकळ दाखवितोस तें मला माहीत का नाहीं ? हें पहा. तुझा स्वभाव मला भारी आवडतो.

मार्व्हीसला तिच्या साधेपणाची कींव आली.

—क्लारा, मी तुझा मित्र ना ? मग तुझ्या हाताचं चुंबन मला घेऊं देऊन तुझा माझ्यावरील विश्वास व्यक्त कर पाहूं.

—मान्रीस, तूं माझा मित्र. माझा हात चुंबनासाठीं पुढं करायला मला कोणतींच हरकत नाहीं.

मान्रीसचें हृदय क्षणमात्र धडधडलें. त्यानें दोन्ही हातांत तिचा नाजुक, गोंडस हात दाबून धरला. नंतर वांकून त्यानें त्या हाताचें चुंबन घेतलें. तेवढ्यानें त्याचें समाधान झालें नाहीं म्हणून त्यानें फिरून एकदां, दोनदां, तिनदां, उत्कट रीतीनें तिच्या हाताचें चुंबन घेतलें.

तिच्या चेहऱ्यावर आणि तिच्या डोळ्यांत त्याला तेंच पावित्र्य, तींच सोज्वलता दिसली. परंतु तिच्या हस्तस्पर्शानें त्याची विलासी, वैषयिक वृत्ति उचंबळून आल्याशिवाय राहिली नाहीं.

दोघेंहि बरोबरच कारखान्यांत शिरलीं. त्यांच्याकडे पाहून इतर बाया साभिप्राय हंसूं लागल्या. क्लाराला मान्रीसनें फसविलें असेंच सगळ्यांना वाटलें.

वाळलेलीं कच्चीं कौलें भट्टींत नेऊन ठेवण्याचें काम त्यानें तिला सांगितलें. आणि तीं उतरून घेण्यासाठीं स्वतः तो भट्टींत राहिला.

एखाद्या लांब रुंद माडीप्रमाणें ती भट्टी प्रशस्त होती. तेथें हजारों कच्चीं कौलें एकावर एक अशीं रचून ठेवलीं होतीं. कारखान्यांत येणाऱ्या किती तरी पोरींशीं फाजील सलगी करण्याची ती त्याची जागा होती.

क्लाराच्या बाबतींत तो गोंधळांत पडला होता. तिच्या चेहऱ्यावरील साधे भाव पाहून, तिच्याशीं अतिप्रसंग करायला तो कचरत होता. परंतु आपल्याकडे बोलतांना तिच्या स्वरांत येणारें विलक्षण मार्दव, नजरेंतील गोड चमक आणि वृत्तीचा गोंधळ या गोष्टींचा अर्थ आपणांस अनुकूल असाच आहे, असेंहि त्याला वाटलें. आणि 'तुझा स्वभाव मला फार आवडतो,' हे तिनें काढलेले उद्गार व मोठ्या खुषीनें त्याच्या चुंबनासाठी पुढें केलेला हात या गोष्टींची आठवण होतांच, त्याचा संशय चटकन् विरून गेला; आणि इतर तरुणींशीं आपण प्रेमचेष्टा व धाडस यांच्या बळावर विजयी झालों त्याप्रमाणें क्लाराच्या बाबतींतहि आपण यशस्वी होऊं असें त्याला वाटलें. परंतु त्या दिवशीं, इतक्या लवकर मात्र आपण कांहींच फाजीलपणा करूं नये, तिच्याशीं आपला स्नेह अधिक वाढल्यावर पुढचें धाडस करावें असा त्यानें विचार केला.

कौलांचीं पांचसहा ओझीं माथ्यावर घेऊन ती वर गेली. मान्रीसनें ओझ्याला हात लावून तें तिच्या माथ्यावरून खालीं उतरायला मदत केली. प्रत्येक खेपेला

तो तिच्याशीं, थट्टेनें, विनोदानें, कांहींतरी बोलतच असे. आणि ती देखील त्याला मोठ्या आनंदानें उत्तरें करी.

तिच्या माथ्यावरील ओझें उतरतांना मात्र तो अस्वस्थ होई. तिचा हस्तस्पर्श त्याला घडे, तिच्या नाकांतील उष्ण निःश्वास त्याच्या हातांना चाटून जात, विरल वस्त्रावगुंठित अशा तिच्या सुकुमार देहाची उष्णता तिला मिठींत पकडल्याप्रमाणें त्याला अगदींच जवळून भासे.

परंतु, मनावर दाब ठेवण्याची त्याला केव्हांच संवय नव्हती. काम करणाऱ्या पोरींच्या गालांवर टिचक्या मार, नितंबावर थाप दे, त्यांचे दंड पकड हा त्याचा नेहमींचाच क्रम होता. त्या संवयीनुसार आतांहि त्याच्याकडून वर्तन घडलें.

क्लारानें दोन्ही हातांनीं ओझें माथ्यावर धरलें होतें आणि ती त्याच्यापुढें येऊन उभी राहिली होती. मार्व्हीसनें अकस्मात् उजव्या हातानें तिचा डावा दंड पकडला. त्याबरोबर ती चटकन् मागें सरली, आणि तिनें ओझ्याला धरलेले दोन्ही हात सोडले, आणि ओझें खालीं आदळलें तें मार्व्हीसच्या गुडघ्यांवर पडलें. फार मोठा आवाज झाला आणि लगेच तेथें मजूर लोक भराभर जमले.

क्लारा या अनपेक्षित प्रकारानें मूढ झाली होती. ती घाबरलेल्या मुद्रेनें मार्व्हीसकडे पहात होती. तो फुटलेला गुडघा चांचपीत होता.

० ० ०

दुसऱ्या दिवशीं क्लारा कारखान्यांत आली नाहीं. मार्व्हीस देखील पायाच्या आजारामुळें घरींच राहिला.

कांहीं दिवसांनंतर त्याचा पाय बरा झाला, तेव्हां तो शेताच्या बाजूनें संध्याकाळीं फिरायला गेला. कारखान्याला त्या दिवशीं सुटी असल्यामुळें त्याला काम नव्हतें.

निसर्गाची शोभा पहात, तो शेतांतून जाणाऱ्या रस्त्यानें चालला होता. शेताच्या कडेनें असलेल्या उंच बांधावर झाडांची रांग लागली होती. आणि त्यापुढें नदीचें पात्र वहात होतें. उजव्या बाजूला नारळीच्या दाट झाडींत लहान लहान झोंपड्या आणि शुभ्र टुमदार बंगले दिसत होते.

चालतां चालतां, रस्त्याच्या कडेला असलेल्या एका कुणग्यांत त्याला क्लारा दिसली आणि त्याबरोबर तो तेथेंच थांबला. ती हातांतील विळ्यानें पिकलेलें शेत कापीत होती. त्याच्यावर नजर पडतांच किंचित् आश्चर्यानेंच तिनें त्याला विचारलें.

—पाय बरा झाला का तुझा ?

—म्हणून तर इथपर्यंत चालत आलों ना ?

—त्या दिवशीं माझ्या हातून मोठी चूक घडली नाहीं का ? पण मी मुद्दाम कांहीं तसं केलं नाहीं. तूं मला क्षमा करशील ना ?

—माझ्या हातूनच आधीं वेडेपणा घडला नाहीं का ? पण माझ्यावर रागावलीस नाहीं ना तूं ? तुझ्या रागाची मला फार भीति वाटते, समजलीस ?

—खरंच, तूं वेडा आहेस. तुझ्यावर मी कधीं तरी रागावेन का ?

—कारखान्यांत गेली होतीस का तूं त्यानंतर ?

—पाय बरा होईपर्यंत तूं घरीं रहाशील हें मला माहीत होतं, म्हणून मी दिखील गेलें नाहीं.

—आतां कामावर केव्हां येशील ?

—तुझ्याबरोबरच. उद्यां जाशील का तूं ?

—हो तर.

इतकें बोलून तो कुणग्यांत उतरला. क्लाराची आनंदी वृत्ति पाहून त्याला किती तरी हर्ष झाला.

त्यानें तेथेंच एक विळा पडला होता तो हातांत घेतला आणि झरझर शेत कापायला सुरवात केली. क्लारानें हरकत घेतली. पण त्यानें तिचें म्हणणें ऐकलें नाहीं.

थोड्याच वेळांत त्यानें कितीतरी पीक कापून काढलें, त्याचा भारा बांधला आणि तिला म्हटलें,—चल आपण तुझ्या घराकडे जाऊं.

तिनेंहि दुसरा भारा बांधला आणि तो माथ्यावर घेऊन ती पुढें चालूं लागली.

थोड्याच वेळांत तीं दोघेंहि तिच्या घराकडे पोंचलीं.

त्यानें तिच्या आईशीं ओळख करून घेतली आणि बराच वेळपर्यंत तो तिच्याशीं जिव्हाळ्यानें बोलत राहिला.

तिला वाटलें, आपल्या मुलीला हा नवरा मिळाला तर काय बहार होईल.

आणि क्लाराला वाटलें, मार्व्हीससारखा गोड स्वभावाचा व देखणा नवरा आपणास दुसरा कोण मिळेल !

पण, मार्व्हीसच्या मनांत लग्नाचा विचार देखील शिरला नाहीं. क्लाराला वश करून घेतली पाहिजे आणि तिच्या संगतींत कांहीं दिवस मजा केली पाहिजे एवढेंच त्याला ठाऊक होतें.

क्लारा दिवसेंदिवस आपणास वश होत आहे असें त्याला वाटत होतें, आणि मान्रीस थोड्याच दिवसांत आपला होईल या आनंदात ती मग्न होती.

० ० ०

दिवसेंदिवस त्यांची मैत्री वाढतच गेली. परंतु सतत इतके दिवस मान्रीसनें यापूर्वी कुणाचीच आराधना केली नव्हती. त्यामुळें त्याला आतां धीर धरवत नव्हता.

एक दिवस, संध्याकाळच्या वेळीं कारखाना बंद होण्याच्यापूर्वी त्यानें क्लाराला निश्चयी स्वरांत म्हटलें,—क्लारा, आज मी सांगेन त्याप्रमाणं तूं वागलं पाहिजेस.

—बरं आहे.—तिनें हंसतच उत्तर केलें.

कारखाना बंद झाल्यावर मान्रीसनें तिला म्हटलें,—आज आपण दुसऱ्या रस्त्यानं जाऊं.

आणि तिला बरोबर घेऊन तो वेगळ्याच रस्त्यानें जाऊं लागला.

थोड्या वेळानें तीं एका उंचवट्यावर पसरलेल्या मैदानांत पोंचलीं. तेथें जिकडे तिकडे गवत माजलें होतें. मधून मधून काजूचीं लहान लहान झाडें तेवढीं दिसत होतीं. पाषाणाचे काळे दगड सगळीकडे पडले होते. सूर्यास्त झाला होता. आणि पश्चिम क्षितिजावर कितीतरी रंग तेजांत मिसळून सारवल्याप्रमाणें वाटत होते. आसपास कोणीहि दिसत नव्हतें. संदेशवाहक तारेवर असंख्य चिमुकले पक्षी रांगेनें बसून चिवचिवाट करीत. दिवसभर तेथें चरणारीं गुरें गांवाकडे परतत होतीं, आणि त्यांच्यामागून जाणाऱ्या गुराख्यांचे शब्द अद्याप कानांवर पडत होते. वाटेपासून कांहीं अंतरावर एक झोंपडी दिसत होती. पण ती पडकी होती आणि तेथें कोणीहि नव्हतें.

—क्लारा ! थोडा वेळ आपण त्या झोंपडीच्या पलीकडे बसूं.

क्लारा घाबरल्याशिवाय राहिली नाहीं. पण अज्ञाताची ओढ तिला लागली होतीच. शिवाय, मान्रीस नवरा मिळेल ही आशा...

तेथें पोंचतांच तीं दोघेंहि त्या मऊ मऊ गवतावर बसलीं.

त्यानें तिचा हात आपल्या हातांत धरून दाबला, त्याचें उत्कटपणें चुंबन घेतलें. तिला आपल्याजवळ ओढली आणि म्हटलें,—क्लारा, मी सांगेन तें ऐकायचं हं.

—तूं माझा ना ? मग तूं सांगशील तें मी ऐकेन.—तिनें आपले जादूनें भरलेले प्रेमविव्हल नेत्र त्याच्या चेहऱ्यावर स्थिर करीत म्हटलें.

तिच्या नेत्रांतून, जिवणींतून, तिच्या लहानसहान हालचालींतून अत्यंत प्रबल अशी सौंदर्यशक्ति निघत असून आपणाला ती चीत करीत आहे असें त्याला वाटलें.

धुंदीच्या आवेगांत त्यानें तिला मिठी मारली. नवीन भावनांच्या या अनुभूतीमुळें ती बेहोष झाली.

' तूं माझा ना!' हा तिचा प्रश्न त्या शांत वातावरणांतून सगळीकडे घुमत आहे असा त्याला भास झाला.

पहिलें पाप शिकवून हिला सोडून दिली तर उद्यां दुसरा, तिसरा, किती तरी तरुण या पवित्र पोरीला आलिंगन देतील अन्...

हा विचार त्याच्या मनांत तरवारीच्या पात्याप्रमाणें चमकला.

पण त्याची विकारवशता किती तरी वाढली होती.

त्यानें तिला घट्ट आवळून धरली. आपलें सर्वस्वच त्याला अर्पण केल्याप्रमाणें जणुं काय तिची मुद्रा झाली होती.

तो पशु बनण्याच्या बेतांत होता.

इतक्यांत Ave Maria ची घंटा जोरानें निनादली. ती कानीं पडतांच तो दचकला. ती मोहनिद्रेंतून जागी झाली.

तो ताडकन् उठला. त्यानें तिच्या दंडाला धरून तिला जोरानें हालविली आणि गोड आवाजांत म्हटलें,—क्लारा! माझ्या क्लारा! ऊठ, आपण जाऊं.

—कुठं जाऊं या आपण?—तिनें भ्रमिष्टाप्रमाणें म्हटलें.

—ही घंटा आपल्याला चर्चमध्यें बोलावते आहे. चल उठ. देवाच्या घरांत आम्ही एकत्र होऊं.

आनंदानें बेहोष होऊन दोघेंहि चर्चच्या दिशेनें चालूं लागलीं.

निरभ्र आकाशांत चंद्र हंसत होता. तारका खिदळत होत्या. आणि पाखरांचीं जोडपीं तारेच्या दोल्यावर हळुवारपणें झुलत होतीं.

**प्रेमाचा मार्ग** ले.—२९ सप्टेंबर १९३६
अप्रकाशित



— Consult —

# DE LUXE TAILORS

2nd Bhatwadi,
Girgaum Road,
BOMBAY

FOR

*FASHIONS*

*&*

*STYLES*

*Pro*—R. N. Rau.

DE LUXE TAILORS


कुळागर—सागर साहित्याचें चवथें प्रकाशन लवकरच प्रसिद्ध होईल.

## चालु युग हें बिस्किटांचें युग आहे

युरोप–अमेरिकेंत अल्पाहारच काय पण मुख्याहार सुद्धा खानावळींतून घरीं येत असल्यामुळें घरांतून चूल पेटविण्याचा प्रसंगच कधीं येत नाहीं म्हणे ! अशा ह्या विसाव्या शतकांत सकाळ–संध्याकाळच्या खाण्याकरतां, प्रवासांत बरोबर घेण्याकरतां, मुलांचें रडणें थांबवण्याकरतां, गोड–धोड पदार्थ बनवण्यासाठीं अजूनही तुम्ही आपल्या बायकांना चुलीपुढें पाठविणार का ? नाहीं ना ? मग आमच्याकडचीं सर्व प्रकारचीं बिस्किटें घेऊन आपली गरज भागवा.

**गोमन्तक हिंदु बेकरी**–गायवाडी

**गिरगांव–मुंबई.**

प्रो. **ना. सि. फडके** यांच्या

**‘ नव्या गुजगोष्टी ’**

श्री. **भ. दि. गांगल** यांची कादंबरी

**‘ पिंजऱ्यांतील पक्षी ’**

शिवाय भारदस्त लेख, उत्कृष्ट लघुनिबंध, लघुकथा, कविता, परीक्षणें इ.

**आजच वर्गणीदार व्हा:**

वा. व. ट. ख. सह २ रु. कि. अं. ३ आणे

**म्यानेजर ‘ कला ’,**

पो. बॉ. ८ **नवा-गोवा**

**–सुंदर कट, अप-टु-डेट फॅशन–**

**–उत्तम शिलाई, वेळशीर काम–**

## डी. जी. हलनकर
## आणि कंपनी

**टेलर्स आणि आऊटफीटर्स.**

‘ अमीन नर्सरी ’ जवळ, विठ्ठलभाई पटेल रोड, **गिरगांव मुंबई.**

गिरगांवांतील अत्यंत लोकप्रिय व फारच माफक भावानें माल विकणारी

## भारत हिंदु बेकरी

**कांदेवाडी, मुंबई नं. ४**

आमच्याकडे सर्व तऱ्हेचीं बिस्किटें घाऊक व किरकोळ मिळतात.

# बिघडलेली नजर——


हा आपला दोष नाहीं.

पण ती तशीच असूं देणें हा मात्र दोष आहे.

ती सुधारण्याकरितां

# सुंदर ॲण्ड कंपनी

या प्रसिद्ध **ऑप्टीशिअन्स्‌कडून** डोळे तपासून सुंदर चष्मे घ्या व आपल्या नेत्रांचें रक्षण करा.



डोळे अत्यंत काळजीपूर्वक व **विनामूल्य** तपासून योग्य व अल्प किंमतींत **खात्रीलायक** चष्मे मिळण्याचें हें एक नांवाजलेलें ठिकाण आहे.

फ्रेम्सचा सुबक व नवा स्टॉक तयार आहे.

# सुंदर आणि कंपनी

ऑप्टीशिअन्स

२१२, गिरगांव, केळेवाडी नाका, मुंबई नं. ४

# चालु युग हें कि 'सागर साहित्य'

गोवा येथें १९३५ सालीं भरलेल्या गो. सा. संमेलनाच्या प्रथम प्रसंगीं 'सागर साहित्य' ह्या प्रकाशन संस्थेची स्थापना झाली, व संमेलनाध्यक्ष श्री वि. स. खांडेकर यांच्या हस्तें तिचें नामकरण करण्यांत आलें.

'साहित्या' तर्फे प्रसिद्ध होणाऱ्या वाङ्मयांत, गंभीर स्वरुपाच्या साहित्या-पेक्षां, सारस्वतांचें-ललित वाङ्मयात्मक पुस्तकांचें प्रमाण जास्त राहील.

**चार आणे डिपॉझिट भरणाऱ्या वर्गणीदारास साहित्याचें प्रत्येक पुस्तक पाऊणपट किंमतीस मिळेल.** मात्र कमींत कमी तीन पुस्तकें त्यानें घेतलीं पाहिजेत. 'साहित्या'चा संबंध सोडतेवेळीं डिपॉझिट परत मिळेल.

## 'सागर साहित्या' चें प्रकाशन

**१ सागराच्या लाटा**...कथासंग्रह...ले. **प्रो. लक्ष्मणराव सरदेसाई.**

एकंदर २३ गोष्टी ह्या संग्रहांत समाविष्ट केल्या असून टीकाकारांनीं त्यांची प्रशंसा केली आहे. पृष्ठें १५०-**किं. १ रु.**

**२ गुलाबगेंद**......कथासंग्रह.........ले. **जयवंतराव सरदेसाई**

लेखकाचे सर्व वाङ्मयगुण प्रस्तुत संग्रहांत प्रकर्षानें एकत्रित झाले असल्यामुळें, संग्रह उच्च दर्जाचा झाला आहे. पृष्ठें ८२-**किं १२ आणे**

**३ वादळांतील नौका**...कथासंग्रह...**प्रो. लक्ष्मणराव सरदेसाई**

लेखकाच्या लेखनशैलीचीं वैशिष्टें उठावदारपणें ह्या संग्रहांत दिसत असल्यामुळें रसिक त्याचें सप्रेम स्वागत करतील अशी खात्री वाटते. पृ. ११६-**किं. १ रु.**

**४ कुळागर**...कथासंग्रह....गोमन्तकीय लेखकांच्या प्रादेशिक कथांचा हा प्रातिनिधिक संग्रह लवकरच प्रसिद्ध होईल.

**वा. द. सातोस्कर**, बी. ए. **सागर-साहित्य**. त्रिभुवन रोड, **मुंबई नं. ४**

---

१ : कां बुवा ? आज जरा स्वारी गरम ?

२ : ( दारा आडून कुणीतरी ) नेहमींचेंच असें हें भावोजी.आज म्हणे भातांत कीड मिळाली. झालें ! अर्ध्यांच ताटावरून अुठणें झालें ! माझी चूक मला कबूल पण तांदूळच मुळीं खराब तिथें मी तरी काय करणार ! किती तरी वेळां सांगितलं यांना कीं, तो सारस्वत ब्राम्हण समाज आहे त्याच्या मागच्या बाजूला आमच्याच गोंयकरांचें अेक दुकान आहे तिकडून माल आणा म्हणून. पण तें कांहीं होत नाहीं अिकडून. आणि असें रागावणें मात्र होतें...

१ : तें आत्मारामालें "संव्सार साहित्य-सदन" म्हणटा तुमी ? बरो मेळता थंय माल ? ( अेकमतानें शेवटीं 'सदनां'तूनच माल आणावयाचें ठरतें. )